
| Sr. No. | Name of the teachers | Title of the book/chapters published | Title of the paper | Year of Publication |
|---|---|---|---|---|
| 1 | Prof.Dr Satej Danane | Baburao Gaikwad yanche Laghunibandh :Samiksha | Dr.Baburao gaikwad yannche laghunibandh -lekhan :ek vichar | 2023 |
| 2 | Prof.Dr.Tejashri Rayate | Santanche Tatvdyan | Sant Muktabai | 2020 |
| 3 | Prof.Dr.Sandesh Bichukale | Hindi Laghukatha ke vividh Ayam | Hindi Laghukatha me vishay vaividh | 2019 |
| 4 | Prof.Dr Satej Danane | Akshargandh | vicharpravrtak Atmkathnatmak lekhache pusatak:Ambuj | 2019 |
| 5 | Prof.Dr Satej Danane | shivaji University distance center:Prabhav Abhyas | Prabhav Abhyasachi sankalpan,Swarup v yapti | 2019-20 |
| 6 | Prof.Dr Satej Danane | shivaji University distance center:Prabhav Abhyas | wangmayetihasachi sankalpana | 2018-19 |
| 7 | Prof.Dr.Sandesh Bichukale | 21 vi shati ka hindi sahitya :nav vimarsh | Daud upnyas me chitrit vrudh vimarsh | 2018 |
| 8 | Prof.Dr Satej Danane | sahitya samanvay | Akalan Aswadak Sameeksha | 2021 |
| 9 | Prof.Dr Satej Danane | sahitya samanvay | Doctor Baburao Gaikwad Yanchya Sahityatil Bhasha Saundarya | 2019 |



# बाबुराव गायकवाड यांचे लघुनिबंध : समीक्षा

डॉ. मिलिंद बागूल

Principal
Namdevrao Suryawanshi(Bedke) College
Phaltan,Dist.Satara.

COLLEGE N.S.(B) PHALTAN

Scanned with OKEN Scanner

N.S.(B) COLLEGE * PHALTAN

# अनुक्रमणिका

१. डॉ. बाबुराव गायकवाड यांचे लघुनिबंध-लेखन : एक विचार. १३
– डॉ. सतेज दणाणे

२. बाबुराव गायकवाड यांचे ललितलेखन ........................ ३६
– डॉ. अमृत यार्दी

३. चिंतनाचा मनोज्ञ आविष्कार 'हलकंफुलकं' ........................ ४४
– डॉ. बाळकृष्ण सरकटे

४. 'पुन्हा एकदा हलकंफुलकं' अनुभूतीचा प्रामाणिक आविष्कार ..४९
– डॉ. अविनाश आवलगावकर

५. वेगळ्या वाटेवरचा ललित लेखसंग्रह 'हलकंफुलकं' .......... ५४
– उत्तरेश्वर ज्ञानोबा सुरवसे

६. डॉ.बाबुराव गायकवाड यांच्या ललित लेखनातील स्त्री चित्रण..५८
– डॉ. कमल दणाणे, कोल्हापूर

७. चिंतनशीलतेचा प्रत्यय देणारे ललितलेखन 'हलकंफुलकं' ..... ६२
– डॉ. विष्णू वासमकर

८. डॉ. बाबुराव गायकवाड यांच्या ललितलेखनातील चिंतनशीलता..६८
– डॉ. सतेज दणाणे

९. 'तिसऱ्यांदा हलकंफुलकं' नर्मविनोदी ललितबंध............ ७५
– प्राचार्य डॉ. पंडितराव पवार

१०. 'तिसऱ्यांदा हलकंफुलकं' मधील चिंतन ........................ ७८
– डॉ. संजय कांबळे

११. हलकंफुलकं : समाजमनाचा आरसा ........................ ८२
– राजेंद्र काशिनाथ पारे

लेखकांचा परिचय ........................ ८५



Scanned with OKEN Scanner

रा. गो. चवरे, 'अस्तित्वभोग' – डॉ. विनोद गायकवाड, 'साहित्यसुधे (कन्नड)' – डॉ. विजय कांबळे, 'बाबुराव गायकवाड यांचे कथा व नाट्यलेखन' – डॉ. यशवंत राऊत, 'साहित्यरंग' – डॉ. रा. गो. चवरे, 'सारे काहीमधील आंबेडकर विचार' – डॉ. दशरथ भगत, 'बाबुराव गायकवाड यांचे साहित्य' – डॉ. बाळकृष्ण सरकटे, 'दरवळ' – परमेश्वर पाटील, 'समग्र दत्तांकुर' – डॉ. विष्णू वासमकर, अशी डॉ. गायकवाड यांच्या साहित्यावर पुस्तके प्रकाशित झालेली आहेत.

कन्नड आणि मराठीच्या सीमाभागात राहून विविधांगी साहित्यसेवा करणारे डॉ. गायकवाड हे उपेक्षित राहिलेले आहेत. त्यांची साहित्य समीक्षकांनी फारशी दखल घेतली गेलेली दिसत नाही. डॉ. गायकवाड यांनी समाजातील उपेक्षित घटकांचा विचार साहित्यात मांडला आहे. त्यांचा सर्वधर्मसमभाव मानवतावादी दृष्टिकोन असलेला दिसतो. ते कोणत्याही साहित्यिक गटाशी, वादाशी, प्रवाहाशी चिकटताना दिसत नाहीत. कदाचित मराठी साहित्याच्या कंपूशाही संस्कृतीमुळे त्यांची दखल घेतली गेली नसावी, असे दिसते. मात्र, डॉ. गायकवाड यांनी केलेली साहित्यसेवा ही कोणी दखल घ्यावी, म्हणून केलेली नाही किंवा कोणताही हेतू ठेवून केलेली नाही. ते सतत साहित्याच्या प्रांतात रमणारे आहेत. त्यांच्या रोजच्या व्यवहारात ते साहित्यिक वृत्तीने जगतात. आजकालचे कायमस्वरूपी प्राध्यापक मोठमोठ्या पगाराच्या रकमा घेत असताना पुस्तके खरेदी करताना मागे-पुढे बघतात. 'किती टक्के सूट मिळणार', म्हणून मागणी करतात किंवा ही पुस्तके घरात आहेत, म्हणून ती खरेदी करण्याचे टाळतात. काही प्राध्यापक स्वतःचे पुस्तक प्रकाशित झाल्यावर त्यातून पैसे मिळविण्याचा प्रयत्न करतात, हे आपणा सर्वांना माहीत आहे. मात्र, डॉ. बाबुराव गायकवाड हे आपले प्रकाशित झालेले साहित्य वाचकांना मोफत स्वरूपात वाटताना दिसतात. अशी साहित्यसेवा करणारा साहित्यप्रेमी लाखात मिळणेही विरळच.

डॉ. गायकवाड जे जीवन जगले, ते त्यांचे आयुष्य, त्याचे बरेवाईट अनुभव विनोदी शैलीत त्यांनी साहित्यात ओतलेले आहे. त्यांचा अभ्यासाचा व्यासंग किती मोठा आहे, हे त्यांचे साहित्य वाचणाऱ्या वाचकांना समजते. अफाट ज्ञान, शब्दसंपत्ती, विनो[illegible] करण्याची त्यांची



स्वभाववृत्ती, साध्या साध्या प्रसंगातील मोठा आशय ते म्हणी, वाक्प्रचार यांतून व्यक्त करतात. त्यांच्या साहित्यातील सुभाषितवजा वाक्ये, प्रवाही निवेदन हे वाचकांना गुंतवून ठेवते. त्यामुळे त्यांचे साहित्य पुनःपुन्हा वाचावे असे वाटते. व्यवहारज्ञान देणारे डॉ. गायकवाड यांचे साहित्य, माणसातील अनेक वृत्त्या-प्रवृत्त्या, माणसाच्या विविध नमुन्यांचे दर्शन घडविते. त्यांनी रंगविलेली व्यक्तिचित्रे सर्वसामान्य माणसापासून ते कुरघोडी करणाऱ्या बेरकी माणसापर्यंतची आहेत. त्यांना कोणत्याही वाङ्मयप्रकाराचे वावडे नाही. त्यांचे सर्व क्षेत्रांतील आणि विविध जातिधर्मातील माणसाशी घरोब्याचे, मैत्रीचे संबंध आहेत. असे अजात शत्रू असणारे व्यक्तिमत्त्व हे सार्वजनिक जीवनात आणि साहित्याच्या विश्वात अनेकांगाने वेगळे आहे. तरीही त्यांची उपेक्षाच झालेली आहे. याबद्दलची खंत त्यांनी कुठेही व्यक्त केलेली दिसत नाही. जीवनामध्ये अनेक संकटे झेलत हा माणूस महाराष्ट्रातील मराठवाड्याच्या एका खेड्यातून कोकणातील देवगड आणि त्यानंतर कर्नाटक, महाराष्ट्राच्या सीमाभागात राहून साहित्याच्या क्षेत्रात कोणी काहीही म्हणो; अविरतपणे दर्जेदार साहित्यनिर्मिती करीत आहे. या साहित्यिकाच्या साहित्याची दखल समीक्षक निश्चित घेतील. हे त्यांचे साहित्यिक योगदान साहित्याच्या कक्षा रुंदावणारे आहे. समाजपरिवर्तनाला दिशा देणारे आहे. कन्नड, मराठी या दोन भाषांच्या सीमाभागात राहून कन्नड आणि मराठी या भाषांतील सेतू ठरणारे आहे. त्यामुळे ते दुर्लक्षित राहणे शक्य नाही.

साहित्यामध्ये विशिष्ट प्रवाहात साहित्यसेवा करणारे, विशिष्ट वादामध्ये साहित्यनिर्मिती करणारे जातीय, धार्मिक, पंथीय आणि प्रांतीय भेदांना खतपाणी घालून अराजकता माजविणारे साहित्य आणि साहित्यिकांची आज कमी नाही. स्वार्थी वृत्तीने अवडंबर माजविणारेही पावलीचे पन्नास बघायला मिळतात; पण निःस्वार्थी वृत्तीने साहित्याकडे बघणारा, साहित्याच्या प्रांतात रममाण होणारा, साहित्याची सेवा करणारा, हा साहित्यिक तेत्तीस वर्षांपासून 'साहित्य समन्वय' हे नियतकालिक तौलनिक विचारांना वाहिलेले अखंडितपणे चालवीत आहे. त्यासाठी कोणाकडूनही कसलीही मदत, वर्गणी किंवा फी घेतलेली नाही. हे सीमाभागातील कन्नड, मर[illegible] भाषाभगिनींना जोडणारे अतिशय महत्त्वाचे



Scanned with OKEN Scanner

खोटे बोलत सांगतात. या ठिकाणी लेखकाने चिंता व्यक्त केली आहे.

'पुन्हा एकदा हलकंफुलकं' या ग्रंथामध्ये 'चूक आणि बरोबर', 'तेथे पाहिजे जातीचे', 'मृत्यू', 'मन आणि मान', 'दुकानदार व ग्राहक', 'मुलाखत', 'दात : एक समस्या', 'सावध आणि बेसावध', 'सौंदर्य', 'थुंकणे : एक संस्कृती' असे दहा लेख विविध विषयांवरील चिंतनात्मकता प्रकट करणारे आहेत. त्यामधून लेखकाची संवेदनशीलता दिसून येते.

'सरमिसळ' या पुस्तकात 'चक्रधारी', 'पडणे आणि चढणे', 'नाक आणि नेक', 'दवाखाना' हे ललित लेख समाविष्ट केलेले आहेत. 'चक्रधारी' या लेखामध्ये लेखकाने कार चालविणाऱ्या कारचालकाचा प्रारंभी सभ्य व विनम्र स्वभाव तो जसा निर्ढावतो, तसा त्याचे अनेक रंग दिसू लागतात. त्यामुळे लेखकाला त्या चक्रधारीला साष्टांग नमस्कार घालण्याची पाळी येते, याचे लेखकाने विविध प्रसंगांतून चित्रण केले आहे, तर 'पडणे आणि चढणे' या लेखामध्ये पडण्याची अनेक कारणे विविध घटनांच्या आधारे चर्चा करून वाट चुकल्याने माणसे पडत असतात, हे नमूद केले आहे.

माणसाच्या आयुष्यात अनेक बरेवाईट प्रसंग येत असतात; परंतु त्या प्रसंगाच्या संदर्भात आपण चूक की बरोबर वागलो, याचा विचार न करता जीवनप्रवास करतात, ती माणसे शहाणे आणि Great असतात. हे लेखकाने त्यांच्यासंदर्भात घडलेल्या अनेक अनुभवातून मांडलेले आहे. त्यांचे पुण्याहून एक पार्सल आलेले असते. त्या पार्सलला नंबर सांगूनही पावती नसल्याने ते मिळत नाही.

'चूक की बरोबर' यासंदर्भात माणसांच्या जीवनात येणाऱ्या घटिताचा काळ, वेळ व परिस्थितीही कारणीभूत असावी. त्यामुळे कसलीही चूक नसताना किंवा अपेक्षित नसणाऱ्या घटना घडतात. त्या माणसांना थांबविता येत नसल्याने माणसे जर-तरचे गणित बांधतात; परंतु ते खरे नसते, हे लेखकाने अनुभवातून पटवून दिले आहे. कार चालवीत असताना त्यांच्या कारसमोर अचानक स्कूटरस्वार येतो म्हणून ते ब्रेक मारतात. त्यावेळी पाठीमागून मोटारसायकलची धडक बसते. या प्रसंगात चूक-बरोबर कोण? स्कूटरस्वार, मोटारसायकलवाला की ब्रेक लावणारे लेखक? असा प्रश्न उपस्थित करून ती ती वेळ, प[illegible]स्थिती त्यावेळी



कारणीभूत असल्याचे लेखकाने स्पष्ट केले आहे.

जात ही जन्मापासून आणि कळायला लागल्यापासून छळू लागली होती. मॅट्रिक आणि महाविद्यालयांनी शिक्षण घेतानाही तिने पाठ सोडली नाही. जातीमुळे अनेक सोयी झाल्या, तशाच गैरसोयीही झालेल्या आहेत, याची जाणीव 'तेथे पाहिजे जातीचे' या लेखात व्यक्त होताना दिसते. देखणे रूप वाण्याबामणाचे असते, असा समज असल्याने लेखक उपाशी असताना त्यांच्यासमोर कुत्र्याला भाकरी टाकणारे वारकरी आहेत. धर्म, पंथ व संप्रदायाचे ज्ञान शिक्षणामुळे होते. एवढेच नाही, तर जात ही माणसाची गरज होते. कोकणात जातीमुळे लेखकाला खोली मिळाली नाही, मिळाली ती विहीर व तुळशीवृंदावनाला स्पर्श न करण्याच्या बोलीवर, तर औरंगाबाद येथे शिक्षण घेत असताना शांतीपुऱ्यात खोली बघायला गेल्यावर वेल्कीने जात विचारली आणि लेखकाने जात सांगताच तिने लेखकाच्या गालावरून दोन्ही हातांचे तळवे फिरवून डोक्यावर कडकडून बोटे मोडली. तेव्हापासून तिने लेखकाला भाऊ मानले. लेखकाला खोलीबरोबर जातीमुळे बहीणही मिळाली. ती जातीतील कसदार-दमदारपणामुळेच, हे लेखकाने त्या त्या जातीच्या समूहगटाच्या प्रसंगातून दाखविलेले आहे.

लेखकाची आई, आजी, दादा, म्हातारा, म्हातारी यांच्या मृत्यूचे प्रसंग मनाला चटका लावणारे आहेत. कुठे, कधी, कोण, कशाने मरेल, हे सांगता येणार नाही. लेखकाचा मित्र प्रवास करताना त्याच्या कारवर झाडाची जळती फांदी पडून जळून मेला, तर एक प्राध्यापक घरात हसत हसत तोंड उघडे ठेवून मेला. सतत दारू पिणारा लेखकाचा मित्र उंदराने पाय कुरतडल्याने गँगरीन होऊन मेला. लेखकाने आपल्या जवळच्या अनेक मित्रांच्या मृत्यूच्या कथा चित्रित करून त्यातून मृत्यू हा निश्चित ठरलेला असतो. त्याची कल्पना माणसांना नसली, तरी त्याचे वेळापत्रक ठरलेले असते. त्यापुढे माणसांना नतमस्तक व्हावे लागते, हे 'मृत्यू' या लेखातून स्पष्ट केले आहे. त्यामधून त्यांची चिंतनशीलता प्रकट होते.

'माणसे आणि माणसे' या लेखामध्ये डॉ. गायकवाड यांनी परिस्थितीनुसार आणि श्रीमंती आल्याने माणसे कशी बदलतात, यांची अनेक उदाहरणे देऊन माणसां[illegible] वागण्यातील बदलते स्वरूप मांडले

चालताना लंगडेपणा येतो. बोलताना तोतरेपणा येतो. एकू कमी येते. चालताना लंगडेपणा येतो. बोलताना तोतरेपणा येतो. विस्मरण ही उतारवयाची लक्षणे गायकवाड यांनी नमूद केलेली आहेत. विस्मरण वाढल्यामुळे छत्री विसरणे, चष्मा डोक्यावर घालून घरभर चष्म्याचा शोध घेणे, मोबाइल कुठे ठेवलाय याचा शोध घेणे, गॅस शेगडीचे बटन बंद करायचे विसरणे, चहा करताना चहाच्या पातेल्यात चहापूड न टाकता दुधात चहापूड टाकणे, कुलूप काढताना पेन घालणे... अशा प्रसंगांतून विनोद निर्माण होतात. काही प्रसंगी मोठी पंचाईतही झालेली दिसते. म्हणून गायकवाड म्हणतात, "चांगल्या गोष्टी स्मरणात व वाईट गोष्टी विस्मरणात जाव्यात. म्हातारपणात स्मरणशक्ती तेवढी अबाधित राहावी" हे विचार म्हातारपणातील विस्मरणाविषयीची चिंतनशीलता असल्याचे स्पष्ट होते. म्हातारपण आणि विस्मरण यांचा परस्परसंबंध लेखकाने उलगडून दाखविलेला आहे तसेच म्हातारपणाची जाणीव करून देणाऱ्या शरीर अवयवाविषयीचे चिंतन या लेखात डॉ. गायकवाड यांनी व्यक्त केले आहे.

'मी आणि माझे' या लेखात मी आणि माझे यासाठीच माणूस आयुष्यभर जगत-पळत असतो. मी आणि माझे यामधील स्वार्थ लेखकाने दाखवून देऊन माणसाची त्याचसाठी चाललेली धडपड ही शरीरात श्वास असेपर्यंत असते. लहान मुलांना कळायला लागल्यापासून ही जाणीव होते. त्या जाणिवेनेच तो जगत असतो. साधुसंतही अध्यात्मिक स्वार्थात अडकलेले असतात. लेखकाचा एक मित्र हॉटेलात काम करीत असताना गावची आठवण येते. तेथे माझी पत्नी आहे, म्हणून गावी जातो. मात्र, दोन-तीन दिवसांत आसवे ढाळीत परत येतो. कारण, भूकंप झाल्याने आई-वडील परागंदा होतात. त्यापूर्वीच बायको कुण्यातरी याराचा हात धरून गेलेली असते. प्रत्येक माणूस हा स्वार्थापोटी कातडी बचाव धोरण घेऊन जगत असतो. 'मी' आणि 'माझे' हा स्वार्थच माणसाला जगण्यास भाग पाडतो, हे लेखकाने विविध उदहारणांतून पटवून दिले आहे.

'पडणे आणि चढणे' या लेखात गायकवाड यांनी 'पडणे' या घटनेवरच बऱ्याच विस्ताराने भाष्य केले आहे. माणूस पडण्याने हशा पिकतो, हळहळ व्यक्त केली जाते किंवा अस्वस्थही वाटते. लेखकाच्या जीवनात पडण्याचे अनेक प्रसंग आलेले आहेत. त्या प्रसंगाने हशा पिकलेला नाही, इतर नातेवाईक अस्वस्थ झाले. त्यांनी हळहळ व्यक्त केली. मुली गळ्यात पडून रडलेल्या आहेत. अशा प्रसंगीही लेखकाने विनोद करण्याचे सोडलेले नाही. ते लिहितात, "मी त्यांना म्हणालो, मी डोळे वासून पाकिस्तानची सीमा बघत होतो. हे हाताने मला दाखवीत होते, तेवढ्यात आमच्याकडे डोळे फाडून बघाच तर डोळे फोडीन, बोट धरून दाखवले तर हात तोडून टाकू, असे म्हटल्याचा भास झाला असे वाटले. इतक्यात लांबूनही पाकिस्तानच्या लोकांना आम्ही बघतोय, हे दिसत असल्यामुळेच त्यांनी अदृश्य यंत्राने आमच्यावर मारा करून आम्हाला जायबंदी केले." ('सरमिसळ', पृ. १९) लहान मुलीच्या लग्नासाठी राजस्थान व गुजरात सीमेवरील एका गावामधून पाकिस्तानची सरहद्द दिसते. रात्री जेवण झाल्यानंतर लेखक व त्यांचे साडू इमारतीच्या माडीवरून त्या सरहद्दीवरच्या दिव्यांची प्रभावळ पाहतात. ती पाहत इमारतीवरून खाली उतरत असताना ते दोघेही पडतात. त्यांच्या साडूचा हात फ्रॅक्चर होतो, तर लेखकाच्या डोक्यावरच्या भुवईवर जखम होते. नाकातून रक्तस्राव होतो. भीतीने हात-पाय थंड पडतात, त्यावेळी जमलेल्या पाहुण्यांसमोर लेखकाने केलेला विनोद हा त्यांच्या प्रसंगावधनाची साक्ष देणारा आहे.

'वाद आणि वादंग' या लेखात 'वाद' या शब्दाचा मूळ अर्थ चर्चा असल्याचे स्पष्ट केले आहे. व्यक्ती, घटना व प्रसंगपरत्वे त्याचे स्वरूप बदलत असल्याचे डॉ. गायकवाड यांनी स्वतःच्या संदर्भात घडलेल्या नातेवाईक, कारचालक व कारकून यांच्या उदाहरणांतून माणसे ही तत्त्वबोधासाठी वाद करीत नसून स्वार्थासाठी करीत असतात. माणसाच्या उदयापासून वादाचा प्रारंभ जरी झालेला असला आणि विविध कारणांनी माणसे भांडत असली, तरी माणसाची परतत्त्व शोधासाठी यात्रा सुरू होईल. तेव्हाच भांडणाचा ऱ्हास होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

'वाद' या शब्दांना चर्चा, भांडण, तंटा, बखेडा, कलह, झगडा असे विविध अर्थ आहेत. भांडणाने एखाद्याला समाधान मिळते किंवा काहींना भांडणाची खुमखुमी असते, हे डॉ. गायकवाड यांनी त्यांच्या नातेवाईकाला केलेली मदत, त्यांना हवापालट म्हणून घरी आणून दाखविलेले औदार्य अशा अनुभवातून मांडले आहे. हेकेखोर, तर्कट, अहंकारी, आपले खरे



N.S.(B) College PHALTAN

Scanned with OKEN Scanner

एकू कमी येते. चालताना लगडपणा येतो. बोलताना तोतरेपणा येतो. ही उतारवयाची लक्षणे गायकवाड यांनी नमूद केलेली आहेत. विस्मरण वाढल्यामुळे छत्री विसरणे, चष्मा डोक्यावर घालून घरभर चष्म्याचा शोध घेणे, मोबाइल कुठे ठेवलाय याचा शोध घेणे, गॅस शेगडीचे बटन बंद करायचे विसरणे, चहा करताना चहाच्या पातेल्यात चहापूड न टाकता दुधात चहापूड टाकणे, कुलूप काढताना पेन घालणे... अशा प्रसंगांतून विनोद निर्माण होतात. काही प्रसंगी मोठी पंचाईतही झालेली दिसते. म्हणून गायकवाड म्हणतात, ''चांगल्या गोष्टी स्मरणात व वाईट गोष्टी विस्मरणात जाव्यात. म्हातारपणात स्मरणशक्ती तेवढी अबाधित राहावी'' हे विचार म्हातारपणातील विस्मरणाविषयीची चिंतनशीलता असल्याचे स्पष्ट होते. म्हातारपण आणि विस्मरण यांचा परस्परसंबंध लेखकाने उलगडून दाखविलेला आहे तसेच म्हातारपणाची जाणीव करून देणाऱ्या शरीर अवयवाविषयीचे चिंतन या लेखात डॉ. गायकवाड यांनी व्यक्त केले आहे.

'मी आणि माझे' या लेखात मी आणि माझे यासाठीच माणूस आयुष्यभर जगत-पळत असतो. मी आणि माझे यामधील स्वार्थ लेखकाने दाखवून देऊन माणसाची त्याचसाठी चाललेली धडपड ही शरीरात श्वास असेपर्यंत असते. लहान मुलांना कळायला लागल्यापासून ही जाणीव होते. त्या जाणिवेनेच तो जगत असतो. साधुसंतही अध्यात्मिक स्वार्थात अडकलेले असतात. लेखकाचा एक मित्र हॉटेलात काम करीत असताना गावची आठवण येते. तेथे माझी पत्नी आहे, म्हणून गावी जातो. मात्र, दोन-तीन दिवसांत आसवे ढाळीत परत येतो. कारण, भूकंप झाल्याने आई-वडील परागंदा होतात. त्यापूर्वीच बायको कुण्यातरी याराचा हात धरून गेलेली असते. प्रत्येक माणूस हा स्वार्थापोटी कातडी बचाव धोरण घेऊन जगत असतो. 'मी' आणि 'माझे' हा स्वार्थच माणसाला जगण्यास भाग पाडतो, हे लेखकाने विविध उदहारणांतून पटवून दिले आहे.

'पडणे आणि चढणे' या लेखात गायकवाड यांनी 'पडणे' या घटनेवरच बऱ्याच विस्ताराने भाष्य केले आहे. माणूस पडण्याने हशा पिकतो, हळहळ व्यक्त केली जाते किंवा अस्वस्थही वाटते. लेखकाच्या जीवनात पडण्याचे अनेक प्रसंग आलेले आहे... त्या प्रसंगाने हशा



पिकलेला नाही, इतर नातेवाईक अस्वस्थ झाले. त्यांनी हळहळ व्यक्त केली. मुली गळ्यात पडून रडलेल्या आहेत. अशा प्रसंगीही लेखकाने विनोद करण्याचे सोडलेले नाही. ते लिहितात, ''मी त्यांना म्हणालो, मी डोळे वासून पाकिस्तानची सीमा बघत होतो. हे हाताने मला दाखवीत होते, तेवढ्यात आमच्याकडे डोळे फाडून बघाच तर डोळे फोडीन, बोट धरून दाखवले तर हात तोडून टाकू, असे म्हटल्याचा भास झाला असे वाटले. इतक्यात लांबूनही पाकिस्तानच्या लोकांना आम्ही बघतोय, हे दिसत असल्यामुळेच त्यांनी अदृश्य यंत्राने आमच्यावर मारा करून आम्हाला जायबंदी केले.'' ('सरमिसळ', पृ. १९) लहान मुलीच्या लग्नासाठी राजस्थान व गुजरात सीमेवरील एका गावामधून पाकिस्तानची सरहद्द दिसते. रात्री जेवण झाल्यानंतर लेखक व त्यांचे साडू इमारतीच्या माडीवरून त्या सरहद्दीवरच्या दिव्यांची प्रभावळ पाहतात. ती पाहत इमारतीवरून खाली उतरत असताना ते दोघेही पडतात. त्यांच्या साडूचा हात फ्रॅक्चर होतो, तर लेखकाच्या डोक्यावरच्या भुवईवर जखम होते. नाकातून रक्तस्राव होतो. भीतीने हात-पाय थंड पडतात, त्यावेळी जमलेल्या पाहुण्यांसमोर लेखकाने केलेला विनोद हा त्यांच्या प्रसंगावधनाची साक्ष देणारा आहे.

'वाद आणि वादंग' या लेखात 'वाद' या शब्दाचा मूळ अर्थ चर्चा असल्याचे स्पष्ट केले आहे. व्यक्ती, घटना व प्रसंगपरत्वे त्याचे स्वरूप बदलत असल्याचे डॉ. गायकवाड यांनी स्वतःच्या संदर्भात घडलेल्या नातेवाईक, कारचालक व कारकून यांच्या उदाहरणांतून माणसे ही तत्त्वबोधासाठी वाद करीत नसून स्वार्थासाठी करीत असतात. माणसाच्या उदयापासून वादाचा प्रारंभ जरी झालेला असला आणि विविध कारणांनी माणसे भांडत असली, तरी माणसाची परतत्त्व शोधासाठी यात्रा सुरू होईल. तेव्हाच भांडणाचा ऱ्हास होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

'वाद' या शब्दांना चर्चा, भांडण, तंटा, बखेडा, कलह, झगडा असे विविध अर्थ आहेत. भांडणाने एखाद्याला समाधान मिळते किंवा काहींना भांडणाची खुमखुमी असते, हे डॉ. गायकवाड यांनी त्यांच्या नातेवाईकाला केलेली मदत, त्यांना हवापालट म्हणून घरी आणून दाखविलेले औदार्य अशा अनुभवातून मांडले आहे. हेकेखोर, तर्कट, अहंकारी, आपले खरे

(८)

# डॉ. बाबुराव गायकवाड यांच्या ललितलेखनातील चिंतनशीलता

– डॉ. सतेज दणाणे

डॉ. बाबुराव गायकवाड हे मराठी साहित्यविश्वात परिचित झालेले आहेत. त्यांनी वाङ्मयाच्या सर्वच प्रकारांत लेखन केले आहे. 'झळ' (१९८०), 'आग' (१९९०), या कादंबऱ्या; 'बाज' (१९८४) हा कथासंग्रह; 'टिळा आणि इतर नाटिका' (१९९२) हे नाटक; 'हुंदका' (१९८८), 'सारे काही' (१९९४), 'स्वप्नील' (२००८) हे कवितासंग्रह; 'दानचिंतामणी अत्तिमब्बे' (१९९५) हे चरित्र; 'साहित्यवैभव' (१९९८) हा अनुवादित लेखसंग्रह; 'जिप्सी' (२००२), 'आजचा माणूस' (२००७), 'गरिबांचा वाली' (२०१३) ही अनुवादित नाटके; 'कविवर्य भा. रा. तांबे यांची कविता' (२००५) हे संपादन; 'साहित्यसंवाद' (२०१०) हे मुलाखतीचे पुस्तक; 'दलितेत्तर लेखक आणि दलित जीवन' (१९९४), 'दृष्टिक्षेप' (१९८६), 'आकलन' (१९९२), 'साहित्यवेध' (२०००), 'अवलोकन' (२००८) हे समीक्षाग्रंथ; 'माणसे : जनातली आणि मनातली' (२०१२) हे व्यक्तिचित्रणाचे पुस्तक; 'सरमिसळ' (२०१३), 'बाकी काही' (२०१४) हे संमिश्र स्वरूपाचे ग्रंथ आणि 'हलकंफुलकं' व 'पुन्हा एकदा हलकंफुलकं' ही ललितलेखन... दोन पुस्तके; 'अंबुज' (२०१४) हे आत्मकथनात्मक लेख अशी सन्मानीय

ग्रंथांची निर्मिती डॉ. गा... यांच्या ल...
प्रस्तुत शोधनिबंधात त्यांच्या 'हलकंफुलकं' (२०१२) व 'पुन्हा एकदा हलकंफुलकं' (२०१३) आणि 'सरमिसळ' (२०१३) आणि ... 'हलकंफुलकं' (२०१२) व 'पुन्हा एकदा हलकंफुलकं' ललितलेखनाच्या पुस्तकानंतर 'सरमिसळ' (२०१३) आणि 'बाकी काही' (२०१४) या ग्रंथांमध्येही त्यांनी काही ललित लेख लिहिल्याचे आढळतात. त्यांचे लखन समन्वय दृष्टीचे असून, जीवनाविषयक आणि वैचारिक चिंतनशीलता प्रकट करताना दिसते. प्रस्तुत ठिकाणी त्यांच्या ललितलेखनातील चिंतनशीलतेचा शोध घेतलेला आहे.

## सुसंस्कारविषयक चिंतनशीलता

माणसावर चांगले संस्कार झाले, तर माणसाचे मन व शरीर बलदंड होईल. सुसंस्कार झाल्याचे हे विश्व सुंदर होईल, अशी अपेक्षा डॉ. गायकवाड यांची असलेली दिसते. मन चांगले सुसंस्कारित असेल, तरच मान मिळतो. मानसन्मान हा मागून मिळत नाही किंवा विकतही मिळत नाही, म्हणून सूर्याप्रमाणे माणसाने वागावे; की ज्यामुळे माणसांनी मनाने मान दिला पाहिजे. तो कुणीही हिरावून घेणार नाही, हे 'मन आणि मान' या लेखात स्पष्ट केले आहे. यामधून सुसंस्कारित मनाविषयीची चिंतनशीलता व्यक्त झालेली दिसते, तर 'थुंकणे : एक संस्कृती' या लेखात देशाचे भविष्य व भवितव्य हे माणसांच्या हातात नसून माणसांच्या तोंडातही आहे, हे सूचित करताना माणसे आचारविचारांनी सुसंस्कृत असावीत; पण ती नाहीत, याची खंत व्यक्त केली आहे. ते लिहितात, 'अलीकडे येथे कचरा टाकू नये, मल–मूत्र विसर्जन करू नये, येथे वाहने पार्क करू नयेत, अशा पाट्यांप्रमाणे काही इमारतीत 'येथे थुंकू नये' असे लिहिलेले असते. इमारत अनेक मजली असेल, तर पायऱ्यांवरून जाणारा व्यसनी माणूस हमखास कोपरा बघून एक–दोन वेळा तरी हळूच थुंकत असतोच.' ('पुन्हा एकदा हलकंफुलकं', पृ. ६१) हे थांबावे, म्हणून काही ठिकाणी देवांचे फोटो लावलेले असतात; तर सार्वजनिक ठिकाणी धूम्रकक्ष उघडलेले आहेत. त्याप्रमाणे पिकदाण्या ठेवाव्यात, असेही लेखकाने सूचित केले आहे. मात्र, या प्रयत्नाने काहीच साध्य होत नाही. त्यासाठी आचारही सुसंस्कृत असण्याची गरज आहे, ...च थुंकण्याची संस्कृती लोप पावेल

अभिमानच वाटत असतो. लेखकाने जातीमुळे आलेले चांगले आणि वाईट असे अनेक प्रसंग या लेखात मांडले आहेत. त्यावरून माणूस हा जातीला चिकटून असतो हे दिसून येते. लेखक लिहितो, 'ज्या जातीला इभ्रत आहे, त्या जातीच्या माणसाला काही गोष्टी सहजपणे मिळतात, इतरांपेक्षा काही माणसे त्यामुळेच आरामात राहू शकतात.' ('पुन्हा एकदा हलकंफुलकं', पृ. २०) हे लेखकाचे विधान यथार्थ आहे. म्हणून समाजामध्ये विषमता आणि जातीय दरी निर्माण झालेली आपण पाहतो. लेखकाला जातीमुळे भोगावे लागलेले दुःख फार भयंकर आहे तसेच जातीमुळे त्यांना भाड्याची रूपे बघायला गेल्यावर बहीणही मिळाली आहे. कोल्हापुरात एका हॉटेलात जेवायला गेल्यावर त्यांना तेथील म्हातारीने त्यांचा जातीचा समजून जेवण दिले होते. जातीमुळेच माणसे एकमेकांना जवळ करतात. जातीबाहेरच्यांना तेवढ्या आपुलकीने कोण जवळ करीत नाही, हे भारतीय समाजवास्तव आहे. लेखकाने 'पाहिजे जातीचे' या लेखात 'जात' या समाजवास्तवाविषयी केलेल्या चिंतनाला मूल्यांकनता प्राप्त झालेली आहे.

**स्वार्थी वृत्तीचा चिंतनात्मक वेध**

डॉ. गायकवाड यांनी 'मी व माझे', 'खुर्ची', 'माणसे आणि माणसे', 'सावध आणि बेसावध' अशा लेखांमधून माणसाच्या स्वार्थी वृत्तीचा चिंतनात्मक वेध घेतलेला आहे. माणसाने स्वार्थी वृत्तीमुळे आपली नीतिमत्ता टाकून दिली आहे. मित्र ही आपली मैत्री जपत नसल्याचा अनुभव आजकाल सर्वांनाच येतो. त्याचे कारणही प्रत्येक माणसात स्वार्थी वृत्ती वाढत आहे हेच आहे. माणूस जेव्हा खोटे बोलतो, तेव्हाही खोटे बोलण्यामागे त्यांचा स्वार्थच असतो. खोटे बोलणे हे माणसाच्या अंगवळणी पडले आहे. मोबाइलसारखी साधने खोटे बोलण्याची माध्यमे झालेली आहेत. एकप्रकारे खोटे आणि खरे यामधील सीमारेषा मानवाने संपविलेल्या आहेत असेही वाटते. सरसकट माणसे खोटे बोलत नसल्याचे खोटे बोलत सांगतात. या ठिकाणी लेखकाने चिंता व्यक्त केली आहे. 'डॉ. बाबुराव गायकवाड यांचे ललित लेखन' (पृ. ९), 'मी' आणि 'माझे' या अहंकारातून माणसाच्या वाट्याला बहुतेक समस्या येतात. [illegible] माणूस हा स्वतःपुरताच विचार करीत असतो. माझे घर, माझे [illegible] समाज, माझे राष्ट्र हे म्हणण्यामध्ये स्वार्थच दडलेला असतो. मात्र, माझे माझे म्हणणाऱ्या माणसाचा शेवट हा त्यांच्या माणसांत, गावात तरी होतो का, असा प्रश्न लेखकाने उपस्थित केलेला आहे. लेखकाने माणसातील स्वार्थी वृत्तीचा वेध अनेक लेखांमधून घेतलेला आहे.

डॉ. बाबुराव गायकवाड यांची चिंतनशीलता ही विस्तीर्ण, प्रगल्भ आणि गंभीर स्वरूपाची आहे. ते माणसातील स्वार्थी वृत्तीचा जसा वेध घेतात, तसा माणसाच्या सुसंस्काराविषयीही चिंता व्यक्त करतात. माणसाच्या आचारविचारांत आणि वर्तनात सौंदर्य शोधतात; त्याबरोबर माणसाने सावध असले पाहिजे, असे नाही तर सावध आणि बेसावध यामधील नेमका क्षण पकडला पाहिजे, याचे सूचन करतात. खरी आणि जीवाभावाची मैत्री दुर्मिळ झाल्याची जशी त्यांना चिंता आहे, तसे जात ही कसदार आणि दमदार असेल, तर माणसाला सर्व गोष्टी आरामात मिळत असल्याचे विविध अनुभवांतून स्पष्ट करतात. याशिवाय, नीतितत्त्वाचा शोध घेण्याचा ते प्रयत्न करतात. त्यांची चिंतनशीलता ही सत्य मांडणारी, वास्तवाचा आधार असणारी, माणसामाणसांतील अनेक वृत्ती, प्रवृत्ती मांडणारी आहे. एकंदरीत डॉ. गायकवाड यांच्या ललितलेखनातील विचार हे गंभीर, वैचारिक असून, ते जीवननिष्ठ चिंतनशीलता व्यक्त करणारे आहेत. ते समाजजागृती करणारे आणि समाजप्रबोधन करणारे आहेत, तसेच तात्त्विक स्वरूपाचे आणि समन्वय साधणारेही आहेत.

प्रस्तुत शोधनिबंधात डॉ. गायकवाड यांच्या ललितलेखनातील चिंतनशीलतेचा विचार केला आहे, त्यांच्या ललितलेखनाचे अनेक विशेष दाखविता येतात. त्यांचे ललितलेखन हे मराठी ललितलेखनापेक्षा अनेक अंगाने वेगळे आहे. त्यांनी म्हणी व वाक्प्रचारांचा केलेला वापर हा लेखांची उंची वाढविणारा आहे. त्यामुळे लेखनाला भारदस्तपणा आलेला आहे. शाब्दिक कोट्या आणि प्रसंगनिष्ठ विनोद हे त्यांच्या लेखनाचे एक विशेष आहे. परिणामकारक शेवट आणि लक्षवेधक शीर्षके, कंसामध्ये सढळ माहिती देणे, प्रांजळपणा, आत्माविष्कार, व्यवहारातील दाखले, आटोपशीरपणा, विरोधी शब्द, [illegible] कान्यामुळे बदलणारे शब्दाचे अर्थ [illegible] गाणी, कविता, गझल चित्रपटांतील संदर्भ

Scanned with OKEN Scanner

'हलकं–फुलकं, पुन्हा एकदा हलकं–फुलकं, तिसऱ्यांदा हलकं–फुलकं' ललित लेखांची ही त्रिस्तरीय शृंखला, मालिका वाचकांच्या मनाचा आणि त्यांच्या जगण्याशी निगडित असणाऱ्या दैनंदिन जीवनाचा ठाव घेते, समतोल मांडते, तो खऱ्या अर्थाने मनामनांत आपलाच आपल्याला शोधण्याचा प्रयत्न करीत आत्मशोधाची एक वाट निर्माण करीत जातो. साध्या, सोप्या गोष्टीतून, अनुभवातून आपल्याला शिकण्यासारख्या अनेक गोष्टी आहेत; ज्यांतून आपल्या जगण्याला अर्थ प्राप्त होतो. जगणं सुकर आणि समाधानी होत असतं.

हलकं–फुलकं लघुनिबंधाच्या संपादनाच्या वैचारिक मंथनातून जी मांडणी प्रा. डॉ. बाबुराव गायकवाड सरांच्या लेखनशैलीचा, त्यांच्या वास्तव आणि परखड मांडणीचा, त्यांच्या स्वानुभवाचा विचार ज्या लेखकांनी मांडला आहे, तो विचार निश्चितपणे सामाजिक स्वास्थ्याच्या दृष्टीने महत्त्वाचा वाटतो.

– डॉ. मिलिंद विनायक बागूल

जळगाव (महाराष्ट्र)

COLLEGE * N.S.(B) PHALTAN

आता ई-बुक स्वरूपातही
अथर्वची सर्व पुस्तके उपलब्ध...
pejbook.com
amazon.com
Google Play Books
atharvapublications.com

अथर्व पब्लिकेशन्स्
ऑनलाईन पुस्तक खरेदीकरिता...
www.atharvapublications.com
ISBN 978-93-94269-46-0
₹ - 175/-

Scanned with OKEN Scanner

# महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषद

नोंदणी क्रमांक महाराष्ट्र/४११२ कोल्हापूर
सार्वजनिक न्यास नों. क्र. के–एफ ४१५३

कार्याध्यक्ष
प्रा. सुनिल गवरे
मो. ८६५५०३२६०२
sunildattgavare@gmail.com

अध्यक्ष
प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार
मो. ९४२२९४९९६६
kumbharnl@gmail.com

उपाध्यक्ष
डॉ. मोहनराव देशमुख
मो. ९७६३३९४६३३
deshmukhmohan568@gmail.com
डॉ. संगीता पांडे
मो. ९४२३३६२२०१
pande.sangita@rediffmail.com
डॉ. सुधीर पिटके
मो. ९९७८६७५९३३
nipitke@gmail.com

खजिनदार
डॉ. अमन बगाडे
८६००५५७३९३
bagade.aman21@gmail.com

कार्यवाह
डॉ. ग्यानदेव उपाडे
मो. ७०३०७२९६२३
gmupade20@gmail.com
प्रा. विजय कंची
मो. ९४०३६७३६९८
vskanchi@gmail.com
डॉ. नवनाथ रासकर
मो. ९६६५४०९४१७
nkraskar95@gmail.com

सदस्य
श्री. उद्गम विकासान्त
९५८८०६५०८८
डॉ. सखाराम गोरे
९४२३४४०६२२
डॉ. सुनिल काळमेघ
९४२१८२३२५०
डॉ. अतुल महाजन
मो. ८२३७०५९५९५
डॉ. हरीष नवले
मो. ९८५०११११५९
श्री. हरिभाऊ खुरंगे
मो. ९७६३७२६३३०

सल्लागार
डॉ. सदानंद मोरे
डॉ. शुभदा जोशी
डॉ. सुरेंद्र गायधने
डॉ. भाऊसाहेब काळे

दिनांक : ०७/०३/२०१९

प्रती,
मा. डॉ. तेजश्री रायते
नामदेवराव सुर्यवंशी (बेडके) महाविद्यालय फलटण
ता. फलटण, जि. सातारा

सप्रेम नमस्कार..!

आधुनिक युग हे विज्ञानाचे युग आहे. या युगात व्यक्ति स्वातंत्र्याच्या नावाखाली चंगाळवाद फोफावत चालला आहे. परिणामी नैतिक मूल्यांची जोपासणा करण्यासाठी जनमानसात अध्यात्म व नैतिकतेवर अधारित विचार रुजविने गरजेचे बनले आहे. किंबहुना ही आपल्या सारख्या बुद्धीवंतांची जवाबदारीच. याच भावनेतून महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषदेच्या वतीने 'संतांचे तत्त्वज्ञान' या शिर्षकाचे एक संपादित ग्रंथ प्रकाशित करण्याचा आमचा मानस आहे.

आमचा असा विश्वास आहे की, आपन 'संत मुक्ताबाई यांचे तत्त्वज्ञान' या विषयाला न्याय देऊ शकता. तेव्हा आपण या विषयाला अनुसरुन एक प्रकरण लिहावे अशी आमची विनंती आहे. आपन आमच्या विनंतीचा मान ठेवून दिनांक १०/०६/२०१९ पुर्वी महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषदेकडे आपले प्रकरण पाठवावे. व खऱ्या अर्थाने आधुनिक युगात नैतिक मूल्यांची जोपासणा करण्यास हातभार लावावा !

टीप :

१. लिखानाची मांडणी ही अध्यात्मशास्त्र (ईश्वर, भक्ति), ज्ञानशास्त्र (प्रमाणमीमांसा) आणि नीतिशास्त्र या तीन विभागाला अनुसरुन असावी.
२. लिखान संशोधनाच्या पद्धतीला (संदर्भ/तळ टिप/सुची ग्रंथ) अनुसरुन असावे.
३. शक्यतोवर संतांच्या मूळ विचारांचा दाखला द्यावा. (विश्लेषण मोजक्या शब्दात करावे)
४. साधारणतः ३००० ते ३५०० शब्दात प्रकरणाची मांडणी करावी.
५. अक्षेपार्ह, वादातीत मुद्दे टाळावेत.
६. फॉन्ट कृतीदेव ५१ वापरावा.

ही विनंती.

आपला
डॉ. सुनिलदत्त गवरे
संपादक तथा कार्याध्यक्ष म.त.प.
कार्याध्यक्ष
महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषद

Scanned with OKEN Scanner

# संतांचे तत्त्वज्ञान

संपादक -
प्रा.डॉ. सुनिलदत्त गवरे




Principal
Namdevrao Suryawanshi(Bedke) College
Phaltan.Dist.Satara.
Scanned with OKEN Scanner

COLLEGE PHALTAN (B) S.N

# संतांचे तत्त्वज्ञान

डॉ. तेजश्री रामने
यांना सप्रेम भेट

-: संपादक :-
**डॉ. सुनिलदत्त गवरे**
तत्त्वज्ञान विभागप्रमुख,
शिवळे महाविद्यालय, शिवळे, ता. मुरबाड, जि. ठाणे

अथर्व पब्लिकेशन्स

Scanned with OKEN Scanner

N.S.(B) COLLEGE PHALTAN

अथर्व पब्लिकेशन्स

संतांचे तत्त्वज्ञान

© सुरक्षित

ISBN : 978-93-94269-19-4
पुस्तक प्रकाशन क्र. ९३४

**प्रकाशक व मुद्रक**
युवराज भटू माळी

**अथर्व पब्लिकेशन्स**
**धुळे :** १७, देविदास कॉलनी, वरखेडी रोड, धुळे- ४२४ ००१.
**संपर्क :** ९४०५२०६२३०
**जळगाव :** शॉप नं. २, नक्षत्र अपार्टमेंट, शाहूनगर हौसिंग सोसायटी,
तेली समाज मंगल कार्यालयासमोर, जळगाव- ४२५ ००१.
**संपर्क :** ०२५७-२२३९६६६, ९७६४६९४७९७
**ई-मेल :** atharvapublications@gmail.com
**वेबसाइट :** www.atharvapublications.com

**प्रथम आवृत्ती :** जून २०२०
**द्वितीय आवृत्ती :** २२ जून २०२२
**अक्षरजुळवणी :** अथर्व पब्लिकेशन्स
**मूल्य :** २९५/-

---

**E-Book *available on***
**amazon.in ▪ GooglePlayBooks ▪ atharvapublications.com**

**ऑनलाइन पुस्तक खरेदीसाठी www.atharvapublications.com**

या पुस्तकातील कोणत्याही भागाचे पुनर्निर्माण अथवा वापर इलेक्ट्रॉनिक अथवा यांत्रिकी साधनांनी - फोटोकॉपिंग, रेकॉर्डिंग किंवा कोणत्याही प्रकारे माहिती साठवणुकीच्या तंत्रज्ञानातून प्रकाशकाच्या व लेखकाच्या लेखी परवानगीशिवाय करता येणार नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत.



Scanned with OKEN Scanner

N.S.(B) COLLEGE PHALTAN

# अनुक्रमणिका


- मनोगत ........................................ ०७
- प्रस्तावना ........................................ ०९

१. संत बसवेश्वर (११०५) ........................................ १३
डॉ. वेदप्रकाश डोणगावकर

२. संत सावता (१२५०) ........................................ २२
डॉ. नवनाथ रासकर

३. संत जनाबाई (१२५८) ........................................ ३२
डॉ. सचिन खोकले

४. संत नामदेव (१२७०) ........................................ ४०
डॉ. गणेश बेळंबे

५. संत ज्ञानेश्वर (१२७५) ........................................ ४९
डॉ. राधिका पाठक

६. संत मुक्ताबाई (१२७९) ........................................ ६४
डॉ. तेजश्री रायते

७. संत कबीर (१३७०) ........................................ ७३
डॉ. प्रकाश धुमाळ

८. संत एकनाथ (१५३३) ........................................ ८२
डॉ. विजय शेंडगे

९. संत रामदास स्वामी (१६०८) ........................................ ९३
डॉ. बाळासाहेब मुळीक

१०. संत तुकाराम (१६०८) ........................................ १०४
डॉ. प्रभाकर कीर्तनकार




Scanned with OKEN Scanner

N.S.(B) COLLEGE PHALTAN

# संत मुक्ताबाई

- डॉ. तेजश्री रायते

आजच्या संगणक युगात व एकविसाव्या शतकात स्त्रीशक्तीने भव्य-दिव्य उंची गाठलेली आहे. संतसाहित्यातही ही परंपरा तितक्याच ऊर्जेने व ताकदीने सुरू होऊन आजही ती तशीच अविरतपणे चालू आहे. संतसाहित्य हे परमेश्वराचे भजन, कीर्तन, स्तवन, सत्याची, आनंदाची, प्रेमाची शाश्वती, विश्वनिर्मितीचे कोडे आध्यात्मिक उन्नती याने समृद्ध होऊन त्यात आजच्या युगात आणखीनच भर पडून संतसाहित्य हे युवा वर्गाच्या भरकटलेल्या अवस्थेला जिज्ञासा व वास्तवतेची जाणीव निर्माण करून देण्यास सहाय्यभूत ठरत आहे. अगदी तेराव्या शतकातील स्त्री संत कवयित्री जनाबाई, बहिणाबाई यांनी 'स्त्री जन्म म्हणुनी न व्हावे उदास' असे स्पष्ट केले, याचीच प्रचिती संत मुक्ताबाईंनी समाजास करून दिली.

संत मुक्ताबाईंचा जन्म इंद्रायणीकाठावर वसलेले आळंदी गाव व गावाजवळील सिद्धेश्वर बेटावर आश्विन शुद्ध प्रतिपदा शुक्रवार, शके १२०१ म्हणजे सन १२७९ मध्ये झाला. त्यांच्या आई-वडिलाचे मूळ गाव औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण तालुक्यातील आपेगाव होते. वडील विठ्ठलपंत व आईचे नाव रुक्मिणी होते. विठ्ठलपंतांनी संन्यास घेऊन परत गृहस्थी स्वीकारल्यानंतर त्यांना निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान व मुक्ताबाई ही चार मुले झाली. विठ्ठलपंतांनी संन्यास घेऊन परत गृहस्थाश्रम स्वीकारल्याने समाजाने या कुटुंबाला वाळीत टाकले. अभ्यासाअंती खूप आटापिटा केल्यावर तेथील न्यायव्यवस्थेने या दाम्पत्यास देहांत प्रायश्चित्ताची शिक्षा दिली व ती मान्य केल्यामुळे ओघानेच कुटुंबाच्या गृहिणीपदाची नाजूक व अवघड अशी जबाबदारी मुक्ताबाईंवर येऊन पडली. मुक्ताबाईंनी केवळ हीच जबाबदारी पार पाडली नाही, तर ज्ञानियांच्या राजाला ज्ञान देऊन 'ज्ञानेश्वरी' लिहिण्यास मार्गदर्शनही केले.

खरेतर मुक्ताबाईचे हे अध्यात्मशास्त्र मग त्यात चांगदेवांबद्दलचे उद्गार असोत, संत नामदेवांना केलेला उपदेश असो किंवा संत ज्ञानेश्वरांना ताटीच्या अभंगामधून केलेला उपदेश असो; या सर्वांमध्ये मुक्ताबाईंनी सांगितलेले ईश्वर कशात आहे, त्याची भक्ती कशी करावी, संताची- साधूची लक्षणे



Scanned with OKEN Scanner

कोणती असावीत; त्याचप्रमाणे जगत् ब्रह्म माया, शरीर, मन संबंध या सर्वांची तत्त्वज्ञानात्मक चर्चा केलेली आढळते; त्याचबरोबर आज आपणांस भेडसावणारे जे प्रश्न आहेत, त्यामुळे आपले शारीरिक व मानसिक आरोग्य धोक्यात येत आहे आणि आपणांस मानसिक समस्येसाठी जशी समुपदेशनाची अत्यंत निकड भासत आहे. त्याही मानसशास्त्राची शाखा म्हणजेच तत्त्वज्ञान या तत्त्वज्ञानातूनच मुक्ताबाईंनी स्वत:चे समुपदेशन वर्णन केले आहे.

ज्याप्रमाणे दोन युद्धांच्या प्रसंगी नातेवाईकांना व स्नेहीजनांना शत्रू म्हणून उभे झाले, तेव्हा भगवान श्रीकृष्णांनी गीता सांगून अर्जुनास युद्ध प्रवृत्त केले; त्याचप्रमाणे संत मुक्ताबाईंच्या ताटीच्या अभंगाची तुलना करता येईल. श्रीकृष्णाने गीतेत कर्मयोग सांगितला, तर संत मुक्ताबाईंनी संत ज्ञानदेवांना संतत्व स्पष्ट केले.

मुक्ताबाईंचे साहित्य हे कल्याण, पत्रिका, मनन, ताटीचे अभंग, हरिपाठ इत्यादी आहे. या सर्वांचा विचार व अभ्यास करू पाहता, मुक्ताबाईंच्या ताटीच्या अभंगामध्ये नीतिशास्त्र ईश्वरभक्ती व संतांची लक्षणे यांचे तत्त्वज्ञान भांडारच आहे. असे वाटते म्हणूनच इथे या अभंगाची तत्त्वज्ञानात्मक चर्चा करणे महत्त्वाचे वाटते.

संत मुक्ताबाईंची ग्रंथरचना ही अमूल्य आहे. या ग्रंथरचनेत गुरुभक्तीचे अध्यात्म सांगणारे अभंग आहेत. या अभंगांच्या कालनिर्णयाविषयी मतभेद आहेत. कारण, ज्यावेळी संत ज्ञानेश्वर त्या वेळच्या समाजकालीन परिस्थितीविषयी अवाक् होतात व आपल्या ध्यानगुफेत जाऊन बसतात, तेव्हा ते आतून ताटी (कडी) लावून घेतात. त्यावेळी संत मुक्ताबाईंनी ताटीचे अभंग गायले. हे अध्यात्मातील अखंड मानसिक सुबत्तेचे उत्तम उदाहरण आहे, असे वाटते. या अभंगांची संख्या जरी मोजकीच असली, तरी त्यामधून आत्मरूपाच्या साक्षात्काराच्या ज्ञानाची जाणीव होते.

आयुष्यातील प्रत्येक प्रसंगांना निर्भयपणे, खंबीरपणे सामोरे जाणे, विवेकपणा, प्रसंगावधान, सामंजस्य हे गुण त्यांच्यात ठासून भरले होते. ज्ञानियाचा राजा अर्थात गुरुमाउली श्री संत ज्ञानेश्वर महाराजही याला अपवाद ठरले नाहीत. सामान्य माणसांप्रमाणेच माउलींची अवस्थाही अशीच झाली होती जसे की,

*काय खावे आता कोणीकडे जावे!*
*गावात रहावे कैशा रीती कामी!!*

*(तुकाराम गाथा)*

या उक्तीप्रमाणे नकोच आता या जगात राहणे, भिक्षाही नको, कोणाला अशुभ करणेही नको, आपणांस लोक पाहू इच्छित नाहीत, तर मग आपण दिसायचे नाही, कायमचे कुठेतरी दूर जावे. अशा अवस्थेत असताना त्यांना जेव्हा नैराश्याने ग्रासले, तेव्हा संत मुक्ताबाई संत ज्ञानेश्वरांना बाहेर येण्याचे सांगू



N.S. (B) COLLEGE PHALTAN

Scanned with OKEN Scanner

N.S.(B) COLLEGE PHALTAN

लागल्या. त्यांना नाना उपदेश करू लागल्या. या उपदेशामध्ये प्रथमत: प्रामुख्याने संतांचे किंवा साधूंचे नीतिशास्त्र कसे असावे, याची चर्चा करण्यात येते, हे आपणांस पुढील अभंगावरून लक्षात येते –

*योगी पावन मनाचा । साही अपराध जनाचा ।।१।।*
*विश्व संगे झाले वन्ही । संती सुखे व्हावे पाणी ।।२।।*

*(श्री मुक्ताबाई चरित्र व गाथा, अ. क्र. ४)*

या अभंगामधून संत मुक्ताबाई असे स्पष्ट करतात की, साधू, संत असणारे लोक मोठ्या मनाचे असतात, ते जगाचा अपराध सहन करतात. लोक जरी राग, लोभ याने अग्नी झाले असले, तरी साधूंने सुखाने पाणी प्यावे, जगत् हेच ब्रह्म आहे, तर मग तुम्ही कोणावर रागावणार म्हणून असे करणे तुम्हाला शोभा देणार नाही. म्हणून संत मुक्ताबाई येथे सर्व भुतांतच परमेश्वर वसलेला आहे, असे स्पष्ट करतात. कारण, पुढे त्या म्हणतात – विश्व ब्रह्म दोरा । (श्री मुक्ताबाई चरित्र व गाथा) यामधून त्यांनी जगत व ब्रह्म यांचा संबंध वर्णिला आहे.

आपण जर स्वत: साधू आहोत, तर प्रस्तुत उपाधी लावून आपणांस जमणार नाही. अशा उपाधी जर आपण लावून घेतल्या, तर आपल्या संतपणास बाधा येईल म्हणून संत मुक्ताबाई म्हणतात,

*सुखी साखरी वास झाला । उंच नीच काय त्याला ।'*

*(श्री मुक्ताबाई चरित्र व गाथा, अ. क्र. ४८)*

संत ज्ञानेश्वरांना संत मुक्ताबाईंनी जो उपदेश केला, तो खूपच प्रभावी होता. संत ज्ञानेश्वरांना जीव व जगत याचे ज्ञान होते, तरीही या जगात आपला छळ का व्हावा, असे विचार संत ज्ञानेश्वरांच्या मनात येत होते. म्हणून संत मुक्ताबाई असे स्पष्ट करतात की, असे विचार आपण आपल्या मनात येऊ देऊ नये. आपण जसे मुक्त झाला आहात, तसे जगालाही मुक्त करून सोडावे. आज जे उच्चवर्णीय आहेत, ते उद्या कनिष्ठ वर्णी जन्माला येतील, हा एक खेळ आहे व तो नाटकस्वरूपी आहे. हे काही स्थिर नाही. आपण सर्व एकस्वरूपी आहोत, याची जाणीवही संत मुक्ताबाई करून देतात व आपल्या अंत:करणात शांती धरावी, असा योगसंदेशही त्या देऊन जातात.

संत मुक्ताबाई या संत ज्ञानेश्वरांच्या गुरू व माता या दोन्ही भूमिकांमध्ये उभ्या होत्या. त्यामुळे त्यांनी संत ज्ञानदेवांना नीतीचेही शिक्षण दिले. माणसाचे अंतरंग कसे असावे, याचे वर्णन करताना त्या म्हणतात –

*वरी भगवा झाला नामे । अंतरी वश्य केला कामे ।।१।।*
*त्याला म्हणू नये साधु । जगी विटंबना बाधू ।।२।।*

अंत:करणात विषयासक्ती असून, बाहेरून भगवे घालून नामधारी संन्यासी



Scanned with OKEN Scanner

झाल्यास त्यास साधू म्हणता येत नाही. मी कोण आहे, याचा तुम्ही स्वतः विचार करणाऱ्याला विवेक कधीही सोडून जात नाही. लोकांनी आपणांस मानावे व आपला परमार्थिकपणा लोकांत प्रसिद्ध व्हावा, हे जे सोंग तुम्ही आणत आहात, ते बंद करावे आणि आपल्या अंतरंगातल्या क्रोधास काढून टाकावे, असा उपदेश करतात.

संत मुक्ताबाईंनी जरी हा उपदेश संत ज्ञानेश्वरांना दिला असला, तरी तो आताच्या परिस्थितीतील लोकांनाही तितकाच महत्त्वपूर्ण आहे. कारण, भगवे वस्त्र घालून कोणी साधू होत नाही, तर व्यक्तीत साधुत्वाची लक्षणे ही अंगभूतच असावी लागतात. त्यांच्यात विवेकी लक्षणे असावी लागतात, असे या अभंगातून स्पष्ट होते.

याबरोबरच मुक्ताबाईंनी संतत्वाची लक्षणे कोणती असावीत, याचे वर्णन करण्यासाठी पुढील अभंग स्पष्ट केला आहे -

*संत तोचि जाणा जगी, दया, क्षमा ज्याचे अंगी ।।१।।*
*लोभ, अहंता नये मना । जगी विरक्ता तोची जाणा ।।२।।*
*(श्री मुक्ताबाई चरित्र व गाथा, अ. क्र. ५०)*

संत मुक्ताबाई येथे म्हणतात - दया, क्षमा, शांती हे गुण संतांमध्ये असतात. त्यांच्या ठिकाणी, लोभ, माया, अहंकार नसून शुद्ध ज्ञान असते. म्हणूनच या सर्व नसणाऱ्या कल्पनांना कशासाठी धरून बसायचे, या सर्व गोष्टी सोडून देऊन आपण बाहेर यावे, असा संदेश संत मुक्ताबाई देतात.

*तया सर्वात्मका ईश्वरा । स्वकर्म कुसुमाच्या वीरा ।।*
*(श्री ज्ञानेश्वरी अभंग १८, ओवी ९१७)*

असे सांगणाऱ्या संत ज्ञानेश्वरांनाही संत मुक्ताबाईंनी क्रोध व लाभ सोडण्याची विनंती केली आहे. संत मुक्ताबाईंच्या या अभंगांच्या रचनेवरून आपणांस वैश्विक ज्ञानाची प्रचिती येते व अद्वैत वेदांतच आपल्यासमोर खुला होतो आणि हे ज्ञान मिळविण्याचा मार्ग संत मुक्ताबाई येथे विशद करतात.

*एक आपण साधू झाले । येर कोण वाया गेले ।।१।।*
*उठे विकार ब्रह्मी मूळ । अवघे मायेचे गबाळी ।।२।।*
*माया समूळ नूरे जेंव्हा । विश्व ब्रह्म होईल तेंव्हा ।।३।।*

या अभंगामधून संत मुक्ताबाई असा संदेश देतात की, तुम्ही एकटेच जर या जगात साधू आहात, तर दुसरे कोण वाया गेले हे दाखवा. मूळ ब्रह्माच्या ठिकाणी मायेने हा पसारा केला आहे व मीही साधू आहे, मीही मायाच आहे. जेंव्हा ही मायाही राहणार नाही, तेंव्हाच जग ब्रह्म होईल, हेच ज्ञान प्रथम मिळविण्याची गरज आहे, असे त्या स्पष्ट करतात.



COLLEGE PHALTAN (B) S.N *

Scanned with OKEN Scanner

आई-वडिलांच्या पश्चात घरातील मोठ्या वा लहान भावंडांची जबाबदारी संत मुक्ताबाईवर येऊन पडल्यामुळे सर्वसामान्यांप्रमाणे याही कुटुंबात संत मुक्ताबाईस आईचे कर्तव्य बजावावे लागले. ते पुढील अभंगावरून स्पष्ट होते -

*ब्रह्म जैसें तैस्यापरी । आम्हा वडील भूतें सारी ।।१।।*
*हात आपला आपण लागे । त्याचा खेद करु नये जगे ।।२।।*
*जीभ दातांनी चाविली । कोणे बत्तीशी ताडिली ।।३।।*
*थोर दुखावले मने । पुढे उदंड शहाणे ।।४।।*

*(श्री मुक्ताबाई चरित्र व गाथा, अ. क्र. ५२)*

महाराष्ट्रातील सर्वच साधुसंत व आधुनिक विचारवंतांनी प्रत्येक प्राणिमात्रा पूजनीय असल्याचे स्पष्ट केले. यावरून संत मुक्ताबाई म्हणतात, चुकूनच जर आपली थप्पड आपणांस लागली, तर उदासीनतेचे कारण नाही. कारण, जीभ दातांनी चावली म्हणून काही बत्तीशी फोडत नाही. कारण, माणसाचे मन जेवढे दुःखावले जाते, तेवढे माणसाला शहाणपण येते म्हणून आपण निवृत्तीक व्हावे, असा संदेश त्या देतात.

संत मुक्ताबाईंनी संत ज्ञानेश्वरांना जीवनाचे तत्त्वज्ञानच उलगडून दाखविले, ते आजही आपणांस महत्त्वपूर्ण आदर्शवत आहे. तितकेच ते येणाऱ्या पिढीलाही राहील. कारण, आपण ज्ञानाने, गुणाने, स्वतःला कितीही परिपूर्ण बनविले, तरी ते ज्ञान लोकापर्यंत जेव्हा भेदरहितरीत्या पोहोचेल, तेव्हाच आपण ज्ञानाने समृद्ध बनू, हे संत मुक्ताबाईंनी पुढील अभंगावरून स्पष्ट केले -

*सुखसागर आपण व्हावे । जग बोधे निववावे ।।१।।*
*बोधा करु नये अंतर । साधू नाही आपपर ।।२।।*
*जीव जीवासी पै द्यावा । मग करु नये अंतर देवा ।।३।।*

*(श्री मुक्ताबाई चरित्र व माया, अ. क्र. ५३)*

संत मुक्ताबाईंच्या या अभंगावरून भक्तीची कल्पना लक्षात येते. त्या म्हणतात, आपण सुखाचा समुद्र बनून लोकांना बोध देऊन त्याचे पाणी पाजावे. म्हणून ज्ञानदानाचे कार्य करताना त्यात भेद ठेवू नये. कारण, साधूला आपला परका हा भाव नसतो. कोणाच्याही जीवाला जीव द्यावा. अर्थात, ज्ञानदानाचे कार्य करताना स्त्री, पुरुष असे कप्पट्या मनात न ठेवता तरुण जाण्याचा मार्ग मोठ्या अंतःकरणाने सांगावा, असा संदेश दिला.

**संत मुक्ताबाईंची ज्ञानमीमांसा (भक्तीच्या संदर्भात) -**

संत ज्ञानेश्वरांनी अद्वैत वेदांत उलगडून दाखविले; परंतु ते उलगडविण्यामागे संत मुक्ताबाईंची प्रेरणा होती, हे आपणांस विसरता येणार नाही. कारण, या ज्ञानाच्या राज्यामध्ये कोणतेही अवगुण असता कामा नये, असा कटाक्ष त्या



Scanned with OKEN Scanner

टाकतात. त्या काळची परिस्थिती ही ईश्वरभक्तीपेक्षा गुरुभक्ती महत्त्वाची असणारी अशी होती. त्यामुळेच 'जगी जनार्दन तोचि देव' असे म्हणणारे साधुसंत याला वगळले गेले नाहीत. याचा संत मुक्ताबाई समर्पक असा दाखला देताना म्हणतात,

*अहो क्रोधें यावे कोठे । अवघे आपण निघोटे ।।१।।*

*ऐसे कळले उत्तम । जन तोचि जनाद्रन ।।२।।*

*(श्री मुक्ताबाई चरित्र व गाथा, अ. क्र. ५४)*

राग, संताप, ताणतणावाने आजही मानवी जीवन ग्रस्त आहे म्हणण्यापेक्षा या समस्या अधिकच वाढत आहेत. याची दूरदृष्टी आपल्या साधुसंतांना अगोदरपासूनच होती. ग. ना. जोशी म्हणतात, आपले साधुसंत फारसे शिकलेले नव्हते; परंतु अनुभवाच्या जोरावर त्यांनी हरेक प्रकारचे ज्ञान मिळविले होते व अनुभवाच्या पातळीवर पडताळून पाहिले होते. हे करीत असताना ताणतणावापासून जसे दूर जाण्याचा ध्यानधारणा हा मार्ग योगदर्शनात सांगितला गेला आहे; त्याचप्रमाणे संत मुक्ताबाईंनीही स्पष्ट केला; परंतु जर आपण योगी म्हणून जर आपल्या ठिकाणी क्रोधच उत्पन्न झाला, तर आपण वेगळे योगी ठरण्याचे कारण नाही. कारण, तसे झाल्यास आपला परमार्थही वाया जाईल, अशी भीती त्यांना वाटत होती.

संत ज्ञानेश्वरांनी वारकरी पंथाचा उत्कर्ष व विकास केला. पंढरपूरला पूर्वीही यात्रा भरायच्या, त्यावेळी फारसे वारकरी नव्हते; परंतु 'विश्वब्रह्माचे केले' या उक्तीप्रमाणे संत ज्ञानदेवांना अवघ्या विठू माउली व सर्व विश्वाची ईश्वर संकल्पना साकारली. महाराष्ट्राच्या इतिहासात भागवत धर्माने मोठी केलेली कामगिरी म्हणजे अठरापगड जातिधर्माच्या चौकटीत बंदिस्त असलेल्या समाजाला देव आणि धर्म यांची कल्पना देऊन त्यांना एका धाग्यात गोवण्याचे कार्य केले. माणसाला हवी असणारी शांती-समाधान ईश्वराची खरी भक्ती इत्यादी गोष्टी माणसाच्या मूलभूत प्रश्नांशी निगडित आहेत आणि हेच प्रश्न 'ज्ञानेश्वरी'त केंद्रस्थानी आहेत. भोळ्या विचारांना अध्यात्मविचारांची अधिष्ठान देण्याची ही गरज पूर्ण करण्यासाठी संत मुक्ताबाईंनी संत ज्ञानेश्वरांचे एकप्रकारे समुपदेशन केले. म्हणूनच अंगारा, धुपारा लावून देवतेला प्रसन्न करून घेण्याच्या कल्पनेला संत ज्ञानदेवांनी विरोध करून मराठीतूनच त्यांनी तत्त्वज्ञान मांडले व हे तत्त्वज्ञान मांडण्याचे मार्गदर्शन संत मुक्ताबाईंनी संत ज्ञानेश्वरांवर सोपविले होते. साधूला कोणत्याही विकार उपाधी असु नयेत. संत ज्ञानेश्वरांना जेव्हा या उपाधींनी ग्रस्त केले, तेव्हा त्यांना जगाचा व त्यातील लोकांच्या वागण्याचा त्रास होऊ लागला. त्यांनी स्वत:ला बंदिस्त करून घेतले व असे करणे कोणत्याही साधूला शोभवत नाही. म्हणूनच संत मुक्ताबाईंनी त्यांना उपदेश करताना म्हटले –



COLLEGE PHALTAN (B).S.N *

Scanned with OKEN Scanner

*सांडी कल्पना उपाधि । तिच साधूला समाधी ।।१।।*
*वाद घालावा कवणाला । अवघा दैवताचा हो घाला ।।२।।*
*(श्री मुक्ताबाई चरित्र व गाथा, अ. क्र. ५५)*

जगात सर्वत्र दैवतीच असताना आपण कोणाबरोबरही वाद घालू नये, असे आपण करणे योग्य होणार नाही. अशाच एका अभंगामध्ये संत मुक्ताबाईंनी शरीर-मनाचा एक सुंदर दाखला देताना म्हटले आहे -

*एक मन चेष्टा करी । भुते बापुडी शेजारी ।।*
*अवघी ईश्वराची करणी । काय तेथे केले कोणी ।।*
*(श्री मुक्ताबाई चरित्र गाथा, अ. क्र. ५६)*

शरीर व मन या दोन्ही वेगवेगळ्या गोष्टी नाहीत, मनाने कितीही उंच भरारी घेतली, तरी त्यातही देहाविशिष्ट मनच सर्व क्रिया करते.

संत मुक्ताबाईंनी अमोघ, निर्भीड व सणसणीत प्रखर भाषेत खोचक; परंतु मार्मिक असा उपदेश संत ज्ञानदेवांना केला. हा उपदेश संत ज्ञानदेवांचा राग, औदासिन्यता, रुसवेपणा, लोभ, माया घालविणारा ठरला व त्यांना आपली बहीण मुक्ताबाई ही अखंड ज्ञानाचा स्रोत आहे, याची जाणीव झाली.

**संत मुक्ताबाईंची ईश्वर संकल्पना -**

संत ज्ञानदेवांना त्यांच्या जबाबदारीची जाणीव करून देण्यासाठी संत मुक्ताबाईंनी या तत्त्वचर्चेत हात घातला. आत्मलीन होणाऱ्या संत ज्ञानदेवांना त्यांनी जगाला अद्वैत वेदांत सांगण्याचे मार्गदर्शन केले. त्या म्हणतात,

*शुद्ध ज्याचा भाव झाला । दूरी नाही देव त्याला ।।१।।*
*अवघी साधने हातवटी । मोले मिळत नाही हाटीं ।।२।।*
*(श्री मुक्ताबाई चरित्र व गाथा, अ. क्र. ५०)*

मनातील भाव जर शुद्ध असेल, तर देव कोणालाच दूर नाही, असे संत मुक्ताबाई म्हणतात. कारण, आज खरोखरच आपणांस ईश्वर संकल्पनेची गरज आहे. आज खरोखरच आपणांस ईश्वर संकल्पना महत्त्वाची वाटत आहे व याची जाणीव व गरज कशात आहे, याचा अभ्यास खरेतर या संतमंडळींनी केला.

आज आपण पाहतो की, गावोगावी हरिनाम सप्ताहांचे आयोजन करून भागवत संप्रदायाची प्रवचने, कीर्तने व हरिजागर यांच्या माध्यमातून समाजात संतांचे विचार रुजविण्याचा, संतांच्या शिकवणुकीनुसार आचरण करण्याचा उपदेश करीत आहेत. अशाने सातत्याने लोकजागृती होत आहे; परंतु एवढे होऊन जनसामान्यांच्या स्तरात या ईश्वर संकल्पनेविषयी अज्ञान आहे. ईश्वर अज्ञान किंवा अलौकिक शक्ती आहे. अशी आजही धारणा असली, तरी परमेश्वरी संकल्पना बदलत गेल्या आहेत. मग यातून ईश्वरप्राप्तीचे अनेक मार्ग वेगवेगळ्या



Scanned with OKEN Scanner

धर्म, पंथ, उपपंथांनी स्पष्ट केले आहेत व ते आचरण्यास भाग पाडले जात आहे; परंतु महाराष्ट्रातील सर्वच साधुसंतांनी हा ईश्वरप्राप्तीचा मार्ग एक व हा ईश्वरही एकच आहे, असे स्पष्ट केले आहे. संत नामदेव, संत एकनाथ, संत गाडगे महाराज तसेच आधुनिक भारतीय विचारवंतांमध्येही स्वामी विवेकानंद, महात्मा गांधी, रामकृष्ण परमहंस, श्री अरविंद यांनीही परमेश्वर मानवामध्येच साकार केले आहे. देव हा दगडात नसून माणसांत लपलेला असतो, हेच या विचारधारेचे महत्त्व आहे. या विचारधारेचा मोठा कार्यभाग श्री ज्ञानेश्वरांकडेही जातो, तो संत मुक्ताबाईंच्या मार्गातून. कारण, संत मुक्ताबाई म्हणतात की, कोणत्याही साधनाने ईश्वरप्राप्ती होत नाही. ही साधने बाजारात विकत मिळत नाहीत. ती तुम्ही शोधून घ्या. तुम्हांस जीव ब्रह्मस्वरूप आहे, हा उपदेश कसा करायचा, तो मुळातच ब्रह्मस्वरूपच आहे. याप्रमाणे तरुण जावा व जगासही तारणारा असा सल्ला संत मुक्ताबाई देतात.

ईश्वर हा सर्व प्राणिमात्रांमध्ये वास करतो. जनसामान्यांना आवडणारे कीर्तन, प्रवचन या माध्यमांतून खरी ईश्वरभक्ती संतमंडळींनी जगासमोर आणली. ईश्वरप्राप्तीसाठी कोठे जाण्याची गरज नाही; ज्याचा भाव शुद्ध आहे, त्याला ईश्वर हा निकटवर्ती असतो. आपणच आपला भाव शुद्ध करून घ्यावयाचा. ईश्वराचे सर्वव्यापक व ज्ञान करून घेऊन त्याप्रमाणे सर्वांशी व्यवहार करणे संतत्वाचे सार आहे. हीच विचारांची ठेवण संत मुक्ताबाईंनी देऊन आपल्यासमोर ज्ञानाचे सार उभे केले.

महालक्ष्मी, दुर्गा, महाकाली या पुरातन स्त्रियांप्रमाणे मंध्ययुगीन स्त्रियांनीही प्रेरणात्मक व उन्नत असा आपल्या कार्याचा ठसा निर्माण करून तो समाजापुढे मांडला. यामध्ये मुक्ताबाई, जनाबाई, बहिणाबाई यांचे नेतृत्व आहे. त्यांनी समाजाचे प्रबोधन करण्यात मोठा वाटा उचललेला आहे व स्त्रीसाहित्यातही भरच टाकली आहे, अशा संत मुक्ताबाईंच्या भक्तीला ज्ञानाची धार व जोड होती, असे म्हणता येईल. एका अथांग अमोघ तत्त्वज्ञानाची ओळख संत मुक्ताबाईंनी करून दिली. चांगदेव महाराजांची विद्या व या विद्येविषयी असणाऱ्या अहंभावाचे संत मुक्ताबाईंनी सारवर्णन चांगदेवांना कोरा राहिल्याचे स्पष्ट केले व चांगदेवांना आत्मपरीक्षण करण्यास भाग पाडले.

बहिणाबाईंनी म्हटल्याप्रमाणे 'स्त्री जन्म म्हणूनी, न व्हावे उदास ।' अशी संत मुक्ताबाईंच्या निर्माणशीलतेत आत्मनिर्भयता अखंड ज्ञानाची प्रचिती हे तत्त्वज्ञान आपणांस देते. संत मुक्ताबाईंमुळे अखंड वारकरी संप्रदायाला महाराष्ट्र व भारतभूमीला आंतरराष्ट्रीय पातळीवर ईश्वरभक्तीकडे जाण्याची वाटचाल करून दिली.



COLLEGE PHALTAN (B) S.N.
Scanned with OKEN Scanner

संदर्भ


१. गोवईकर पद्माकर (१९९१) : मुंगी उडाली आकाशी : कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
२. ह. भ. प. वडाळीवर (१९३१) : श्री मुक्ताबाई चरित्र व गाथा : गीताप्रेस गोरखपूर, कोलकात्ता.
३. दांडेकर रां. वा. (१९९४) : वारकरी पंथाचा इंतिहास : वारकरी प्रकाशन मंडळ, नागपूर.
४. पाठक यशवंत (१९९१) : नाचु कीर्तनाचे रंगी : कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
५. खरात रं. म., श्री संत ज्ञानेश्वर महाराज कृत हरिपाठ (२००७) : श्रीक्षेत्र देवाची आळंदी, पुणे.
६. डॉ. जोशी ग. ना. (१९९४) : भारतीय तत्त्वज्ञानाचा बृहद् इतिहास, सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठ.


N.S.(B) COLLEGE PHALTAN

Scanned with OKEN Scanner




## डॉ. सुनिलदत्त सोपान गवरे

तत्त्वज्ञान विभाग प्रमुख -
शिवळे महाविद्यालय, शिवळे
भ्रमणध्वनी क्र. : ८२०८७०४६८७, ९१५२०२०४५३


### अभ्यास मंडळ :

1. Board of studies in Philosophy : University of Mumbai. 2016-2019
2. Board of studies in Philosophy : University of Kolhapur. 2017 to Til today
3. Board of studies in Philosophy : University of Solapur. 2020 to Til today
4. Board of studies in Philosophy : Atonoms College, SJM College, Karad. 2017 to Til today
5. Board of studies in Philosophy : Atonoms College, TC College, Baramati. 2020 to Til today

* ASIA - ARAB SUMMIT & AWARDS - 2019 BEST TEACHER AWARD.
* THANE - PALGHAR JILHA GRAMIN AWARDS - 2021 BEST TEACHER AWARD.
* DISTRICT LEVEL BEST PROGRAMME OFFICER - 2007-08
* UNIVERSITY LEVEL BEST AREA - COORDINATOR - 2008-09
* VICE PRESIDENT OF MAHARASHTRA PHILOSOPHY CONFERENCE. 2009 to 2016.
* CHIEF EXECUTIVE OF MAHARASHTRA PHILOSOPHY CONFERENCE. 2016 to 2020.
* PRESIDENT OF MAHARASHTRA PHILOSOPHY CONFERENCE. 2021 to Til today
* K.B.C. N.M.U., JALGAON - PRATAP PHILOSOPHY CENTER - COMMITTEE MEMBERS 2021.
* K.B.C. N.M.U., JALGAON - PRATAP PHILOSOPHY CENTER - AUDITOR COMMITTEE MEMBERS 201
* PRIN. SHIVAJIRAO BHOSALE VICHAR MANCH - FOUNDING PRESIDENT.

### प्रकाशित पुस्तके :

* भारतीय नास्तिक दर्शनांचे नीतिशास्त्र । * पाश्चात्य विचारवंतांचा सुखवादी विचार
* पाश्चात्य विचारवंतांचा ईश्वर विचार । * महाराष्ट्र गवरे परिवार


आता ई-बुक स्वरूपातही
अथर्वची सर्व पुस्तके उपलब्ध...

* pejbook.com
* amazon.com
* Google Play Books
* atharvapublications.com

Principal
Namdevrao Suryawanshi(Bedke) Colleg
Phaltan,Dist.Satara.



अथर्व पब्लिकेशन्स्
ऑनलाईन पुस्तक खरेदीकरिता...
www.atharvapublications.com

ISBN 978-93-94269-19-4

₹ - 295/-



Scanned with OKEN Scanner

COLLEGE * N.S.(B) PHALTAN

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

# प्रभाव अभ्यास

## एम. ए. भाग २ : मराठी

सत्र ३ : अभ्यासपत्रिका क्र. १०.२

सत्र ४ : अभ्यासपत्रिका क्र. १४.२

(शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून)

Principal
Namdevrao Suryawanshi(Bedke) College
Phaltan, Dist. Satara.

N.S.(B) COLLEGE
PHALTAN

**प्रभाव अभ्यास**
एम.ए.भाग २: मराठी
अभ्यासपत्रिका क्रमांक १०.२ व १४.२
२०१९ पासून होणाऱ्या परीक्षांसाठी

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२१
एम. ए. भाग-१ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती :** ५००

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

ISBN- 978-81-951367-0-4

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४. (भारत)

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिती ■

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) आर. के. कामत**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य (डॉ.) पी. आर. शेवाळे**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
I/c संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. एन. काशिद** (सदस्य सचिव)
I/c संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

N.S.(B) COLLEGE PHALTAN

N.S.(B) COLLEGE PHALTAN

## अभ्यासमंडळ : मराठी

अध्यक्ष : **डॉ. दत्तात्रय मल्लू पाटील**
डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

- **डॉ. रणधीर शिंदे**
  मराठी विभागप्रमुख,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. शिवलिंग मेनकुदळे**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
- **डॉ. शहाजी जगन्नाथ पाटील**
  पद्मभूषण वसंतरावदादा पाटील कॉलेज, तासगाव,
  जि. सांगली
- **डॉ. सुभाष गणपती जाधव**
  दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अॅण्ड कॉमर्स कॉलेज,
  इचलकरंजी, जि. कोल्हापूर
- **डॉ. प्रभाकर पवार**
  मुधोजी कॉलेज, फलटण, जि. सातारा
- **प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण**
  श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर
- **डॉ. अरुण कृष्णा शिंदे**
  नाइट कॉलेज ऑफ आर्ट्स अॅण्ड कॉमर्स, कोल्हापूर
- **डॉ. उदय रामचंद्र जाधव**
  शहाजीराजे महाविद्यालय, खटाव, जि. सातारा
- **प्रा. डॉ. दासू वैद्य**
  मराठी विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
  विद्यापीठ, औरंगाबाद
- **डॉ. नंदकुमार विष्णू मोरे**
  मराठी विभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. गोपाळ ओमाणा गावडे**
  महावीर महाविद्यालय, कोल्हापूर
- **श्री. के. एस. अतकरे**
  कैलास पब्लिकेशन, औरंगपूरा, औरंगाबाद

N.S.(B) COLLEGE PHALTAN

## संपादकीय

'प्रभाव अभ्यास' ही अभ्यासपत्रिका एम. ए. भाग-२ च्या सत्र-३ व ४ साठी आहे. सत्र-३ च्या अभ्यासपत्रिकेमध्ये १. प्रभाव अभ्यासाची संकल्पना, स्वरूप व व्याप्ती, २. प्रभाव आणि अनुकरण साम्यभेद, ३. प्रभावाची कारणे व मिमांसा, ४. प्रभाव आणि सत्तासंबंध; तसेच सत्र-४ च्या अभ्यासपत्रिकेमध्ये १. प्रभाव आणि निर्मिती प्रेरणा, २. वसाहतकालीन तथा वसाहतोत्तर प्रभाव, ३. रचनाप्रकारांचा प्रभावानुरोधाने अभ्यास, ४. प्रभाव चिकित्सा या घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे. प्रस्तुत स्वयं अध्ययन साहित्यामध्ये अभ्यासक्रमासाठी नियुक्त विषय घटकांचे घटकनिहाय लेखन केलेले आहे. प्रत्येक घटकाचे लेखन अभ्यासपूर्ण रीतीने व आकलनसुलभ भाषेत केलेले आहे. घटकाच्या प्रारंभी उद्दिष्टे नमूद केलेली असून उद्दिष्टे साध्य करण्यासाठी प्रस्तुत घटक लेखनातील विषय विवेचन व मूल्यमापन आपणास दिशादर्शक आहे. अभ्यासक्रमासाठी नियुक्त केलेल्या पुस्तकांचा आशय व्यापक असून त्यांचा सूत्रबद्ध आढावा घेण्याचा प्रयत्न घटक लेखनामध्ये केलेला आहे.

या पुस्तकामध्ये विविध घटकांच्या विवेचनात अचूकता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु त्यामध्ये काही उणिवा असल्यास वाचक व विद्यार्थ्यांनी त्या आमच्या निदर्शनास आणून द्याव्यात. त्याचा उपयोग पुढील आवृत्ती अधिकाधिक सुधारित करण्यासाठी निश्चितपणे होईल. सदर पुस्तक पूर्ण करण्यासाठी घटकलेखकांनी जे परिश्रम घेतले. पुस्तक प्रकाशनासाठी शिवाजी विद्यापीठाचे प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, दूरशिक्षण विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी जे परिश्रम घेतले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

■ संपादक ■

**डॉ. उदय जाधव**
शहाजीराजे महाविद्यालय, खटाव,
ता. खटाव, जि. सातारा

**डॉ. गोपाळ ओमाणा गावडे**
महावीर महाविद्यालय,
भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

N.S.(B) COLLEGE PHALTAN

दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**प्रभाव अभ्यास**
एम.ए.भाग २ : मराठी

**अभ्यास घटकांचे लेखक**

| लेखक | घटक क्रमांक आणि शीर्षक |
|---|---|
| **सत्र तिसरे : अभ्यासपत्रिका क्रमांक १०.२ : प्रभाव अभ्यास** | |
| **डॉ. सतेज दणाने**<br>नामदेवराव सूर्यवंशी बेंडके महाविद्यालय, फलटण | १. **प्रभाव अभ्यासाची संकल्पना, स्वरूप व व्याप्ती** |
| **प्रा. अनंता कस्तुरे**<br>श्रीमती मिनलबेन मेहता कॉलेज, पाचगणी | २. **प्रभाव आणि अनुकरण** |
| **प्रा. संतोष बोंगाळे**<br>वेणुताई चव्हाण कॉलेज, कराड, ता. कराड | ३. **प्रभाव कारणमीमांसा** |
| **डॉ. गजानन भिंगारदिवे**<br>मराठी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | ४. **प्रभाव आणि सत्तासंबंध** |
| **सत्र चौथे : अभ्यासपत्रिका क्रमांक १४.२ : प्रभाव अभ्यास** | |
| **डॉ. प्रभाकर पवार**<br>मुधोजी कॉलेज, फलटण, ता. फलटण, जि. सातारा | १. **प्रभाव आणि निर्मिती प्रेरणा** |
| **प्रा. सतेज दणाने**<br>नामदेवराव सूर्यवंशी बेंडके महाविद्यालय, फलटण | २. **वसाहतकालीन तथा वसाहतोत्तर प्रभाव** |
| **डॉ. गजानन चव्हाण**<br>छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा, जि. सातारा | ३. **रचनाप्रकारांचा प्रभावानुरोधाने अभ्यास** |
| **डॉ. प्रशांत नागावकर**<br>यशवंतराव चव्हाण (के.एम.सी.) कॉलेज, कोल्हापूर<br>जि. कोल्हापूर | ४. **प्रभाव चिकित्सा** |

■ संपादक ■

**डॉ. उदय जाधव**
शहाजीराजे महाविद्यालय, खटाव,
ता. खटाव, जि. सातारा

**डॉ. गोपाळ ओमाणा गावडे**
महावीर महाविद्यालय,
भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

N.S.(B) COLLEGE PHALTAN

**प्रभाव अभ्यास**
एम. ए. भाग २ : मराठी
अभ्यासपत्रिका क्रमांक १०.२ व १४.२

# अनुक्रमणिका

## सत्र तिसरे : अभ्यासपत्रिका क्रमांक १०.२
## प्रभाव अभ्यास


| | | |
|---|---|---|
| घटक १ | प्रभाव अभ्यासाची संकल्पना, स्वरूप व व्याप्ती | १ |
| घटक २ | प्रभाव आणि अनुकरण | १५ |
| घटक ३ | प्रभाव कारणमीमांसा | ३८ |
| घटक ४ | प्रभाव आणि सत्तासंबंध | ५५ |


## सत्र चौथे : अभ्यासपत्रिका क्रमांक १४.२
## प्रभाव अभ्यास


| | | |
|---|---|---|
| घटक १ | प्रभाव आणि निर्मिती प्रेरणा | ७१ |
| घटक २ | वसाहतकालीन तथा वसाहतोत्तर प्रभाव | ११९ |
| घटक ३ | रचनाप्रकारांचा प्रभावानुरोधाने अभ्यास | १४४ |
| घटक ४ | प्रभाव चिकित्सा | १७९ |

N.S.(B) COLLEGE PHALTAN

■ **विद्यार्थ्यांना सूचना**

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१८-१९ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भ पुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

N.S.(B) COLLEGE PHALTAN

## घटक – १

# प्रभाव अभ्यासाची संकल्पना, स्वरूप व व्याप्ती

१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्ताविक

१.२ विषय विवेचन

१.३ प्रभाव अभ्यासाचे स्वरूप

१.४ प्रभाव अभ्यासाची व्याप्ती

### १.० उद्दिष्टे

विद्यार्थी मित्रहो,

'प्रभाव अभ्यास' या अभ्यासपत्रिकेमध्ये 'प्रभाव अभ्यासाची संकल्पना, स्वरूप व व्याप्ती' हा घटक अभ्यासल्यानंतर आपल्याला :

- प्रभाव अभ्यासाची संकल्पना समजेल.
- प्रभाव म्हणजे काय ? ते नेमकेपणाने ध्यानात येईल.
- आशयसूत्रे, आविष्काररीती, तत्त्वज्ञान, जीवनदृष्टी व मूल्ये समजून घेता येतील.
- प्रभावाचा अभ्यास कोणत्या दृष्टिकोणातून करावा याचे ज्ञान मिळेल.

### १.१ प्रास्ताविक

व्यक्तीवर ज्या गोष्टीची छाप पडते तिचे व्यक्ती अनुकरण करते. मग ती समाजातील एखादी घटना असेल, एखादी व्यक्ती असेल, सांस्कृतिक घटक असतील, राजकीय व्यक्ती असेल, विचारधारा असतील त्यांचा प्रभाव पडतो. वाङ्मयीन क्षेत्रात विशिष्ट साहित्यकृती किंवा साहित्यिक याचा इतर साहित्य किंवा साहित्यिक यांच्यावर प्रभाव पडतो. मराठीमधील संत तुकाराम यांच्या साहित्याचा प्रभाव इतर भाषेतील साहित्यावर पडलेला आहे. शेक्सपिअरच्या नाटकाचा प्रभाव मराठी लेखकांवर दिसून येतो. महात्मा फुले यांच्या विचाराचा प्रभाव कृष्णराव भालेकर, रा. वि. टिकेकर यांच्या कादंबऱ्यात दिसतो. महात्मा गांधींच्या

N.S.(B) COLLEGE PHALTAN

विचाराने प्रभावित होऊन वा. म. जोशी, वि. स. खांडेकर आणि मामा वरेकर यांनी कादंबरी लेखन केले आहे. वि. वा. हडप यांनी मार्क्सवादी जीवनदृष्टीतून 'अन्नदाता उपाशी' ही कादंबरी लिहिली आहे. दया पवार यांच्या 'बलुतं'च्या प्रभावातून मराठी दलित साहित्यात आत्मकथनाचा प्रवाह निर्माण झालेला दिसतो. भालचंद्र नेमाडे यांच्या 'कोसला' कादंबरीच्या प्रभावात रंगनाथ पठारे, सदानंद देशमुख, रमेश इंगळे-उत्रादकर, प्रवीण बांदेकर, महेंद्र कदम, राजन गवस, सुशील धसकटे, किरण नगरकर, कमलेश वालावलकर अशी लेखकाची मोठी पिढी लिहिताना दिसते आहे. प्रभावाभ्यास ही एक व्यापक आणि गुंतागुंतीची अभ्यास पद्धती आहे. प्रभावाची व्यापकता संपूर्ण मानवी जीवन व्यापणारी आहे. सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि वाङ्मयीन कलाकृती अशी अभ्यासाच्या सोयीसाठी व्याप्ती दाखवता येईल. वाङ्मयीन कलाकृतीचा प्रभाव अभ्यास आशयसूत्रे, आविष्काररीती, तत्त्वज्ञान, मूल्ये या दृष्टिकोणातून करता येईल.

## १.२ विषय विवेचन

आपल्या जगण्यामध्ये आणि व्यवहारामध्ये आपण प्रभाव हा शब्द सातत्याने वापरत असतो. प्रभाव म्हणजे काय? हे निश्चितपणे सांगता येत नसले तरी माझ्यावर आमक्या-तमक्याचा प्रभाव आहे. माझ्या जीवनावर प्रभाव पाडणारी ही व्यक्ती आहे. आपल्या जीवनात प्रभाव पाडणारी ही घटना घडली असे आपणास नेहमी ऐकायला मिळते किंवा आपणही कधी कधी अभिमानाने आपणाला प्रभावित करणाऱ्या घटना, व्यक्ती वगैरेसंबंधी बोलत असतो.

माणसाची जडणघडण, विकास हा प्रभावाचा एक भाग असतो. प्रभावाशिवाय माणसाची प्रगती होत नाही. प्रभावातूनच माणसाची घडण आणि बिघडण होते. आपणास असेही म्हणता येईल, माणसाला लहानपणी कळू लागल्यापासून बोलण्याची, चालण्याची जी धडपड असते ती प्रभावातीत असण्याची शक्यता असते. मानवी जीवनासंबंधाच्या अनेक घटना, घटिते ही प्रभावातूनच घडतात.

असे असले तरी प्रभाव म्हणजे अनुकरण असे म्हणता येणार नाही. अनुकरण ही त्यानंतरची प्रक्रिया असते. प्रभाव, प्रक्षेपक आणि स्वीकारक यांच्यातील संबंध प्रस्थापित झाल्यानंतर अनुकरण ही प्रक्रिया सुरू होते.

प्रभाव अभ्यासाची संकल्पना, स्वरूप व व्याप्ती समजून घेण्यासाठी आपणास प्रभाव या शब्दाचा अर्थ व प्रभावासंबंधीच्या व्याख्याचा विचार करावा लागेल.

**१. 'प्रभाव शब्दाचा अर्थ :**

मराठी शब्दकोशामध्ये 'प्रभाव' या शब्दाचा अर्थ तेज, सामर्थ्य, पराक्रम, ऐश्वर्य असा पहावयास मिळतो.

N.S.(B) COLLEGE PHALTAN

२. व्याख्या

*** आनंद पाटील**

प्रभाव एकच नसून, वाङ्मयीन व अवाङ्मयीन प्रभावाचे जाळे कसे तयार होते. याचा उलगडा महत्त्वाचा मानला जाऊ लागला. हे प्रभाव संकेत व परंपरातूनही उगम पावतात. व्यक्ती ज्या परंपरांशी जुळवून घेते त्या प्रक्रियेला प्रभाव समजले जाते.

आनंद पाटील ब्लूमच्या प्रभाव सिद्धांताचे विवेचन करताना म्हणतात :

'प्रभाव' हा परंपरेत निरोगी असावा लागतो. तो फ्लूसारखाही असू शकतो. त्याने अनुकरण परंपरा स्वीकारून मूलभूतता, उत्स्फूर्तता आणि नवता या संकल्पनांवर गैरविश्वास व्यक्त केला. त्या नाकारल्या मात्र नाहीत. प्रभाव याचा अर्थ संहिता नसतातच मुळी, पण संहितामधील संबंध असतात असा आहे.

*** भालचंद्र नेमाडे**

एका भाषेचा दुसऱ्या भाषेवरचा प्रभाव ही घटना नेहमी दोन संस्कृतींच्या संपर्काचा भाग म्हणून अस्तित्वात येते. जगातल्या सर्वच भाषांवर अन्य भाषांचा प्रभाव कमी-जास्त प्रमाणात असतो. ते पुढे वाङ्मयीन प्रभावाच्या अभ्यासाच्या संदर्भात म्हणतात,

'भाषिक प्रभावाकडे एक सर्वसाधारण दृष्टिक्षेप टाकला तरी लक्षात येईल की, अशा मुकाबल्यानंतर भाषेच्या उपव्यवस्थांमध्ये होणारा विस्तार हा एखादा समाज नव्या परिस्थितीशी कशा प्रकारे स्वतःला जुळवून घेतो याचा निदर्शक असतो. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे अविकसित भाषांनी इतर विकसनशील भाषांच्या बरोबर येऊ पाहण्याची ही प्रक्रिया असते.

*** व्ही. सच्चितानंदन**

'एखाद्या लेखकाचा स्वतःचा कलात्मक विकास किंवा त्यांची वाड्मय परंपरा जे स्पष्ट करू शकत नाही, ते जे काही देशी लेखकाच्या साहित्यकृतीत सापडते, त्याला प्रभाव म्हणावे.'

(व्ही. सच्चितानंदन : व्हिटमन आणि भारतीय तौलनिक अभ्यास, १२४-५०)

मराठी शब्दकोशामधील 'प्रभाव' या शब्दाचा अर्थ व आनंद पाटील, भालचंद्र नेमाडे आणि व्ही. सच्चितानंदन यांनी प्रभावासंदर्भात मांडलेले मत या एकत्रित चर्चेवरून 'प्रभाव' या शब्दाचा अर्थ दाब, जोर, बल, ठसा असा घेण्यासारखा आहे.

आनंद पाटील आणि भालचंद्र नेमाडे यांच्या प्रभावासंबंधी मतानुसार अविकसित घटकांची विकसनशील घटकांबरोबरीस येऊ पाहण्याची प्रक्रिया म्हणजे प्रभाव. हा धागा दोघांच्याही मतामध्ये समान असलेला दिसतो. याशिवाय वाङ्मयीन व अवाङ्मयीन प्रभाव, प्रभाव संकेत, परंपरा, अनुकरण, मूलभूतता, उत्स्फूर्तता आणि नवता, संहितामधील संबंध, दोन संस्कृती संपर्क, भाषेच्या, समाजाच्या उपव्यवस्थामध्ये होणारा बदल, विस्तार, समायोजन, कलात्मक विकासाचे किंवा वाङ्मयीन परंपरांचे फलित अशा संकल्पना, घटक संबंध हे प्रभाव अभ्यासाची संकल्पना स्पष्ट करणारे व स्वरूप आणि व्याप्तीचे सूचन करणारे आहेत.

N.S.(B) COLLEGE PHALTAN

या चर्चेआधारे आपणास प्रभाव म्हणजे काय हे सांगता येण्यासारखे आहे.

विशिष्ट साहित्याचा किंवा साहित्यिकाचा प्रभाव पडणे, विशिष्ट भाषिक समाज अन्य भाषिक साहित्याचे किंवा साहित्यिकाचे स्वागत करणे. त्याचा स्वीकार करणे. अविकसितांनी विकसितांचा किंवा विकसनशीलाचा आदर्श घेणे वाईट नाही. भारतीय लेखकांनी पाश्चात्य लेखकाचा प्रभाव स्वीकारणे हे पराभूतपणाचे लक्षण असत नाही किंवा भारतीय लेखकांनी भारतातील लेखकाचा प्रभाव स्वीकारणे हाही पराभूतपणा नाही. शेक्सपिअर, मोल्येर, शेली, इब्सेन, ईलियट, टॉलस्टॉय, डॉस्टोयवस्की, पुष्किन, चेकॉव्ह, हेमिंग्वे यांचा प्रभाव इतर अनेक देशात पडलेला आहे. भारतीय उपनिषदांचा, तत्त्वज्ञानाचा प्रभाव पाश्चात्त्यांवर पडलेला आहे. तुकाराम, ज्ञानेश्वर यांच्या साहित्याचा प्रभाव इतर राष्ट्रात आणि देशात पडलेला आहे. या आदान-प्रदानामध्ये कुठल्याच तटभिंती असत नाहीत. साहित्यिकांचा प्रभाव पडतो तसा साहित्याचाही प्रभाव पडत असतो.

प्रभावातील नावीन्य, सामर्थ्य आणि सौंदर्य हे गुण परंपराश्रयी असतात. त्यामुळेच कालिदास, श्रीहर्ष, माघ-भारवी यांच्या काव्याचा प्रभाव मध्ययुगात देशी भाषांवर पडला आहे. पण तो संस्कृत पंचमहाकाव्याचा प्रभाव म्हणून ओळखला गेला. रचनापद्धती, आलंकारिकता, विषयाची निवड, निवेदन कौशल्ये, पांडित्य अशा अनेक गुणांनी मिळून संस्कृत महाकाव्याची म्हणून एक परंपरा तयार झाली होती. तिचा उल्लेख वसंत बापट यांनी 'संकुल प्रभाव' असा केला आहे. ग्रीक ट्रॅजेडी, फ्रेंच वास्तववादी साहित्य, जपानी 'हायकू कविता' अशा या जगातील विविध संकुलाचा प्रभाव इतर देशांमध्ये पडलेला आहे.

## १.३ प्रभाव अभ्यासाचे स्वरूप

विशिष्ट साहित्याचा किंवा साहित्यिकांचा प्रभाव पडतो. भिन्न-भिन्न साहित्यात समांतर अथवा समान विकास आढळतो. विशिष्ट साहित्याला नवी दिशा मिळाल्याचे दिसते. याचा शोध हा प्रभाव अभ्यासाचा विषय ठरत असतो. साहित्याचा किंवा साहित्यिकांचा प्रभाव पडतो. तो कशा स्वरूपात पडलेला असतो. प्रभाव-प्रेक्षक-स्वीकारक या प्रक्रियेतून जाणवतो. प्रभाव स्वीकारणाऱ्या साहित्यकृतीच्या संकल्पना धारणेवर अवलंबून असतो. वाङ्मयीन गोष्टी, वाङ्मयबाह्य गोष्टी, देश, काल भाषा आणि गरजा हेही घटक अंतर्भूत असतात.

साहित्य आणि साहित्यिक यांचा प्रभाव पडतो. यापुढे काही वाङ्मयबाह्य गोष्टींचा प्रभाव पडलेला असतो. त्याचाही विचार करावा लागतो. मराठी मंडळींना मराठी भाषा बोलणाऱ्यांना इंग्रजी वाङ्मय जवळचे वाटते आहे पण शेजारच्या कर्नाटक, तमीळ, तेलगू, गुजरात या भाषिक प्रदेशात काय चालते आहे, कोणत्या वाङ्मयीन चळवळी सुरू आहेत. नवीन कोणता प्रवाह, नवीन कोणता लेखक लिहितो आहे यांची माहिती असली पाहिजे. वि. स. खांडेकर तेलगूत, अण्णाभाऊ साठे रशियात प्रसिद्ध आहेत. त्यांचा तेथील साहित्यावर, साहित्यिकांवर प्रभाव आहे पण तेलगूतील साहित्य किंवा रशियातील साहित्याचा प्रभाव मराठीत तेवढा पडला नाही. एका काळात एखाद्या देशाबद्दल असणारी जनमानसातील प्रतिमा काही

N.S.(B) COLLEGE PHALTAN

काळानंतर बदलते. मध्यस्थाची भूमिका आणि परिस्थिती यावर ते अवलंबून राहते. प्रभाव स्वीकारणाऱ्याचे प्रभुत्व, कालसापेक्षता आणि नवता या गोष्टीचा संबंध प्रभावाशी असतो.

**अमिय देव यांचा प्रभावाभ्यासाचा शोध**

प्रभाव, अनुकरण, ठसा (impact), परिणाम (effect), स्वागत (receiption) आदिशेष (servival) या सहा संज्ञा वाङ्मयीन संबंधाचे स्वरूप स्पष्ट करणाऱ्या आहेत. फ्रेंच पठडीच्या परंपरेला अनुसरून आंतरराष्ट्रीय वाङ्मयीन संबंध शोधण्याचा प्रारंभ अमिय देव यांनी केल्याचे आनंद पाटील यांनी 'तौलनिक साहित्य : नवे सिद्धांत आणि उपयोजन'या ग्रंथात नमूद केले आहे.

**लेखक/संहिता** : साहित्यकृती ⟶ प्रभाव प्रसार माध्यमे ⟶ स्वीकार-ग्रहण ⟶ अनुकरण-प्रभाव-ठसा (= परिणाम १) ⟵ आदिशेष (= परिणाम १)

**२. कालखंडीय प्रभावाभ्यास**

एका साहित्यिकांवरील किंवा साहित्यकृतीवरील प्रभावाचे मिश्रण तपासण्यासाठी कालखंडीय प्रभावाभ्यासाचा पाया असावा लागतो. साम्यवादी देशातील मार्क्सवादी अभ्यासकाचा आग्रह हा प्रभावांचे संबंध, कालखंड आणि वर्गकलहाच्या संदर्भात तपासणे असा असतो. सामाजिक व राजकीय संबंधाचा भाग म्हणून वाङ्मयीन प्रभावाकडे पाहणे. माहितीचे संचयन करून प्रभावाचा शोध घेणे. सामाजिक-सांस्कृतिक आंतर साम्याच्या प्रमाणात प्रभाव प्रक्षेपक किंवा स्वीकारक बनणे हे प्रभाव संबंधाचे एक चक्र असते. ए. एन. वेसेलेव्हस्की (Vesyolovsky) व व्ही. एम. झिर्मुन्स्की (Zhirmunsky) सारख्या रशियन तुलनाकारांची ऐतिहासिक काव्यमीमांसा ही भूमिका होती. कलाकृतीवर काळाचा व सामाजिक परिस्थितीचा ठसा असतो. काव्यात्म जाणिवेत सामाजिक जीवन प्रतिबिंबित होऊन ती जाणीव जीवनातील बदलांशी सुसंवादी रीतीने बदलते. हा ऐतिहासिक मीमांसेचा गाभा आहे. या दोन्हीही तुलनाकारांना प्रभावाची संकुचित व्यक्तिकेंद्रित कल्पना मान्य नाहीत.

झिर्मुन्सकीने वाङ्मयीन उसनवारी आणि ठशांचे सर्व सिद्धांत बाजूला केले. कवी हा कल्पनांची उसनवारी करीत नाही तर प्रभावी आवर्ती रूपचिन्हे (Motifs) कर्जाऊ (borrow) घेतो अशी भूमिका मांडली. खऱ्या असणाऱ्या कलात्मक प्रतिमाच प्रभाव पाडतात. कल्पना प्रभाव पाडत नाहीत. स्वीकार करण्यासाठी तो एक लढा नव्या परिस्थितीत वाङ्मयाला नवे आराखडे तयार करून देण्याच्या वळणावर घेऊन जातो. समानधर्मी प्रवृत्ती निरनिराळ्या राष्ट्रांच्या साहित्यात असतात. ही अट आंतरराष्ट्रीय प्रभाव घडून येण्यासाठी असते. त्यासाठी स्वीकारक साहित्याची गरज आणि सामाजिक परिस्थिती यांच्यात प्रभाव सुसंवादी असणे आवश्यक ठरते. अनेक ग्रंथातून त्याने प्रभावाचा संबंध सामाजिक बदलाशी जोडलेला आहे. उसने घेतलेले नमुने समाज जसेच्या तसे न स्वीकारता राष्ट्रीय स्वभाव धर्म वैशिष्ट्ये त्यांना धारण करायला लावतो.

PHALTAN COLLEGE

वाङ्मयीन प्रभाव हा अनेक अवस्थांतरानंतर प्रभाव म्हणून स्थिर होतो. प्रभाव प्रक्षेपक मूळलेखक / संहिता यांना स्वीकार करणारा लेखक/संहिता यांच्याशी जोडणारे ऐच्छिक मध्यस्थ ही स्वागताला वेगळे परिणाम प्राप्त करून देणारी मांडणी आहे. पण ती परिपूर्ण नाही असे देव यांनी कबूल केले आहे.

**३. स्वपन मजुमदारांची प्रभावाच्या सौंदर्यशास्त्राची मांडणी**

प्रभावाभ्यासाचा प्रमुख हेतू लेखकांच्या निर्मिती प्रक्रियेतील विविध आकृतीबंध आणि मातृका (matrice) दाब आणि ओढाताण समजून घेणे हा असतो. प्रभावाचे कार्यक्षेत्र निश्चित असत नाही. ते स्वीकारकाच्या मानसिक प्रक्रियेत व्यापून उरणाऱ्या समानुभूतीची (empathy) ची प्रेरणा देते. एकाच वेळी मूलाधाराच्या अनेक खुणा प्रभावात सापडतात. त्यात दूरच्या चकाकीचे प्रतिबिंब असते.

प्रभाव हा अनुकरणाने सुरू होऊन स्वागत प्रक्रियेतून त्याचे ठशात पर्यवसान होते. पर्यवसान होत असताना ते शोषक किंवा गर्भपतित असते. यशस्वी उदाहरणात तेथे आदिशेष अवतरतो. तोच आराखडा साहित्यामधील संबंधात विधिग्राह्य असतो. हा निष्कर्ष मजुमदार यांनी अमिय देव यांच्याप्रमाणेच मांडलेला आहे.

**४. हॅरॉल्ड ब्लूमचे वाङ्मयीन प्रभावाच्या चिंतेचे नवे सौंदर्यशास्त्र**

ब्लूमने प्रभाव संकल्पना केंद्रस्थानी ठेवून काव्य परंपरेचा पुनर्विचार केला आहे. त्याच्या मतानुसार एका कवितेचा स्वतंत्र व स्वयंभू साहित्यकृती म्हणून विचार करता येणार नाही. कारण ती एकाच परंपरेत गुंतलेली असून कवीचे प्रेम, द्वेष यामध्ये स्पर्धात्मक नाते असते. त्याचा कौटुंबिक रोमान्स काव्यावर परिणाम करतो. त्याच्यातील स्पर्धा, संघर्ष आणि युद्ध म्हणजेच युरोपातील आधुनिक काव्याची परंपरा होय. हा धाडसी सिद्धांत त्याने मांडला. प्रभावाच्या सिद्धांताचे उत्तम उदाहरण तो स्वतःच होता असा मिश्किल शेराही लेंट्रिकाने मारला आहे. ब्लूमने प्रभाव सिद्धांतात बदल करून अनुकरण परंपरा स्वीकारून मुलभूतता, उत्स्फूर्तता आणि नवता या संकल्पनावर गैर विश्वास व्यक्त केला पण त्या नाकारल्या नाहीत. मानवतावाद, धर्म आणि गूढवादाच्या आधारे त्याने उत्तर संरचनावाद्यांच्या सिद्धांताना प्रत्युत्तर देण्याचा प्रयत्न केला. त्यांनी काव्य प्रभावाला बौद्धिक उजळणीचा भाग ठरवले. ब्लूमच्या सिद्धांतावर अनेक आक्षेप घेण्यात आले. साधर्म्य सामाजिक स्थितीतून निर्माण होते. भिन्न देशात विशिष्ट समाज स्थितीत ते आढळतात. ही सामाजिक पायरीवरील प्रभावाभ्यासाची नवी दिशा रशियन रूपवाद्याने दिली आहे.

**५. नबी इस्ताईफची प्रभावाला पर्यायी मांडणी**

नबी इस्ताईफने प्रभाव संकल्पनेला पर्याय म्हणून स्फूर्ती (inspiration) ही संकल्पना मांडली आहे. धनको व ऋणको, देणारा आणि घेणारा हा भेदभाव टाळण्यावर त्याने भर देऊन या अभ्यासाची पाच पथ्ये सांगितली आहेत. ती थोडक्यात पुढीलप्रमाणे :

१. अभ्यास संहितेपासून सुरू व्हावा.

२. संहितांतर्गत पुरावे संहिता बाह्य पुराव्याच्या आधारे निश्चित करूनच परक्याची उपस्थिती संहितेत कशी आहे ते तपासावे.

N.S.(B) COLLEGE PHALTAN

३. या पुराव्याचे संदर्भ काळ व परिस्थिती लक्षात घेऊन जुळवावे.

४. त्या साहित्यकृतीचे वाङ्मयीनत्व कशात आहे, हे समीक्षा-पद्धतीच्या चौकटीत स्पष्ट करता आले पाहिजे.

५. साहित्यकृतीचा विचार साकल्याने व पूर्ण संहितेतील परक्याच्या उपस्थितीवर लक्ष एकाग्र करून व्हावा.

ह्या पंचसूत्रीच्या आधारे प्रभावाला पर्याय म्हणून सूचविलेल्या स्फूर्तीची संकल्पना धूसर व गूढ आहे तिचे स्वरूप अधिक विस्ताराने सोदाहरण स्पष्ट करावे लागेल असे आनंद पाटील यांनी या संदर्भात म्हटले आहे.

**६. स्वागत सिद्धांत**

प्रभाव व स्वागत या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. प्रभावात प्रतिसाद (response) अथवा स्वीकार/नकार व स्वागत ह्या प्रक्रिया संभवनीय आहेत. स्वागत अभ्यासात reception व wirkung (response or effect) यांच्यात फरक केला जातो. यामध्ये भिन्न दृष्टिकोण असले तरी त्यांचे साध्य एकच आहे. स्वागत अभ्यास पद्धतीचा समाजशास्त्र, कला, इतिहास इ. विद्याशाखांवर परिणाम झाला आहे. स्वागत सिद्धांत वाचकाशी संबंधित वाटतो. पण एखाद्या साहित्यकृतीवरील ठशाचे स्वरूप तपासणे, त्याचा परिणाम पाहणे, यातील पहिला वाचकांशी तर संहितेशी संबंधित आहे. जर्मन अभ्यासक स्वागत सिद्धांतात प्राचीन साहित्यकृतीवर लक्ष खिळवून न ठेवता साहित्यातील वाचकांची भूमिका तपासतात. हा नाविन्यपूर्ण विकास आहे असे आनंद पाटील यांनी स्पष्ट केले आहे.

**७. आंतर संहितात्मकता**

भारतीय कवीच्या सांकेतिक रचना किंवा प्राचीन वक्तृत्वशैलीशास्त्र (rhetoric) यामध्ये प्रभाव व आंतर संहितात्मकतेच्या कल्पनेचे मूळ सापडते. लेखक हा प्रथम वाचक असतो. त्यांच्यावर इतरांचे प्रभाव पडतात. सर्व संहिताना अन्य सहिता प्रभावित करतात. आडव्या तिडव्या छेदतात. प्रभावाचा आविष्कार कोणत्याही वाङ्मय संहितेत एकटा असत नाही. त्याचे जाळे असते. ते एकत्र नांदतातही संमीलित होतात, मोडले जातात आणि लढतात. सामाजिक व सांस्कृतिक घटकांशी प्रभाव व स्वीकारासंबंधीच्या समस्या जोडलेल्या असतात. उद्धृते, विडंबन, वाङ्मयचौर्य, प्रभाव असे विविध प्रकारचे संबंध एक व अनेक संहितामध्ये आढळतात. त्यांना आंतरसंहितात्मकता म्हटले जाते. पण एखाद्या संहितेचे नाममात्र उल्लेख आले म्हणून प्रभाव किंवा आंतरसंहितात्मकता सिद्ध होत नाही. साहित्यकृतीच्या संपूर्ण रूपरेषेत अर्थपूर्ण ठरण्यासाठी साम्य श्रुतयोजन किंवा उद्घृत असावे लागते, तरच त्यांना प्रभाव किंवा आंतरसंहितात्मकता म्हणता येते.

प्रभाव व आंतरसंहितात्मकतेच्या प्रवृत्ती भिन्न असून प्रभावावर आंतरसंहितात्मकतेचा मुलामा चढवला जातो. प्रभाव स्वायत्त मुक्त असून तो लेखकाच्या आज्ञेला बांधील नसतो. प्रभावाची जाणीव आंतर-संहितात्मकतेकडे घेऊन जाते. प्रभात या संकल्पाला चिकटलेली दुर्बोधना व चुका कमी होण्यास मदत होते. काही प्रश्न अनाकलनीयच राहतात. 'हॅम्लेट' हे विधान मराठीत कसे अस्पष्ट आणि गोंधळात टाकणारे आहे

N.S.(B) COLLEGE PHALTAN

ते पहा. 'हॅम्लेटचा महाराष्ट्रावर परिणाम' या विधानातील 'हॅम्लेट' याचा अर्थ नाटकातील रूपबंध की घटना असा घ्यायचा की ज्याचा परिणाम महाराष्ट्रावर, मराठी माणसांवर झाला आहे.

### ८. भालचंद्र नेमाडे यांनी मांडलेला प्रभावाभ्यासाचा आराखडा

भारतीय साहित्याच्या संदर्भात वाङ्मयीन विद्वानांनी प्रभावाभ्यासाची प्रमाणपट्टी न वापरता अभ्यास केलेला आहे. इंग्रजीचा भारतीय भाषेवर पडलेला प्रभाव हा भाषिक मूल्यांशी संबंधित होता. भाषिक संयोग हा संस्कृतीचा भाग असतो. राजकीय-समाजशास्त्रीय आणि मनोवैज्ञानिक प्रक्रियेशी तो जोडलेला असतो. यामध्ये दोन संस्कृतीचा संघर्ष होऊन भाषेच्या उपव्यवस्थांमधील विस्तार नव्या परिस्थितीशी कसा जुळवून घेतो हे त्यामधून दिसते. या ठिकाणी अविकसित घटक, भाषा ह्या इतर विकसित घटकाशी समांतर येण्याची ती एक प्रक्रिया असते. वाङ्मयकृतीच्या संहितात्मक संरचनेवर भाषेतील बारीकसारीक बदलाचा प्रभाव पडत असतो.

भाषाशास्त्र हे संहितात्मक असते. त्यामध्ये संपूर्ण भाषेचा अभ्यास होणे आवश्यक असते. भाषा एक चिन्हव्यवस्था असते. ती एक सौंदर्यशास्त्रीय व्यवस्था असते. यामधील सीमारेषा सामाजिक, सांस्कृतिक घटकांशी जोडलेल्या असतात. त्यामधील संघर्षातून दोन संस्कृतीशी संबंधित शैलीव्यवस्था, सौंदर्यशास्त्रीय व्यवस्था आणि ऐतिहासिक, सांस्कृतिक परंपरा भाषिक घटकांशी संबंधित असल्यामुळे करता येतो. असा भाषाशास्त्रीय प्रभावाचा आराखडा वाङ्मयीन प्रभावाच्या अभ्यासासाठी वापरता येईल असे भालचंद्र नेमाडे यांनी सांगितले आहे.

भाषिक प्रभावाचा आराखडा भाषाशास्त्रीय प्रक्रिया आणि घटना यांची कारणमीमांसा करतो. पण भाषिक प्रभावाच्या विविध अंगाचे स्पष्टीकरण देता येत नाही. त्यामुळे त्यांनी सोयीस्कर असणाऱ्या बहुमार्गी अभ्यास पद्धतीची सविस्तर मांडणी केली आहे.

बहुमार्गी अभ्यासपद्धतीत समावेश केलेल्या अभ्यासशाखाः

१. ऐतिहासिक भाषाशास्त्रीय

२. सामाजिक भाषाशास्त्रीय

३. तौलनिक वर्णनपर भाषाशास्त्र

४. वाङ्मयीन शैलीशास्त्राची अभ्यासपद्धत

### १. ऐतिहासिक भाषाशास्त्रीय

आंग्लपूर्व मराठी गद्य आणि त्यानंतरचे गद्य या नमुन्याधारे इंग्रजीचा मराठीवरील प्रभाव शोधणे हे ऐतिहासिक भाषाशास्त्रीय पद्धतीने शक्य होते. मूळ मराठी शैलीरूपे आणि इंग्रजीचा संपर्क झाल्यानंतरची शैली रूपे अशी तुलना करणे हा भाग या शाखेत येतो. नवीन रूपे आणि जुनी रूपे याची तुलना करण्याकरिता नवीन रचना करून तयार केलेली आधाररेषा निश्चित करणे.

N.S.(G) COLLEGE PHALTAN

### २. सामाजिक भाषाशास्त्रीय

द्विसांस्कृतिकता अस्तित्वात येते तेथे जित लोकांची संस्कृती ही द्विसांस्कृतिक निर्माण होते. त्याची भाषाही द्विभाषिकता स्वीकारते त्यावेळी प्रमाणापेक्षा आणि उपयुक्ततेपेक्षा अधिक द्विसांस्कृतिकता दिसू लागते. अशा वेळी ती रोखण्यासाठी देशीवादाच्या आधाराने शुद्धतेचा आग्रह धरणाऱ्या चळवळी निर्माण झालेल्या आहेत. परक्या संस्कृतीचा भाषेला प्रतिकार करण्यासाठी मराठीत संस्कृत शब्दांचा वापर इंग्रजी कालखंडात झालेला पहावयास मिळतो. या नव्या उसण्यारूपाने मूळ भाषेचा सजीवपणा नाहिसा होतो. जेते लोकांच्या ठिकाणी उसनवारी करणारा समूह येऊ पाहात असतो. परकीय संस्कृतीच्या प्रभावाच्या अवस्थेतून उसनवारी होते. प्रारंभी बदसूर, बेबंदता असली तरी त्यानंतर ती नाकारणे-स्वीकारणे या प्रक्रियेतून नियंत्रित होते. ग्राहक भाषेची उसनवारी आणि तिच्यातील बदल असा अभ्यास सामाजिक भाषाशास्त्रीय शाखेचा असू शकतो.

### ३. तौलनिक वर्णनपर भाषाशास्त्र

भाषिक प्रभावाचे विश्लेषण मांडणारा आराखडा वर्णनपर भाषाशास्त्राचा तौलनिक वापर करून दाखविता येतो. ऐतिहासिक भाषाशास्त्रातील अभ्यासातील नवीन रूपे व जुनी रूपे यांच्या तुलनेआधारे तयार केलेली आधाररेषा तिचा उपयोग या ठिकाणी संदर्भासाठी करता येतो. उसनवारीच्या प्रक्रियेने झालेल्या बदलामुळे ग्राहक भाषेतील वैशिष्ट्ये संपुष्टात येऊन भाषिक व्यवस्था बदलते. इंग्रजीतील अर्धविराम, स्वल्पविराम, अवतरणचिन्हे यामुळे मराठीला फायदा झालेला दिसतो. पण मराठीमधील मुक्तपणा व लवचिकपणा संपलेला असतो. उसनवारीने झालेला बदल आणि अंतर्गत घटकामुळे झालेला बदल हे मूळ संहिता तपासून उसनवारीची खात्री करता येईल असे नेमाडे यांनी सांगितलेले आहे.

### ४. वाङ्मयीन शैलीशास्त्राची अभ्यासपद्धती

ही अभ्यासपद्धती प्रभावाच्या विविध अवस्थामधील वाङ्मयकृतीचे विश्लेषण करण्यासाठी उपयोगी ठरणारी आहे. उसनवारीने आलेल्या वाङ्मयीन व सौंदर्यशास्त्रीय घटकांचा क्रम व संगती लागणे, शैलीलक्ष्यी तंत्रे, रूपबंध, प्रतिमा, प्रतीके, वाङ्मय प्रकार, चळवळी, साहित्यकृतीमधील पात्रे, प्रसंग, संविधानक यांचा समावेश केला जातो. हा तौलनिक अभ्यासाचा भाग आहे.

## ९. प्रभावाभ्यासाची वसंत बापट यांनी सुचविलेली पद्धत

विशिष्ट साहित्यिकांचा किंवा साहित्याचा अन्य भाषिक क्षेत्रात पडलेल्या प्रभावाचा अभ्यास कसा करता येईल. याचा नमुना म्हणून वसंत बापट यांनी रवींद्रनाथाचा मराठी साहित्यावरील प्रभावाभ्यासाचे उदाहरण दिले आहे.

असा अभ्यास करताना रवींद्रनाथाचा मराठी साहित्यात प्रथम कधी उल्लेख झाला आहे. पुढे त्याचा कसा लौकिक पसरला, त्याचा पहिला अनुवाद कोणी आणि कधी केला, वाचकावर काय परिणाम झाला.

N.S.(B) COLLEGE PHALTAN

त्याचे स्वागत कसे झाले. अनुवादितकृतीचे प्रकाशन करणारी संस्था, तिचे स्थान, त्यामुळे अनुवादित साहित्यकृतीला कसा आणि किती फायदा झाला. अनुवादक किंवा प्रकाशन संस्था सर्वसामान्य असल्याने साहित्यकृतीच्या स्वागताला झालेली मदत कशी होती, एकाच साहित्यकृतीचे किंवा इतर साहित्यकृतीचे झालेले अनुवाद, त्याच्या झालेल्या परिणामाचे स्वरूप, अनुवादातील सातत्य, त्याचे होणारे स्वागत, त्यांच्या साहित्याचे झालेले अनुकरण, अनुकरणातून निर्माण झालेल्या साहित्यकृती, त्यांची झालेली विडंबने, त्याच्यावर झालेली टीका, समीक्षा, भाष्यकारांची मते, त्यांच्या विचाराचे झालेले खंडण असा सर्व आढावा घेऊन त्यांच्याशी झालेली चर्चा, स्वरूप, अवलोकन याद्वारे मागोवा घेणे हा एक भाग आहे.

ही सर्व चर्चा व अभ्यासाचे टप्पे लक्षात घेऊन रवींद्रनाथांचा कोणत्या मराठी लेखकावर व लेखनावर प्रभाव पडलेला आहे, तो किती प्रमाणात अभिव्यक्त झाला, त्यामधील भाववृत्ती, जीवनदृष्टी याचा कविता, कथा, कादंबरी, नाटक, वैचारिक, निबंध, समीक्षा अशा अंगानी शोध घेऊन कोणत्या कालखंडात प्रारंभ झाला, तो पुढे वाढत गेला की, उतरत गेला असा चढ उताराचा आलेख कारणमीमांसेसह दाखविणे. रविंद्रनाथाच्या साहित्याचा प्रभाव व अप्रत्यक्ष प्रभाव कसा व कुठपर्यंत पोहोचला याचा शोध घेतल्यानंतर केलेल्या निष्कर्षाची मांडणी हा प्रभाव अभ्यास ठरू शकतो. ही वसंत बापट यांनी केलेली प्रभावाभ्यासाची मांडणी लक्षात घेण्यासारखी आहे.

प्रभाव अभ्यासाच्या आराखड्याची मांडणी अनेक अभ्यासकांनी उदाहरणासह केलेली आहे. ह्या सर्व प्रभाव अभ्यासकाच्या मांडणीतून प्रभाव अभ्यासाचे स्वरूप स्पष्ट होते. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, भौगोलिक, साहित्य व साहित्यिक या घटकाशी प्रभाव अभ्यासाचे स्वरूप संबंधित असते. प्रभावाची व्याप्ती ही सरसकट एकसारखी असत नाही. तो पूर्णपणे उलगडून दाखविता येत नाही. त्याचे प्रमाण कमी जास्त असू शकते. त्यामध्ये चढ आणि उतार, प्रारंभ आणि शेवट असतो.

साहित्याचा किंवा साहित्यिकाचा इतर क्षेत्रात प्रभाव पडतो. त्याचे स्वागत होते. त्याचे अनुकरण, अनुवाद, विडंबने, नकल होते. पण तो पडलेला प्रभाव सर्वांवर एकसारखा समप्रमाणात असत नाही. काही ठिकाणी त्याचा पूर्ण प्रभाव असेल तर कही ठिकाणी अंशतः प्रभाव जाणवेल. प्रभावाची व्याप्ती ही परिस्थितीशी संबंधित असते. तर कधी ती वस्तुस्थितीशी संबंधित असते. एखाद्या साहित्यिकांचा साहित्यावर थोड्या-बहुत प्रमाणात प्रभाव जाणवतो तर, एखादा लेखक किंवा त्यांची साहित्यकृती ही पूर्णपणे प्रभावातीत असते म्हणजे पूर्ण प्रभाव त्यावर पडलेला असतो.

अंशिक प्रभाव हा काही सीमित विभागापुरताच पडलेला असतो. शब्दांची लक्षणीय घटिते, छंदाचे प्रयोग, लेखक विशिष्ट विक्षिप्त लकबी एवढा मर्यादित प्रभाव असलेला दिसतो.

साहित्यकृती किंवा साहित्यिक यांचा प्रत्यक्ष प्रभाव इतर साहित्यिकावर किंवा साहित्यावर पडलेला दिसतो. शेक्सपिअरच्या साहित्याचा मराठी साहित्यिकांशी प्रत्यक्ष संपर्क आल्यामुळे मराठीत अनेक साहित्यिक आणि साहित्य यावर शेक्सपिअरचा प्रत्यक्ष प्रभाव दिसतो. नाट्याचार्य खाडिलकर यांच्यावरील शेक्सपिअरचा

N.S.(B) COLLEGE PHALTAN

प्रत्यक्ष प्रभाव 'सवाई माधवरावाचा मृत्यू' या नाटकात पहावयास मिळतो. महाकवी ग्योएथेच्या साहित्यावर रोमन साहित्याचा प्रभाव दिसतो, तर संत तुकारामाच्या अभंगावर संत कबीरांचा प्रभाव असल्याचे दिसते.

शेक्सपिअरच्या नाटकाचे अनुवाद, रूपांतर किंवा त्यासारखे साहित्य निर्माण करण्याची प्रेरणा मिळणे. शेक्सपिअरच्या अभ्यासासाठी स्वतंत्र मंडळे निर्माण होणे ही प्रत्यक्ष प्रभावाची उदाहरणे म्हणून सांगता येतात.

प्रत्यक्ष संपर्क न येता इतर साहित्य किंवा साहित्यिक यांच्या प्रभावातून साहित्य निर्माण होणे अप्रत्यक्ष प्रभाव असतो. मूळ साहित्याचा संपर्क न येता त्याच्या रूपांतरित साहित्याच्या प्रभावाने इतर साहित्य निर्माण होणे हा प्रभाव शेक्सपिअरच्या नाटकाच्या रूपांतरानी प्रभावित होऊन निर्मिती प्रेरणा निर्माण होणे असा दाखविता येतो किंवा शेक्सपिअर संदर्भातील लेखन व समीक्षा अभ्यासाने, वाचनाने, प्रतिभाविशेषांची जाणीव होणे, इतर मध्यस्थ घटकांमार्फत ओळख होणे, त्या परिणामातून स्वराष्ट्रीय साहित्यकृतीच्या गुणधर्माची चिकित्सा होणे हाही अप्रत्यक्ष प्रभाव म्हणून दाखविता येतो.

विखुरलेला, विरघळलेला, धूसर झालेला प्रभाव हा एक भाग प्रभावात असतो. प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष प्रभाव या ठिकाणी साहित्यिक किंवा साहित्यकृती यांच्यावर असत नाही. अल्प प्रमाणात केवळ स्मरणाइतकाच प्रभाव असतो. रूपांतरांची रूपांतरे, अनुकृतीच्या अनुकृतीची अनुकरणे त्यामधील फक्त विशेषाचा प्रभाव दिसून येतो. विशेषाचे स्मरण व्हावे एवढा अल्प प्रभाव त्या साहित्यकृतीत असतो. कालांतराने तोही नाहिसा होतो किंवा मिसळून जातो. काही जाणकारांना त्याची जाणीव होते. असा विरळ होत जाणारा, विखुरलेला, धूसर झालेला प्रभाव, मिसळून जाणारा असला तरी त्या प्रभावाचा काही काळ तरी प्रभाव असतो.

### १. प्रभावाभ्यासाची व्याप्ती

प्रभावाभ्यासाची संकल्पना स्वरूप अभ्यासल्यानंतर प्रभावाभ्यासाच्या व्यक्तीचा विचार करणे क्रमप्राप्त आहे. मानव व मानवी जीवनाच्या संबंधित सर्वच क्षेत्रात कोणत्या तरी घटकांचा, विचारांचा कमी अधिक प्रमाणात प्रभाव पडलेला असतो. प्रभाव ज्याच्यावर पडत नाही असे माणसांच्या संबंधित कोणतेच क्षेत्र दाखविता येणार नाही, अशी प्रभावाची व्यापकता आहे. तरीही अभ्यासाच्या सोयीसाठी आपणास सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि वाङ्मयीन कलाकृती अशी प्रभावाची व्याप्ती दाखविता येईल.

विशिष्ट साहित्यकृतीचा किंवा विशिष्ट साहित्यिकाचा इतर साहित्यकृतीवर किंवा साहित्यिकांवर प्रभाव पडतो. तो प्रभाव कधी अंशतः किंवा पूर्णतः, कधी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष, विखुरलेला, विरळ, धूसर झालेलाही दिसतो. प्रभावाभ्यासाच्या व्याप्तीमध्ये सामाजिक घटक आणि विचारधारा, सांस्कृतिक घटक, रूढी परंपरा आणि विचारधारा, राजकीय घटक आणि विचारधारा, वाङ्मयीन कलाकृतीमध्ये आशयसूत्रे, आविष्कारीती, तत्त्वज्ञान, जीवनदृष्टी आदी मूल्ये असा प्रभावाभ्यास करता येईल.

N.S.(B) COLLEGE PHALTAN

## प्रभावाभ्यासाची व्याप्ती

- सामाजिक
- सांस्कृतिक
- राजकीय
- वाङ्मयीन
  - आशयसूत्रे
  - आविष्काररीती
  - जीवनदृष्टी
  - मूल्ये

**स्वयं अध्ययन प्रश्न १**

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. महात्मा फुले यांच्या विचाराचा प्रभाव कोणत्या लेखकाच्या कादंबऱ्यात दिसतो ?

(अ) कृष्णराव भालेकर (ब) ना. सी. फडके

(क) शिवाजी सावंत (ड) ह. ना. आपटे

२. वा. म. जोशी यांच्या कादंबरीत कोणाच्या विचाराचा प्रभाव दिसतो ?

(अ) म. फुले (ब) म. गांधी

(क) डॉ. आंबेडकर (ड) वि. दा. सावरकर

३. वाङ्मयीन प्रभावाच्या चिंतेचे नवे सौंदर्यशास्त्र कोणी मांडले ?

(अ) स्वपन मजुमदार (ब) हॅरॉल्ड ब्लूम

(क) भालचंद्र नेमाडे (ड) वसंत बापट

४. नाट्याचार्य खाडिलकर यांच्यावरील शेक्सपिअरचा प्रभाव कोणत्या स्वरूपाचा होता ?

(अ) प्रत्यक्ष (ब) अप्रत्यक्ष

(क) अंशिक (ड) पूर्णतः

५. शेक्सपिअरच्या नाटकाच्या रूपांतरानी प्रभावित होऊन निर्मिती प्रेरणा निर्माण होणे हा प्रभावाचा कोणता प्रकार आहे ?

(अ) अप्रत्यक्ष (ब) सीमित

(क) प्रत्यक्ष (ड) धूसर

६. नेमाडे प्रभावातील कादंबरीकार म्हणून कोणाचा उल्लेख करता येईल ?

(अ) प्रवीण बांदेकर (ब) विश्वास पाटील

(क) चंद्रकुमार नलगे (ड) बाबा कदम

COLLEGE PHALTAN N.S.

७. संत तुकारामाच्या अभंगावर कोणाचा प्रभाव दाखविता येईल ?

(अ) संत ज्ञानेश्वर (ब) संत एकनाथ

(क) दासोपंत (ड) संत कबीर

८. अनेक गुणांनी मिळून संस्कृत महाकाव्याची एक परंपरा तयार झाली होती. तिला वसंत बापट यांनी काय नाव दिले आहे ?

(अ) पांडित्य प्रभाव (ब) संकुल प्रभाव

(क) संस्कृत प्रभाव (ड) प्रभाव

९. 'तौलनिक साहित्य : नवे सिद्धांत आणि उपयोजन' या ग्रंथाच्या लेखकाचे नाव सांगा.

(अ) वसंत बापट (ब) चंद्रशेखर जहागीरदार

(क) र. बा. मंचरकर (ड) आनंद पाटील

१०. वि. स. खांडेकर यांचा प्रभाव कोणत्या राज्यात आहे ?

(अ) कर्नाटक (ब) गुजरात

(क) तेलगू (ड) मध्यप्रदेश

## १.४ स्वयं अध्ययन प्रश्न व उत्तरे

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. (अ) कृष्णराव भालेकर २. (ब) म. गांधी ३. (ब) हेरॉल्ड ब्लूम

४. (अ) प्रत्यक्ष ५. (अ) अप्रत्यक्ष ६. (अ) प्रवीण बांदेकर

७. (ब) संत कबीर ८. (ब) संकुल प्रभाव ९. (ड) आनंद पाटील

१०. (क) तेलगू

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

**प्र. १ : दीर्घोत्तरी प्रश्न**

१. प्रभाव अभ्यासाची संकल्पना व स्वरूप सांगा.

२. प्रभाव अभ्यास म्हणजे काय ? ते सांगून वसंत बापट यांनी सुचविलेल्या अभ्यास पद्धतीची चर्चा करा.

N.S.(B) COLLEGE PHALTAN

**प्र. २ : लघुत्तरी प्रश्न**

१. प्रभाव अभ्यासाची व्याप्ती

२. भालचंद्र नेमाडे यांनी मांडलेला प्रभावाभ्यासाचा आराखडा

३. कालखंडीय प्रभावाभ्यास

## १.७ अधिक वाचनासाठी संदर्भ


१. तौलनिक साहित्य : दिशा आणि तत्त्वे (संपा.) चंद्रशेखर जहागिरदार, सौरभ प्रकाशन, कोल्हापूर, १९९२.

२. शोध शेक्सपिअरचा : वि. वा. शिरवाडकर, सुपर्ण प्रकाशन, पुणे १९८३


३. टीका स्वयंवर : भालचंद्र नेमाडे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९०.

४. तौलनिक साहित्य : वसंत बापट, मौज प्रकाशन गृह, पुणे १९८१.

५. मराठी नाटकावरील इंग्रजी प्रभाव : आनंद पाटील, लोकवाङ्मय गृह, मुंबई

६. तौलनिक साहित्य : नवे सिद्धांत आणि उपयोजन, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९८.


* * *



N.S.(B) COLLEGE PHALTAN

# हिंदी लघुकथा के विविध आयाम

(प्रयोजनमूलक हिंदी तथा हिंदी में रोजगार के अवसर)

संपादक मंडल अध्यक्ष
डॉ. आफ़ताब अनवर शेख

कार्यकारी संपादक
डॉ. शेख मोहम्मद शाकिर
डॉ. बाबा शेख



Scanned with OKEN Scanner

# हिन्दी लघुकथा के विविध आयाम

## (प्रयोजनमूलक हिन्दी तथा हिन्दी में रोजगार के अवसर)

N.S.(B) COLLEGE PHALTAN

**संपादक मंडल अध्यक्ष**

डॉ० आफ़ताब अनवर शेख

**कार्यकारी संपादक**

डॉ० शेख मोहम्मद शाकिर

डॉ० बाबा शेख

Principal
Namdevrao Suryawanshi(Bedke) College
Phaltan,Dist.Satara.

इण्टरनेशनल पब्लिकेशन

कानपुर (भारत)

Scanned with OKEN Scanner

COLLEGE PHALTAN (B)

ISBN : 978-93-87556-56-0

| | | |
|---|---|---|
| पुस्तक | : | **हिन्दी लघुकथा के विविध आयाम** |
| **संपादक मंडल अध्यक्ष** | : | डॉ० आफ़ताब अनवर शेख |
| **कार्यकारी संपादक** | : | डॉ० शेख मोहम्मद शाकिर, डॉ० बाबा शेख |
| **प्रकाशक** | : | **इण्टरनेशनल पब्लिकेशन** |
| | | 6ए/540, आवास विकास हंसपुरम्, कानपुर-208021 |
| | | E-mail : internationalpub09@yahoo.com |
| | | web. : www.internationalpublication.com |
| | | मो. : 9621955798 |
| संस्करण | : | **प्रथम, 2019** |
| शब्द-सज्जा | : | रुद्र ग्राफिक्स, कानपुर |
| मूल्य | : | 995/- (नौ सौ पनचानवे रुपए मात्र) |
| मुद्रण | : | ट्राइडेण्ट इंटरप्राइजेज, नोएडा |


Scanned with OKEN Scanner

15. हिंदी लघुकथा : इतिहास, स्वरूप और तत्त्व
**डॉ. बलवंत जेऊरकर** 64

16. रोजगार की सम्भावना हिन्दी एवं प्रयोजनमूलक हिन्दी
**प्रो. बसोरीलाल इनवाती** 67

17. हिंदी लघुकथा में विषय वैविध्य
**प्रा. बिचुकले एस. एस.** 71

18. हिंदी लघुकथा में बदलता परिवेश
**डॉ. दत्तात्रय नानासाहेब फुके** 75

19. हिन्दी लघुकथा में व्यक्त राजनीतिक व्यंग्य
**डॉ. बेवले ए. जे.** 79

20. हिन्दी लघुकथा लेखन एवं स्वातंत्र्योत्तर परिवेश
**डॉ. सुरेश मुंढे** 83

21. हिंदी की चुनिंदा लघुकथाएँ और लघुकथाकार : एक अध्ययन 87
**गणेश ताराचंद खैरे**

22. हिंदी लघुकथा के विविध आयाम 90
**प्रा. डॉ. सुनिता रामभाऊ हजारे**

23. लघु कथा और नैतिक मूल्य 93
**डॉ. हसनखान के कुलकर्णी**

24. चित्रा मुद्गल की लघुकथाओं में समसामयिक बोध 96
**डॉ. कदम एस. एम.**

25. प्रयोजनमूलक हिन्दी सेवामाध्यम (सर्विस टूल) बिना उपकरण की प्रयोगशाला 99
**डॉ. कैरोलिन सैनी**

26. प्रमुख लघुकथाओं में व्यक्त सामाजिक व्यंग्य 102
**डॉ. काळे पुष्पलता विट्ठलराव**

27. हिंदी लघुकथा में नैतिक मूल्य 105
**प्रा. डॉ. सौ. मंगला, श्री. कठारे**

28. रोजगाराभिमुख हिंदी भाषा 108
**प्रा. डॉ. बेबी कोलते**

29. शंकर पुणतांबेकर की लघुकथा में चित्रित व्यंग्य 112
**डॉ. रमेश संभाजी कुरे, प्रा. लुटे मारोतीभारतराव**

30. हिन्दी लघुकथा का स्वरूप एवं विकास 117
**डॉ. कुसुम कुंज मालाकार**

31. लघुकथा की पहचान 120
**प्रो. लता सुमन्त**

N.S.(B) COLLEGE PHALTAN

Scanned with OKEN Scanner

# 17

# हिंदी लघुकथा में विषय वैविध्य

प्रा. बिचुकले एस.एस

'लघुकथा' शब्द दो शब्दों से निर्मित है– 'लघु' तथा 'कथा'। 'लघु' का अर्थ है – छोटा तथा 'कथा', कहानी का पर्यायवाची शब्द है जो मूलतः संस्कृत से आया है। श्रेष्ठ लघुकथाकार शंकर पुणतांबेकर ने लघुकथा के संदर्भ में कहा है–''लघुकथा आकार में लघु होती है'। लघु होते हुए भी यह किसी भी अन्य विधा से प्रभाव में कम नहीं। बाहर अन्य विधा से जुड़े भले ही इसे स्वीकार न करे। लघुकथा को कम से कम शब्दों में सशक्त अभिव्यक्ति कहा गया है।''[1] लघुकथा की लघुता ही उसका प्रमुख तत्व है। ऐसा होते हुए भी वह विधा की गरिमा से युक्त है। परंतु लघुकथा कोई सुभाषित, विधान, चुटकुला या कोई समाचार नहीं है। लघुकथा कम शब्दों में मार्मिक और सार्थक बात कहती है। लघुकथा कम स्थान जरूर ग्रहण करती है लेकिन हृदय में गहरी उतरती है और हमारी चेतना को झकझोरती है। लघुकथा स्थान और समय की सरहदें लाँघकर मानव मन की गहरी अभिव्यक्ति में सार्थक भूमिका निभा रही है।

लघुकथा के संदर्भ में कहा जाता है ''लघुकथा वास्तव में 'सतसैया के दोहरे' की तरह है, जो छोटी होकर भी अति गंभीर प्रभाव डालती है।''[2] 'सारिका' पत्रिका में लघुकथा के आयाम, प्रयोजन, प्रहार, और व्यापकता के बारे में 1973 के लघुकथा विशेषांक में लिखा है– ''लघुकथाएँ ज्ञात समस्याओं, मान्यताओं, राजनीतिक और सामाजिक विसंगतियों आदि पर तीखें व्यंग्य प्रहारों के साथ नयी वैचारिकता और नयी मानसिकता की ओर इंगित करती है, साथ ही पाठकों और कथा मनीषियों के सामने कुछ प्रश्न चिन्ह भी खड़े करती है। क्या देशव्यापी विषाद से आज का जन सामान्य निजात पा सकेगा ? क्या इन विसंगतियों की कोई सीमा है? सामाजिक न्याय की आड़ में व्यवस्थागत अत्याचारों की यह त्रासदी आदमी को कहाँ पहुँचायेगी ये लघुकथाएँ इससे ज्यादा भी कुछ और कहती है।''[3] सचमुच आज लघुकथाएँ जीवन के हर पहलू से जुड़कर नई दिशाएँ खोज रही है।

'जागरण' पत्रिका में प्रकाशित 'गरीब की भूख' जितनी चर्चित लघुकथा है उतनी ही प्रासंगिक भी। वास्तव में यह कथा गरीबों पर सरकार द्वारा किया गया सबसे बड़ा मजाक है। एक पत्रकार नोएड़ा के कस्बों में गरीबों से मुलाकात करने जाता है। वहां सभी भूख से कंगाल और गरीब है पर वे अपने आपको अमीर बताते हैं। आखिरकार पत्रकार एक छोटे बच्चे से गरीबों की पूछताछ करता है तो वह अपने नेता का फोटो लाकर दिखाता है और कहता है– ''यहीं है हमारे भगवान जिन्होंने 21 रुपये कमाने वाले को भी अमीरों का दर्जा दे दिया है, अब हम सब अमीर है। खाने के लिए चार दिन से कुछ नहीं मिला मगर हम अमीर है। कपड़े नहीं है शरीर

COLLEGE (B) N.S. PHALTAN

Scanned with OKEN Scanner

पर, फिर भी हम अमीर है। वो छौड़ों अंकल अब तो हम किसी से भीख भी नहीं मांग सकते आखिर हम भी अमीर ठहरे।''[4]

S.(B.)N. COLLEGE PHALTAN

जगदीश कश्यप ने 'ब्लॅक हॉर्स' में इसी ओर संकेत किया है। बेटे के घर में पार्टी हो रही है। वह ऐय्याश और शराबी बन गया है पर माँ बेटे पर गुस्सा नहीं होती। क्रोध को मन में दबाए रखती है। वह रूद्राक्ष की माला जपते हुए भक्ति में मग्न रहने की कोशिश करती है। क्योंकि बेटे ने नया मकान बनवाया है बहन की शादी करवाई है। लोग उसे अफसर कहते हैं। अंत में जो बाप उसूलों से जिया है, जिसने बिड़ी तक को हाथ नहीं लगाया वह बेटे की तरक्की के लिए शराब लाने जाता है, अपने सारे सिद्धांत ताक पर रख देता है। वह जाते वक्त बेटे से कहता है–''देखो बेटे, तुम अपने साहब के पास जाकर बैठो। ला, रवि की माँ थैला दे मुझे। बता किस ब्रांड़ की लानी है, उसका नशा हिरन हो गया और वह बस इतना ही कह पाया, 'ब्लैक हॉर्स'।''[5]

छाया वर्मा ने आर्थिक विषमता की त्रासदी की ओर 'तीस रूपये' लघुकथा के जरिए इशारा किया है। जो अपने पुत्र को तीस रूपयों का दूध पिलाने में असमर्थ है। बस बंद करके माँ पैदल चलकर दोनों बच्चों के लिए तीस रूपये दूध के लिए बचाती है पर उसी दिन से मकान मालिक ने किराया बढ़ा दिया है। एक तरफ बचत है तो दूसरी तरफ खर्चा है। 'आमदनी अठन्नी, खर्चा रूपैय्या' की इस त्रासदी को मध्यवर्ग भुगत रहा है। ममता बिष्णोई ने 'यंत्रणा' लघुकथा में पति पत्नी के निम्नवर्ग और उच्च वर्ग के संबंधों में यंत्रणा देने के अलग अलग तरीकों पर प्रकाश डाला है। चौका बर्तन करने वाली महरी पति के हाथों रोज पीटती थी पर मारने, पीटने का दर्द तो कुछ घंटों में मिट जाता है। परंतु साथ साथ रहकर भी शारीरिक संबंध न होना बहुत बड़ी पीड़ा है। बहूजी इसकी शिकार थी। उसके कथन बड़े मार्मिक बन पड़े हैं। जो यंत्रणा के अंतर को स्पष्ट कर देते हैं। ''ये लोग सब एक से होते हैं। फर्क इतना होता है, कोई शारीरिक यातना देता है और कोई अहिंसक वह उससे कई ज्यादा कष्टप्रद और असहनीय होती है। पढ़े–लिखों की पत्नियाँ इस दौर से गुजरती है।''[6] दहेज प्रथा इस समाज को लगा कलंक है। उसके दुष्परिणामों पर ढेर सारी रचनाएँ लिखी गई है। परंतु हरिशंकर परसाई ने 'सुशीला' नामक व्यंग्यात्मक लघुकथा में दहेज से मुक्ति दिलाने वाली सुशीला को अलग रूप में दिखाकर बहुत से पिताओं की चिंता को मिटाया हैं। भागकर शादी करना यह दहेज समस्या का हल बन गया है। इस व्यंग्य को नजर अंदाज कर देने के बाद भी दहेज समस्या की भयावहता समाप्त नहीं होती।

आज कोई भी सामान्य व्यक्ति राजनीति से अछूता नहीं रह सकता वह भले ही सत्ता का भागीदार न हो पर सत्ता का आधार वही है। शंकर पुणतांबेकर जी इस संदर्भ में कहते हैं– ''ताश का खेल जनता पत्तों से, सत्ता की सतरंज जनता मोहरों से।''[7] राजनीति पर कई लघुकथाएँ लिखी गयी है। जिनमें राजनीति की गिरावट, चुनावी हत्थकंडे, नोटफॉर वोट, भ्रष्टाचार, भाई भातिजावाद, गंदी कूटनीति, जातिधर्म की राजनीति, दल बदलना, भाषणबाजी, गांधीवाद का उपयोग, आश्वासन नीती आदि विषयों की भरमार है।

'शासन' शब्द का अर्थ प्रभुत्व है। धन के छाते के रहते इसे विशेष कष्ट नहीं होता सरकारी तंत्र आज इतना अधिक बिगडा हुआ है कि वह तनखा सिर्फ कुर्सी पर बैठने की लेता है। चंद्रशेखर रेड्डी के अनुसार ''अगर नेता राजनैतिक क्षेत्र का खलनायक है तो, अफसर प्रशासनिक क्षेत्र का खलनायक बन गया।''[8] चापलूसी, घूसखोरी, सिफारिश, रिश्वत आज प्रशासन के अंग

Scanned with OKEN Scanner

PHALTAN N.S.(B) COLLEGE

बने हैं। अजय श्रीवास्तव द्वारा लिखी 'पांच फाईल प्रश्न' लघुकथा में प्रशासनिक कुव्यवस्था का भंडाफोड़ किया है। इसमें मिथक का प्रयोग किया है। जब फाईल दुनिया, शक्ति, आदि शक्ति, सर्वव्यापक, सुखी इनके संबंध में पांच सवाल पूछती है तो बड़े बाबू इतमिनान से अपनी आदत के अनुसार उनका जवाब इस प्रकार देते हैं– ''दुनिया फाईल पर टिकी है। सर्वज्ञ और सर्वशक्तिमान तो अपना साहब ही है। आदि शक्ति मेंमसाब है। सर्वव्यापक है भ्रष्टाचार और चमचा ही सर्वाधिक सुखी है।''[9] हर उत्तर आज के प्रशासन पर करारा तमाचा है। देश इतना अनपढ़ है फिर भी फाईलबाजी का बोलबाला है। अजातशत्रु के 'कुलयोग' लघुकथा में बाप के मुर्गियों की संख्या के सवाल के बारे में बेटे ने पूछा कि, ''पहले यह बताइए मुर्गीखाना सरकारी है या प्राइवेट ? क्योंकि अगर मुर्गीखाना सरकारी है तो वहां इतने मुर्गे–मुर्गियां हो ही नहीं सकते। अफसर नहीं खायेंगे।''[10] सचमुच आज सरकारी अधिकारी योजनाएँ चौपट कर रहे हैं और अपनी जेब भर रहे हैं। 'निरीक्षण' लघुकथा में आयुक्त के विभिन्न मूडस (लहरी मुहंमद मिजाज) की खिल्ली उडायी है। 'नागपूजा' इस लघुकथा में सेक्रेटरी के यौन शोषण को दर्शाया है। जो वर्तमान के 'मी–टू' विषय की गंभीरता को प्रकट करता है। गुशलन बालाजी–'गुप्त सूचना', अमर गोस्वामी–'थानेदार', प्रेम जनमेजय–'देशभक्ति' इन लघुकथाओं में भ्रष्टाचार, अनैतिकता, बेईमानी के साथ देशभक्ति किस प्रकार गाली बन गयी है यह स्पष्ट किया है।

आज अंकतालिका से भी डोनेशन तालिका का महत्व बढ़ गया है। नकल करने की आदत के कारण छात्र प्रतियोगिता परीक्षाएं पास नहीं हो पाते। डीग्री भलेही हो पर उनमें व्यवहारिक जीवन का मुद्दा न के बराबर है। चंद्रशेखर रेड्डी ने डिग्री और नौकरी के बारे में कहा है ''नौकरी के बाजार में डिग्री के सिक्के ही तो चलते हैं। वह जानता है कि शिक्षा का पाठयक्रम उसके व्यवहारिक जीवन से एकदम असंबद्ध है। लेकिन उसी से रात दिन जुझते रहना पड़ता है।''[11] डॉ. प्रकाश मनु ने शिक्षा क्षेत्र में चल रही चापलुसी का जायजा 'थैंक्यू सर' में लिया है। शंकर पुणतांबेकर ने 'विद्यालय' इस लघुकथा में संस्था अधिकारियों की मनमानी तथा दूसरों की गलतियों की सजा निर्दोष व्यक्ति भोगता है। बड़े–बड़े ही बनते हैं और आम आदमी आम आदमी ही रहते हैं यह स्पष्ट किया है। प्रदीप खेलने 'आरक्षणचक्र' लघुकथा के द्वारा उसके दुष्परिणामों की ओर समाज का ध्यान आकर्षित किया है। 'भोलाराम का जीव' जिस प्रकार पेन्शन के कागजों में अटका था, उसी प्रकार 'घटनाचक्र' के ठाकुर पेन्शन का इंतजार करते करते इस दुनिया से उठ गए थे। कागजी कार्यवाही में ट्रेजरी ऑफिसर किस प्रकार टांग अड़ा सकता है इसका उदाहरण यह लघुकथा है। आज के विदयार्थी परीक्षार्थी बन गए हैं। नकल की आदत, बढ़ती फीस, कोचिंग क्लास का बढ़ता महत्व, भाषा मिडियम का वाद, वेतन आयोग, भर्ती आंदोलन, नॉन ग्रंट कॉलेज, शिक्षा का व्यापार आज इन सभी समस्याओं से शिक्षा क्षेत्र घिरा है। इन सभी पर कई लघुकथाएँ लिखी गई है, जो बिढ़ताक्षा क्षेत्र के वांछनीय तत्वों के रक्षा की दुहाई दे रही है।

'सबक' (श्याम गुप्त) में शिक्षित औरतें पति के कहने पर गलत उम्मीदवारों को वोट देती हैं। पर नौकरानी लक्ष्मी अपने पति का कहना न मानकर काबिल उम्मीदवार को वोट देती है। वह कहती है कि, ''मैं अनपढ़ हूँ तो क्या हुआ, अच्छा बुरा तो समझती हूँ क्या हमें उतनी आजादी भी नहीं है कि स्वेच्छा से वोट डाल सकें।''[12] सुनिता जैन द्वारा लिखित लघुकथा 'शिक्षा' में शिक्षित औरतों से स्त्री भ्रूण हत्या करके समझदारी का दावा करती है तो ठेलेवाली को यह हिंसा

Scanned with OKEN Scanner

ठीक नहीं लगती उसे लडका–लड़की दोनों समान लगते हैं। वह लाड़ प्यार से कई बच्चियों का पालन–पोषण कर रही है। लेखिका ने यहां 'मानवता ही सच्ची शिक्षा है' यह बताने का प्रयास किया है। 'ओ मनहूस लड़की' लघुकथा में तन से भी मन का सुंदर होना आवश्यक है इस बात को स्पष्ट किया है साथ ही परिवार तथा समाज इस विचार को स्वीकार कब करेगा ऐसा सवाल उठाया है। शिखा कौशिक द्वारा लिखी 'तू केवल इन्सान' लघुकथा अंधविश्वास, मजहब, धर्म से परे मानवता का समर्थन करती है।

संक्षेप में लघुकथाएँ जनजीवन के विभिन्न कोणों को खंगालकर जीवन के सूक्ष्म अतिसूक्ष्म चेतना को प्रकट करती है। विविध विषयों पर लिखी इन लघुकथाओं में जीवनरस भरा हुआ है, जो मानव मन की आकांक्षाओं, आशावाद, संभावना के नए द्वार खोलता है। सारतत्व के रूप में लिखी गई ये लघुकथाएँ वास्तविकता का प्रकटीकरण करते हुए हमें मार्गदर्शन भी करती है। निष्कर्षतः यह कहा जा सकता है कि हिंदी लघुकथा विषय वैविध्य की दृष्टि से संपन्न है।

## संदर्भ


1. हिंदी साहित्य : आठवे दशक, सं. डॉ. शंकर पुणतांबेकर, पृ. 127
2. सारिका : कमलेश्वर, जून 1973, पृ. 15
3. सारिका – कमलेश्वर, जुलाई 1973, पृ. 08
4. गरीब की भूख –लघुकथा दै जागरण, 31 जुलाई, 2013
5. ब्लॅक हॉर्स – जगदीश कश्यप, सारिका, 31 मार्च, 1986, पृ. 17
6. यंत्रणा – ममता बिश्णोई, सारिका, दिसंबर, 1982, पृ. 26
7. व्यंग्य अमर कोष – शंकर पुणतांबेकर, पृ. 355
8. हिंदी व्यंग्य साहित्य – चंद्रशेखर रेड्डी, पृ. 77
9. पांच फाईल प्रश्न – अजय श्रीवास्तव सारिका, 16 मार्च, 1986, पृ. 23
10. कुलयोग, अजातशत्रु – सारिका, अगस्त 1974, पृ. 83
11. हिंदी व्यंग्य साहित्य – चंद्रशेखर रेड्डी, पृ. 31
12. सबक – श्याम गुप्त, 2016, आंतरजाल, भारतीय नारी ब्लॉग



हिंदी विभाग प्रमुख,
नामदेवराव सूर्यवंशी (बेडके) महाविद्यालय,
फलटण, जि. सातारा।


N.S.(B) COLLEGE PHALTAN

Scanned with OKEN Scanner

# हिंदी लघुकथा के विविध आयाम

(प्रयोजनमूलक हिंदी तथा हिंदी में रोजगार के अवसर)

N.S.(B) COLLEGE PHALTAN

## संपादक मंडल अध्यक्ष



**प्रोफेसर डॉ. आफताब अनवर शेख**

एम.कॉम., एम.बी.ए., पी-एच्.डी. प्राचार्य, पूना कॉलेज, कैम्प, पुणे 411001.

dranwarshaikh@gmail.com, 9822621579

**उपलब्धियाँ** - सावित्रीबाई फुले पुणे विश्वविद्यालय के सिनेट मेंबर (महाराष्ट्र शासन द्वारा नाम निर्देशित), सावित्रीबाई फुले पुणे विश्वविद्यालय के अध्ययन मंडल सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विश्वविद्यालय परीक्षा समिति के पूर्व सदस्य, इंडोग्लोबल चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री एन्ड एग्रीकल्चर, पुणे के अध्यक्ष, युवाकार्य एवं खेल मंत्रालय, भारत सरकार द्वारा राष्ट्रीय युवा सम्मानार्थी

पी-एच.डी., एम.फिल मार्गदर्शन-पी.एच्.डी के 28 छात्र तथा एम.फिल के 16 छात्रों ने पदवी प्राप्त की

**प्रकाशन**- कई ग्रंथों का प्रकाशन, संपादन तथा राष्ट्रीय, अंतरराष्ट्रीय पत्रिकाओं में अनेक शोधालेख प्रकाशित, विदेश यात्रा -चीन, ईरान, मलेशिया, थायलैंड, सिंगापूर, ओमान, यु.ए.ई. (दुबई, अबुधाबी, सौदी अरेबिया), फिजी, किंगडमऑफ टोंगा, श्रीलंगा तथा नेपाल की यात्रा

**पुरस्कार, सम्मान, उपलब्धियाँ** - विभिन्न संस्थाओं, भारत सरकार, महाराष्ट्र शासन, नेहरू युवाकेंद्र, पुणे विश्वविद्यालय आदि से लगभग 27 पुरस्कारों से सम्मानित

## कार्यकारी संपादक



**डॉ. शेख मोहम्मद शाकिर**

एम.ए., बी.एड्., पी-एच्.डी., नेट, सेट, असिस्टेंट प्रोफेसर एवं अध्यक्ष, हिंदी विभाग, एन.सी.सी. के अरटेकर ऑफिसर,

पूर्व विद्यार्थी विकास अधिकारी, पूर्व एन.एस.एस कार्यक्रम अधिकारी, पूना कॉलेज, कैम्प, पुणे 411001.

drshakirpune@gmail.com, 09423017017

**प्रकाशन**- 'कर्मयोगी स्वामी विवेकानंद' ग्रंथ 2002 में प्रकाशित, 'सावित्रीबाईफुले' ग्रंथ 2004 में प्रकाशित, 'नासिरा शर्मा के कथा साहित्य में समसामयिक बोध ग्रंथ 2011 में प्रकाशित

**संपादन कार्य**- 'वाग्धारा' राष्ट्रीय हिंदी सेवी महासंघ की पत्रिका का 2010 में संपादन, 'हिंदी साहित्य में नैतिक मूल्य ग्रंथ का 2013 में संपादन, 'हिंदी कथा साहित्य में स्त्री विमर्श एवं आदिवासी विमर्श' 2014 ग्रंथ का संपादन, 'हिंदी कथा साहित्य में स्त्री विमर्श एवं आदिवासी विमर्श 'इक्कीसवीं सदी के संदर्भ में 2015 ग्रंथ का संपादन, 'हिंदी साहित्य में राष्ट्रीय एकता एवं सांप्रदायिक सद्भाव' ग्रंथ का संपादन

**शोध आलेख प्रकाशन**- विभिन्न अंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय एवं राज्यस्तरीय संगोष्ठियों में 28 शोध आलेख प्रकाशित

**पुरस्कार, सम्मान, उपलब्धियाँ** - विभिन्न संस्थाओं, महाराष्ट्र शासन, नेहरू युवाकेंद्र, पुणे विश्वविद्यालय आदि से 16 पुरस्कार प्राप्त



**डॉ. बाबा शेख**

एम.ए., पी-एच्.डी., असिस्टेंट प्रोफेसर, हिंदी विभाग, विद्यार्थी विकास अधिकारी, पूना कॉलेज, कैम्प, पुणे 411001.

drbabashaikh@gmail.com, 09423717111

**प्रकाशन** : 'मुस्लिम समाज जीवन और अब्दुल बि.स्मिल्लाह के उपन्यास' ग्रंथ 2012 में प्रकाशित

**संपादन कार्य** : 'वाग्धारा' राष्ट्रीय हिंदी सेवी महासंघ की पत्रिका का 2010 में संपादन, 'हिंदी साहित्य में नैतिक मूल्य' ग्रंथ का 2013 में संपादन, 'हिंदी कथा साहित्य में स्त्री विमर्श एवं आदिवासी विमर्श 2014 ग्रंथ का संपादन, 'हिंदी कथा साहित्य में स्त्री विमर्श एवं आदिवासी विमर्श' इक्कीसवीं सदी के संदर्भ में 2015 ग्रंथ का संपादन, 'हिंदी साहित्य में राष्ट्रीय एकता एवं सांप्रदायिक सद्भाव' ग्रंथ का संपादन

**शोध आलेख प्रकाशन**- विभिन्न अंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय एवं राज्यस्तरीय संगोष्ठियों में 20 शोध आलेख प्रकाशित

**पुरस्कार, सम्मान, उपलब्धियाँ** - विभिन्न संस्थाओं से 4 पुरस्कार प्राप्त

**इण्टरनेशनल पब्लिकेशन**

प्रकाशक एवं पुस्तक विक्रेता

6ए/540 आवास विकास, हंसपुरम्, कानपुर -21

Email : internationalpub09@yahoo.com
Website : www.internationalpublication.in

ISBN 978-93-87556-56-0

9 789387 556560

₹ 995/-

Scanned with OKEN Scanner

# अक्षरगंध

: संपादन :

डॉ. मुतवल्ली मैजोद्दीन मैनोद्दीन

COLLEGE PHALTAN N.S.(B)
Principal
Namdevrao Suryawanshi(Bedke) College
Phaltan,Dist.Satara.

Scanned with OKEN Scanner

S.N. (B) COLLEGE PHALTAN

# अंतरंग


१. प्रभावी आत्मकथन : अंबुज / डॉ. कैलास दौंड

२. विचारप्रवर्तक आत्मकथनात्मक लेखांचे पुस्तक : अंबुज / डॉ. सतेज दणाणे

३. डॉ. बाबुराव गायकवाड यांची अनुवादित नाटके/ डॉ. सतेज दणाणे

४. बाबुराव गायकवाड यांच्या कादंबऱ्यांतील स्त्रीजीवनाचे अंतरंग / डॉ. कमल दणाणे

५. कथा, कविता आणि समीक्षण त्रिवेणी संगमाचा 'बाकी काही...' / श्री. प्रकाश क्षीरसागर

६. 'बाकी काही'च्या निमित्ताने.... / प्रा. सुरेश सोनटक्के

७. तीव्र संवेदनांचा कवितासंग्रह 'शेवटी.... शेवटी !' / डॉ. कैलास दौंड

८. समीक्षेची शोधयात्रा / प्रा. डॉ. चंद्रकांत पोतदार

९. डॉ. बाबुराव गायकवाड यांच्या साहित्यातील भाषासौंदर्य / डॉ. सतेज दणाणे

१०. साहित्य संवाद : डॉ. बाबुराव गायकवाड यांचा जीवनानुभव / डॉ. सतेज दणाणे

११. डॉ. बाबुराव गायकवाड यांच्या ललित लेखनातील चिंतनशीलता / डॉ. सतेज दणाणे




Scanned with OKEN Scanner

'अंबुज' हे रूढ आत्मकथनांपेक्षा वे[illegible]े आहे, ते आत्मकथनात्मक लेखांमुळे. हे लेख 'मल्हार', बेळगाव; साप्ताहिक देवदुर्ग, देवगड; दै. रणझुंजार, बेळगाव; आरती, साम्यवादी, साप्ताहिक शूर शिपाई, मुंबई; कोकण मराठा विकास मित्र, 'फुलराणी' या दिवाळी अंकातून व साहित्य साधना (ग्रंथ), साहित्य समन्वय, धारवाड; अस्मितादर्श, औरंगाबाद यामधून प्रकाशित झालेले आहेत. वेगवेगळ्या शीर्षकाखाली लिहिलेल्या त्या लेखांतून लेखकाने आपल्या जीवनातील काही अनुभव कथन केलेले आहेत. त्यामधून लेखकाचे बालपण, शिक्षण, घराण्याची पूर्वपीठिका, जीवनातील महत्त्वाच्या प्रसंगांचे चित्रण केलेले आहे.

'अंबुज' या पुस्तकातील पहिल्या लेखापासून शेवटच्या लेखापर्यंत लेखक आत्मकथन करतो आहे; पण इतर आत्मकथनकारांचे बालपण ते त्याच्या आत्मकथन प्रकाशित होण्यापर्यंतच्या जीवनातील चांगल्या-वाईट घटना-प्रसंगांचे चित्रण सलगपणे आलेले असते, तसे येथे दिसत नाही. त्यादृष्टीने हे आत्मकथन वेगळे ठरते. लेखकाने पहिला लेख 'पूर्वपीठिका' व शेवटचा लेख 'बढती' असा दिला असला, तरी घटना-प्रसंगांची मांडणी आणि लेखांतून जीवनाचा पट चढत्या क्रमाने आणि सलगपणे पाहायला मिळत नाही. या आत्मकथनातील विविध शीर्षकाचे लेख गायकवाड यांच्या जीवनाचा, बालपण ते विद्यापीठात प्राध्यापक म्हणून रूजू होण्यापर्यंतचा जीवनपट मांडणारे आहेत; पण गायकवाड यांचे जीवन सलगपणे उलगडले जात नाही. त्यासाठी आत्मकथन वाचायला विचारमग्न व्हावे लागते. विविध लेखांतून मांडलेला अनुभव, घटना-प्रसंग याची सांधेजोड करण्याची कसरत करावी लागते. लेखकाचे जीवन समजून घेण्यासाठी विचार करावा लागतो. त्यादृष्टीने 'अंबुज' हे आत्मकथनात्मक लेखांचे पुस्तक विचारप्रवृत्त करणारे आहे.

॥ २ ॥

'बलुतं' हे दया पवार यांचे आत्मकथन प्रकाशित झाल्यानंतर अनेक आत्मकथने प्रकाशित होऊ लागली. पुढे आत्मकथनांचे मोठ्या प्रमाणात लेखन झालेले दिसते. 'अंबुज'च्या संदर्भातही असेच होऊ शकेल



असे वाटते. सलगपणे जीवन अनुभव कथन करणे आणि सलगपणे एखाद्याचे जीवन अनुभव ऐकणे किंवा वाचणे, यापेक्षा जीवनातील काही मोजके आणि महत्त्वाचे प्रसंग कथन करणे किंवा ऐकणे हे नजिकच्या वर्तमानात सोईचे ठरेल. असे जर झाले तर लेखरूपातील आत्मकथन म्हणून 'अंबुज' हे मानदंड ठरेल. 'अंबुज' हे लेखकाचे संपूर्ण जीवन समजून घेण्यासाठी वाचकाला विचारप्रवण करते तसेच लेखकाच्या जीवनातील विशिष्ट असा भाग समजून घेण्यासाठी आवश्यक तेवढाच लेख निवडण्याची संधी उपलब्ध होते. त्या लेखातून लेखकाचे काही विशिष्ट पैलू समजून घेण्यासाठी घेता येतात. त्यासाठी म्हणजेच बदलत्या काळाप्रमाणे जगणाऱ्या, वागणाऱ्या वाचकांसाठी लेखात्मक स्वरूपाचे आत्मकथन महत्त्वाचे ठरेल.

आत्मकथनकार लेखकाने एखाद्या दैनिकातून किंवा नियतकालिकातून एखादा आत्मकथनपर लेख लिहिला असेल, तर त्या लेखकाच्या पुढच्या लेखाची उत्कंठा लागेल. मात्र लेखक समजून घेण्यासाठी त्याचे आत्मकथनपर अनेक लेखांचा अभ्यास करावा लागेल, हेही तितकेच महत्त्वाचे आहे.

डॉ. बाबुराव गायकवाड यांचे विविध नियतकालिकांतून प्रकाशित झालेले आत्मकथनपर लेख 'अंबुज' या पुस्तकात संग्रहित केलेले आहेत. त्यांनी 'घराण्याची पूर्वपीठिका' या लेखामध्ये आईचे माहेर, तिचे आईवडील, भाऊ, त्यांचे गाव आणि वडिलांचे आईवडील, त्यांचे गाव याविषयी कथन केले आहे. लेखांच्या शीर्षकातूनच त्यांची कल्पना वाचकांना येते. लेखकाच्या घराण्याची पूर्वपीठिका जाणून घेण्यासाठी वाचक तो लेख उत्कंठतेने वाचतो. असेच बालपण, शाळेतील दिवस, शाळेतील गटकल्पना, कसाई, शिकार, जाणता, अंबुज, सावकार, माझे गाव ते बनसारोळा, लातूरचा दवाखाना, उद्याचा सूर्य, प्रतिक्षा, नोकरीच्या शोधात आणि बढती हे लेख लेखकाच्या जीवनातील अनुभव मांडणारे आहेत. या वेगवेगळ्या शीर्षकांखालील अनुभव हे कथास्वरूपाचे वाटत राहतात, हे विशेष म्हणून सांगता येते.

लेखकाच्या जीवनाची करूण कहाणी यांमधील लेखांतून उलगडत जाते. बालपणापासून त्यांच्या जीवनात संकटांची मालिकाच सुरू झालेली



Scanned with OKEN Scanner

खूप त्रास झालेला आहे. खेळात जिंकल्या[illegible]ंद्रहासाच्या पाठीवर लेखकाला बसावे लागते. त्यावेळी लेखकाची चड्डी काढून नागवे करून तडाखे दिले जातात. ही जातीयता लेखकाला समाजजीवनात अनेक ठिकाणी अनुभवायला मिळाली. काही चांगली तर काही वाईट प्रवृत्तीची माणसे त्यांना भेटली. धोंडीबा या व्यक्तीने लेखक चौथीत पहिल्या नंबरने पास झाला, तेव्हा गावात गूळ-खोबरे वाटले होते. लेखकाला बनसारोळ्याच्या शाळेत जाण्याविषयी मदत करणारे आणि 'शिकून मोठा हो' असा आशीर्वाद देणारे धोंडीतात्या जातीपातीचा विचार न करता लेखकाला उचलून उराशी धरतात. त्यावेळी गावातील त्याला विचारणाऱ्या लोकांना धोंडीतात्या म्हणतो, 'तुमी माळकरी हाऊत नव्हं का ? एकनाथ महाराजांनी कुणाचं पोर कडेवर घेतलं होतं ?' 'महाराचं' कोणीतरी उत्तर दिले. 'हे मांगाचं आहे. म्हणून कडेवर घेण्यापरीस मी उराशी धरलंय, काई मपल चुकलं काय ?' असे मतलबी लोकांना उतरवून ठेवणारे धोंडूतात्या लेखकाला विद्यामंदिराचा मार्ग दाखवितात. त्यांच्याबद्दल लेखकाने कृतज्ञता व्यक्त केली आहे. विद्यापीठात प्राध्यापक म्हणून रूजू होत असताना 'जाती'मुळे आलेला अनुभव लेखकाला नवा नव्हता. मॉनिटर म्हणजे मास्तर अशी समजूत असणाऱ्या बालमनात खालच्या जातीचा मॉनिटर नसावा, ही कल्पना विद्यापीठातील प्राध्यापकाच्या मनातही असल्याचे लेखकाने 'बढती' या लेखात दाखवून दिले आहे. त्यांना रूजू न करून घेणारे प्राध्यापक 'ती जागा महारांसाठी राखीव होती, म्हणून आलात; पण आजपर्यंत उच्चवर्णियांना महारांनी कुठं शिकवलं होतं. ते वाटेल ते बोलू लागले.' परंपरा जपणारी माणसे खेड्यांत असतात, त्यांचे संस्कार लहान मुलांवरही होतात. या जातीचा अनुभव लेखकाने लहानपणापासून घेतला होता. आता विद्यापीठात रूजू होताना तेथील प्राध्यापकही जातीच्या टप्प्यातून बाहेर नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. तरीही ते अगदी संयमीपणे रागाचा कढ आवरून 'मला इतर स्टाफप्रमाणे सर्व काही मिळाले पाहिजे आणि वागणूकही सन्मानाची हवी' असे त्या प्राध्यापकाला सांगतात. ही त्यांची स्वाभिमानी वृत्ती या ठिकाणी दिसून येते. संयमी, नम्र, स्वाभिमानी आणि सडेतोड उत्तर देणाऱ्या लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाची 'अंबुज'मधून ओळख होते.



॥ ४ ॥

एका अनाथ मुलाने संघर्ष करीत केलेली वाटचाल 'अंबुज'मध्ये पाहायला मिळते. रस्त्यावर भीक मागणारं एक पोरगं कर्नाटक विद्यापीठात प्राध्यापक आणि विविध पदांवर अधिकारी म्हणून सेवा करते, मराठवाड्यातील खेड्यांत जाती-धर्माच्या चौकटीत आणि संस्कारित जडणघडण झाल्यानंतर शिक्षणासाठी अपार कष्ट करून मराठी साहित्यातील एक महत्त्वाचे साहित्यिक म्हणून ओळख असणारे डॉ. बाबुराव गायकवाड यांचे 'अंबुज' हे आत्मकथनात्मक लेखांचे पुस्तक तटस्थपणे, प्रांजळपणे जीवनपट मांडणारे आहे. 'प्रतीक्षा' या लेखामध्ये लेखक एक खोली घेऊन राहत होते आणि त्यावेळी तेथे रंगू नावाची मुलगी लेखकाला जाळ्यात गुंतवण्याचा प्रयत्न करीत होती; पण आपण शिकून मोठे व्हायचे. शिकली-सवरलेली व रूपवान बायको करायची हे लेखकाचे स्वप्न होते. त्यामुळे एका रात्री ती मुलगी लेखकाला बिलगून झोपली असता ते तिला खोलीतून बाहेर ढकलून लावून दाराची आतून कडी लावून घेतात आणि दुसऱ्या दिवशी ती रूम सोडून देतात. लेखक लिहितो, 'संधी चालून आली असताना उगीचच आपण नेभळटपणा केला. आपण शहाण्यासारखे वागलो. वाहवलो नाही, याचेही कौतुक वाटू लागले. नाहीतरी शेखरच्या चावट गोष्टी ऐकून आपण अनेकवेळा परेशान झालो होतो. शर्यतीत घोडा धावण्याची शिकस्त करत होता आणि क्षणभरात माघारी घेत होता.' (पृ. ९३) हे लेखकाचे प्रांजल निवेदन आहे. 'अंबुज' हे आत्मकथन प्रांजलपणे लिहिलेले आत्मकथन म्हणूनही वाचकांच्या लक्षात राहते.

'अंबुज' या आत्मकथनात दारिद्र्याचे जीवनचित्रण आहे. दुःख आहे, संघर्ष आहे. जातीचा अनुभव आहे. शिक्षणासाठीचा संघर्ष आहे. नात्याची माणसं तुटल्याची जाणीव आहे. चांगल्या माणसांबद्दलची कृतज्ञता आहे. वाईट माणसांच्या प्रवृत्तीचे चित्रण आहे. लेखकाने जीवघेण्या दारिद्र्यापासून वेदना सहन करीत केलेला प्रवास आहे. त्यांचे संघर्षमय, दारिद्र्याने ओतप्रोत भरलेले जीवन-अनुभव वाचत असताना डोळ्यांच्या कडा ओलावतात. ही डॉ. गायकवाड यांच्या जीवनाची दारूण कहाणी

N.S.(B) COLLEGE PHALTAN



Scanned with OKEN Scanner

'अनुवादकाला/भाषांतरकाराला तो ज्या भाषेतील कलाकृतीचा अनुवाद किंवा भाषांतर ज्या दुसऱ्या एका भाषेत करणार आहे, त्या भाषेतील ज्ञान असणे आवश्यक असते. एवढेच नव्हे तर त्या भाषेतील समाज, संस्कृती, पर्यायाने लोकसंस्कृती यांचे सजग भान असणे महत्त्वाचे ठरते.' (साहित्यसंवाद, पृ. ३४, ३५) याचा अर्थ अनुवादित साहित्याने समन्वय साधला पाहिजे. ही भूमिका अनुवादकर्त्यांची असायला हवी. त्यामुळेच एका भाषेतील समाजामधील समस्या दुसऱ्या भाषेतील समाजापर्यंत पोहोचतात. साहित्यामधील विषय, आशय आणि व्याप्ती समजून घेण्यास मदत होते. त्या भाषेतील भाषिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक समस्या व व्यवहार समजण्यास मदत होते. त्या-त्या ठिकाणचे आदर्श, रोजगाराच्या संधी, धर्म, जाती-संप्रदाय, स्त्री-पुरुष आणि मुले यांचे व्यवहार, त्यांच्या समस्या, त्यांचे आदर्श ह्याचे आकलन करता येते. तेथील देवदेवता, श्रद्धा-अंधश्रद्धा, आचार-विचार समजून घेता येतात. एकप्रकारे तुलनात्मक दृष्टिकोनातून अनुवादाच्या प्रक्रियेत एक प्रकारची दिशा मिळू शकते. वेगवेगळ्या भाषेतील समाजजीवन व व्यवहार समजून घेण्यामुळे विकास साधण्यास मदत होऊ शकते.

प्रस्तुत ठिकाणी 'आजचा माणूस' व 'गरिबांचा वाली' या अनुवादित नाटकांचा विचार करावयाचा आहे. ही दोन्ही नाटके एका अर्थाने संदेश देणारी, परिवर्तनाची दिशा देणारी, समाज बदलाची अपेक्षा करणारी आहेत. 'आजचा माणूस' या नाटकात एकूण दहा पात्रे आहेत. त्यापैकी तीन स्त्री-पात्रे आहेत. हे नाटक उदय शंकर भट यांच्या 'आज का आदमी' या हिंदी एकांकिकेचा अनुवाद आहे. यामध्ये आजचा माणूस ढोंगी, रंगी आहे. त्याचे जगणे हे दिखाऊ स्वरूपाचे आहे. समाजसुधारणेचा बुरखा घातलेला माणूस, स्वार्थी वृत्तीचा आहे याचे दर्शन घडते. एकूण समाजाच कसा भ्रष्टाचाराने बरबटलेला आहे, नीतिमूल्ये हरवलेली आहेत, त्यांना अनेक तऱ्हेचे रंग चढलेले आहेत, हे दाखविणारी ही नाट्यकृती आहे.

**समकालीन जीवनातील शिक्षण**

समकालीन जीवनातील वस्तुस्थिती या नाटकात मांडलेली आहे. शिक्षणव्यवस्था ही नावालाच राहिलेली आहे. तिथे विद्यार्थी घडविण्याचे



काम होत नाही; पण ज्ञानदानही केले जात नाही. शिकवणुकीमध्येही मुलांना ज्ञान मिळत नाही. त्यामुळे कच्ची पिढी निर्माण होत आहे. 'मास्तर इतका कामचुकारपणा करतो की, थोडंसं लक्ष नाही दिलं तर तावडतोब बेपत्ता होतो. स्वत: शिकवीत तर नाहीच, उलट बबीलाच वाच म्हणून सांगतो. वर गुपचूप बैठकीतले वर्तमानपत्र मागून घेऊन वाचत बसतो.' (पृ. ८) यावर या नाटकात भाष्य केले आहे. शिक्षणव्यवस्थेत आज ज्ञान दिले जात नसले, तरी पैसे घेऊन मुलांना पास केले जाते आणि मुलांचे पालकही आपल्या पाल्यांना पास करून घेण्यासाठी वशिला लावून पैसे देतात. शैक्षणिक क्षेत्रात सर्वच ठिकाणी अशी अवस्था झालेली आहे. इंटरपर्यंत शिक्षण झालेल्यांनाही लिहिता येत नाही. या समस्येवर प्रस्तुत नाटकातून दृष्टिक्षेप टाकलेला आहे.

**वर्गजाणिवा / गरीब-श्रीमंत भेद**

श्रीमंत असणाऱ्या वर्गाचे वर्चस्व नेहमीच गरीब वर्गावर असते. श्रीमंत व्यक्ती परंपरेने आणि सातत्याने गरिबांवर अन्याय करीत असतात. नोकर हा त्यांना कचऱ्यासमान वाटतो. ती माणसे नाहीत अशीच त्यांची भावना असते. त्यामुळे ते त्यांचे शोषण करीत असतात. प्रस्तुत नाटकात या संदर्भात धनपतराय व त्यांचा स्वयंपाकी यांच्यातील संवाद महत्त्वाचे आहेत.

**धनपतराय :** *(ओरडून) मूर्ख, यात लहान मोठ्यांचा कुठं प्रश्न आहे ? तुझ्याकडे नाही तर करू नको. करायचे तर करा, नाहीतर दुसरीकडे बघा, असे मुलांकडील लोकांना सांग. जगातील गरीब अजून मेले नाहीत. अनेक गरीब लोक आहेत, ज्यांच्याशी तुझ्या मुलीचे लग्न होऊ शकेल !*

**माताप्रसाद :** *(आवेशाने) माफ करा साहेब. प्रत्येक माणूस आपली मुलगी चांगल्या घरी देण्याचे स्वप्न बघतो. चांगले खाईल-पिईल, जिथे ती सुखात राहील. आपणही आपल्या मुलीसाठी...*

**धनपतराय :** *वा रे ! तू आमची बरोबरी करणार ? तुमच्या लोकांची हीच तर वाईट सवय आहे, की प्रत्येक मोठ्या माणसांबरोबर आपली बरोबरी करता ? घरात फुटकी कवडी नाही. उपाशी राहतील;*



N.S.(B) COLLEGE PHALTAN

Scanned with OKEN Scanner

करणारा आणि माताप्रसाद, नोकर, मुन्शी, नमितादेवी व मास्तर ही पात्रे शोषित म्हणून या नाटकात आलेली आहेत. डॉ. बाबुराव गायकवाड लिहितात, 'अनेक विचारांची वलये निर्माण करणारे व समकालीन कठोर जीवन वास्तवाचे रूप दाखविणारे (आज का आदमी) 'आजचा माणूस' हे नाटक आहे (प्रस्तावना). समकालीन समाजजीवनाचे वास्तव या नाटकात मांडले आहे. हे वास्तव बदलावे, याची जाणीव करून दिली आहे. त्या दृष्टीने परिवर्तनाचा संदेश देणारे हे नाटक आहे असे मला वाटते. कारण समाजवास्तव जर समजले तरच आपल्यात बदल होईल आणि समाज वास्तव दाखविण्याचा या नाटकातून प्रयत्न झालेला आहे हे मला विशेष महत्त्वाचे वाटते.

'आजचा माणूस' या नाटकामध्ये समाजजीवनातील अनेक प्रवृत्तींचा वेध घेतलेला आहे. नीतिमूल्ये हरवलेला, भ्रष्टाचारी, चारित्र्यहीन माणूसच समाजाला पैशावर आणि वशिल्यावर विकत घेऊन जगतो आहे. तो कोणताही डाग लागू न देता नामानिराळा राहतो. त्या संदर्भात कोणीच काही बोलत नाही. संतापही व्यक्त करीत नाही. उलट तो त्याची प्रसिद्धी करण्यासाठी वर्तमानपत्रांतून बातमी छापून येण्यासाठी प्रयत्न करतो. ही आजची स्थिती दाखविणारे नाटक आहे. समाजवास्तव मांडणारे म्हणून या नाटकाचा उल्लेख करता येईल. मात्र या प्रवृत्तीला बदल करण्याची ताकद हे नाटक देऊ शकत नाही किंवा तशी दिशा किंवा आशाही निर्माण करीत नाही. असे असले तरी अनैतिकता व दुर्गुणता घेऊन धनाढ्य माणूस संन्याशांच्या कृपाछत्राखाली विराजमान झालेला असतो. तो संन्याशी 'दुर्गुण जेव्हा सगुणावर मात करायचा प्रयत्न करते; तेव्हा अंतिम सत्य प्रकाशदायी होते,' हा उपदेश करून घर सोडून जातो. त्यावेळी धनपतरायला म्हणतो, 'मीठात दूध ओतले, तर ते नासते. मीठातल्या दूधाचा काही फायदा होत नाही. तुमचे हृदय मींठाचे आगार आहे. मीठाच्या आगारात दूध ओतले जात नाही.' (पृ. ३७) हे वाक्य आजच्या माणसाच्या ढोंगी, रंगी, स्वार्थी, नीतिहीन, चारित्र्यहीन वृत्ती-प्रवृत्ती बदलण्यास भाग पाडेल. हा परिवर्तनाचा संदेश या नाटकात मांडलेला आहे आणि धनपतराय हा गढूळ झालेल्या व्यवस्थेत बुडालेला आहे, हे आजचे समाजवास्तव अत्यंत प्रलयकारीरीतीने दाखविले आहे,



म्हणून या नाटकाचा उल्लेख 'आजच्या माणसाचे रंग दाखविणारे नाटक' असा करावा वाटतो.

डॉ. बाबुराव गायकवाड यांचे 'गरिबांचा वाली' हे अनुवादित नाटक मानवतेचा संदेश देणारे आहे. हे नाटक दोन अंकी असून पहिल्या अंकामध्ये पाच प्रवेश आहेत. दुसऱ्या अंकामध्ये ७ प्रवेश आहेत. समूहाशिवाय एकूण २६ पात्रे या नाटकाच्या रंगभूमीवर वावरतात. या नाटकातील प्रसंग एकसलगपणे घडत राहतात. एका घटनेतून दुसरी घटना घडत जाते. त्यामुळे वाचक नाटकाशी सुरुवातीपासून शेवटपर्यंत चिकटून राहतो. त्या दृष्टीने रसिकांची उत्सुकता टिकवून ठेवणारे हे नाटक आहे. या नाटकाचा आशय सामाजिक आहे. दलित, शोषित, वंचित समाजाच्या व्यथा, वेदना, समस्या या नाटकात दृश्यमान होतात, तर ख्रिश्चन धर्माचा प्रसार आणि ख्रिश्चन धर्माचे तत्त्वज्ञान मांडणे, हा या नाटकाचा हेतू असलेला स्पष्ट होतो. नाटककाराने ख्रिश्चन धर्माचे मानवतावादी तत्त्वज्ञान दृश्यमान करीत असताना तटस्थपणे चिकित्सा केलेली दिसून येते.

**नाटकातील समस्या**

नाटकात दृश्यमान झालेल्या प्रश्नांचा विचार करताना १) पहिल्या अंकातील पहिल्या प्रवेशापासून ते शेवटपर्यंत वयोवृद्ध माणसाकडे तरुण माणसे तिरस्काराने पाहतात याचे दर्शन घडते. त्यामधून लहान मुले, तरुण, वयोवृद्ध व धर्मगुरू आणि सावकार असे स्तर दिसतात. २) इंग्रजी भाषा आणि बोलीभाषा यांमधील संवादांतून अपरिचित भाषा ही अडथळा ठरत असलेली दिसते. ३) गरिबी, दारिद्र्य आणि अज्ञान मोठ्या प्रमाणात असलेले दिसते. ४) रोजगार आणि पैसा हे जीवनावश्यक घटक आहेत. ५) काम मिळालेले नसल्याने चोऱ्या कराव्या लागतात. ६) सावकाराची अरेरावी आणि माजोरी वृत्ती गरिबांचा छळ करते. ७) शिक्षणाच्या सोयी अत्यंत आवश्यक आहेत. ८) वृद्धाची संगोपना करणे. ९) कामाचे नियोजन करणे. १०) सावकारशाहीचा नायनाट करणे. ११) श्रमप्रतिष्ठा वाढीला लावणे असे अनेक प्रश्न या नाटकातून दृश्यमान होतात. काही प्रश्नांची सोडवणूक झाल्याने परिवर्तन झालेलेही दिसून येते. सावकारी वृत्ती माणसांना छळत राहते. त्यांचा



N.S.(B) COLLEGE PHALTAN

Scanned with OKEN Scanner

बाजूला आहेत. मादीग मातंग असे काय ालास ? (पृ. १) आम्ही दोघे हरिजन आहोत. (पृ. १२) देवाची माणसे ? चांभाराचा तयाप्पा (पृ. १४) जेव्हा माणसं कोणत्या जातीचा ऊस. अशा वाक्यांतून विनोद निर्माण झालेले. भाषिक भेदामुळे निर्माण झालेले हे विनोद महत्त्वाचे आहेत तसेच भाषेमुळे निर्माण होणारा फरकही महत्त्वाचा आहे. त्याचाही विचार या नाटकात मांडलेला आहे.

## नाटकाचा संदेश

ख्रिश्चन धर्म हा मानवतेचा विचार करणारा धर्म आहे. रोजगार केला पाहिजे, कष्ट केले पाहिजेत. एकीने राहिले पाहिजे. प्रभूची प्रार्थना करावी. कोणावर अन्याय करू नये असा संदेश देते. इतर धर्मांप्रमाणेच ख्रिश्चन धर्मातही दोष आहेत. धर्माचे प्राबल्य आहे. प्रतिष्ठा, उच्च-नीचता आहे. स्वार्थासाठी एकमेकांना हटविण्याची प्रवृत्ती आहे, हे नाटकातून दिसून येते. मराठी आणि कन्नड या भाषिक सीमारेषेवरील हे नाटक एकात्मकतेची जाणीव करून देते. जनतेसाठीच्या राज्याची, न्यायव्यवस्थेची आणि अन्न, वस्त्र, निवारा आणि संरक्षणासाठी आवाहन करते.

## अनुत्तरीय प्रश्न

ख्रिश्चन धर्माची तत्त्वे विशद करणारे, प्रायश्चित्त, पापाचा शेवट सांगणारे, प्रामाणिकपणाचे महत्त्व सांगणारे, एकात्मकतेची भावना वाढीला लावणारे, माणसाच्या कल्याणाचा विचार सांगणारे, 'गरिबांचा वाली' हे नाटक आहे. यामध्ये धार्मिक प्रश्नही आलेले आहेत. 'जनसेवा हीच ईश्वरसेवा' असे महान विचार या नाटकात येतात. मात्र सारे प्रश्न अनुत्तरीतच राहतात. १) फादर वाघाशी बोलतो, त्यानंतर वाघ निघून जातो. माणसांचा भाषेमुळे गोंधळ झालेला दिसतो; तिथे वाघ या प्राण्याला फादरची भाषा कशी समजली हे समजत नाही. २) फादर समाजोपयोगी अनेक कामे करतो. त्यासाठी लागणारा खर्च अवाढव्य असा आहे. लोकांना पगार दिला जातो. त्यांच्यावर आणि सुधारणा करण्यासाठी खर्च केला जातो. त्यासाठी लागणारा पैसा कोठून आणला जातो ? असे काही अपवाद या नाटकात आहेत. पहिल्या अंकात फादरला कोणी ओळखत नाही; परंतु शेवटी त्यांच्या कार्याने प्रभावित होऊन त्यांच्यामागे सर्वजण जातात. 'पुरोगामी विचारांच्या प्रसार-प्रचाराचे विशेषत: ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या जीवनावर आधारित असलेले, दलितोद्धार यावर प्रकाशझोत टाकणारे' (समन्वयवादी, पृ. ९) 'गरिबांचा वाली' हे नाटक असल्याचे डॉ. शरद गायकवाड यांनी नमूद केले आहे. फादरमुळे समाजामध्ये झालेला बदल या नाटकात उल्लेखनीय असाच दिसतो. मात्र फादरने केलेली कार्ये, कोर्टात वकिली, दोनशे एकर जमीन तयार करण्यासाठीचा खर्च, बंधारा बांधतानाचा खर्च, बैल, गुरेढोरे, शेळ्या, मेंढ्या व गाई-म्हशी देण्याची व्यवस्था, गुडन्यूज सोसायटी यासाठी येणारा पैसा कसा येतो ? या मागचा चमत्कार उघड होत नाही. तो प्रश्न अनुत्तरीतच राहतो.

## अनुवादाविषयी थोडेसे....

अनुवादकर्त्याला त्या भाषेचे ज्ञान असावे लागते. सामाजिक, सांस्कृतिक जीवन आणि त्या भाषेचे ज्ञान पुरेसे असावे लागते. व्याकरणदृष्ट्या चांगली माहिती असावी लागते. डॉ. बाबुराव गायकवाड अनुवाद आवडण्याचे कारण सांगतात, 'एखाद्या कलाकृतीचा अनुवाद, भाषांतर एखादा करत असेल, तर त्याला कलाकृती ज्या भाषेतील असेल, त्या भाषेचे अधिक ज्ञान असावे लागते, तरच त्या भाषेतील मानवी जीवन-संस्कृतीचा, जीवन-जाणिवांचा अज्ञात ठेवा, भाषांतरकार व अनुवादकाच्या हाती पडेल. त्यामुळे घरबसल्याही तुम्ही मनाने त्या भाषेतील लोकमानस, भाषेचा विस्तृत व वैशिष्ट्यपूर्ण प्रदेश न्याहाळू शकता.' (साहित्यसंवाद, पृ. ३६, ३७) आणि हे डॉ. बाबुराव गायकवाडांना साध्य झालेले आहे म्हणूनच त्यांनी हिंदी भाषेतील 'आज का आदमी' या उदय शंकर भट यांच्या नाटकाचा मराठीत 'आजचा माणूस' या नावाने अनुवाद केलेला आहे, तर कन्नडमधील 'दलितांचा वाली' या बुद्दण्णा हिंगमिरे यांच्या नाटकाचा मराठीत 'गरिबांचा वाली' असा अनुवाद केलेला आहे.

'आजचा माणूस' व 'गरिबांचा वाली' ही दोन्ही नाटके वेगवेगळ्या भाषेतील आणि त्या त्या प्रादेशिकतेच्या वैशिष्ट्यांसह मराठीमध्ये अनुवादित केलेली आहेत. ही दोन्हीही नाटके वेगवेगळ्या विषयांवरील आहेत. मात्र ती एक संदेश देताना दिसतात. 'आजचा माणूस' हे नाटक ढोंगी, सोंगी, रंगी,





N.S.(B) COLLEGE PHALTAN
Scanned with OKEN Scanner

## १०

# 'साहित्य संवाद' डॉ. बाबुराव गायकवाड यांचा जीवनानुभव

डॉ. सतेज दणाणे

लेखकाच्या जीवनाची जडणघडण आणि त्यांची साहित्यनिर्मिती सखोलपणे समजून घ्यावयाची असेल, तर डॉ. बाबुराव गायकवाड यांनी 'साहित्य संवाद' या ग्रंथामध्ये श्रोत्यांशी साधलेला संवाद पाहणे महत्त्वपूर्ण ठरेल असे वाटते. 'झळ', 'आग' या कादंबऱ्या, 'टिळा आणि इतर नाटिका' हा नाटकसंग्रह, 'बाज' कथासंग्रह, 'दलितेतर लेखक आणि दलित जीवन', 'दृष्टीक्षेप', 'आकलन', 'साहित्यवेध', 'अवलोकन' हे समीक्षाग्रंथ, 'हुंदका', 'सारे काही', 'स्पंदन', 'स्वप्नील' हे काव्यसंग्रह, 'दानचिंतामणी अतिंमब्बे' हे चरित्र, 'साहित्यवैभव', 'जिप्सी', 'आजचा माणूस', 'गरिबांचा वाली' हे अनुवादित साहित्य, 'कविवर्य भा. रा. तांबे यांची कविता' हे संपादित पुस्तक, 'हलकंफुलकं', 'पुन्हा एकदा हलकं फुलकं' हे ललित लेखसंग्रह, 'माणसे : जनातली आणि मनातली' हा व्यक्तिचित्रणसंग्रह, 'सरमिसळ', 'बाकी काही', 'अंबुज' हे आत्मकथनात्म लेख, ही संमिश्र स्वरूपाची ग्रंथसंपदा डॉ. बाबुराव गायकवाड यांनी निर्माण केली आहे. वि[illegible] वाङ्मयप्रकारांत लेखन करणारे आणि जवळजवळ तीस ग्रंथांचे लेखन करणारे लेखक म्हणून त्यांची जीवनाविषयी, साहित्यविषयीची आणि मानवी व्यवहाराविषयींची भूमिका त्यांच्या मुलाखतींमधून स्पष्ट झालेली आहे.

डॉ. बाबुराव गायकवाड यांच्या साहित्यावर विविध विद्यापीठांत एम्. फिल. व पीएच. डी.चे संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना गायकवाड यांनी दिलेल्या मुलाखती 'साहित्य संवाद' या ग्रंथात आहेत, म्हणून हा ग्रंथ मुलाखतीचा संग्रह आहे असे म्हणता येत नाही. या ग्रंथातून डॉ. गायकवाड यांचे भावविश्व उलगडत जाते. त्याच्या मुळाशी जीवनानुभूतींचे अनेक पदर आहेत. जातीयतेच्या जहरी अनुभवांतून कथा, कविता, कादंबऱ्यांची त्यांनी निर्मिती केलेली आहे. लेखक म्हणून असणारी त्यांची ओळख त्यांच्या साहित्यातून होते. त्यांचे साहित्य केवळ मनोरंजन व करमणूक करीत नाही, तर सामाजिक जागृतीसाठी चेतना देण्यांचे काम करते. हीच भूमिका डॉ. गायकवाडांची आहे. त्यांच्या कादंबऱ्यांचा नायक मानवतेच्या दृष्टिकोनातून विचार करणारा आहे. तो समाजकेंद्री आहे. सामाजिक समस्यांनी तो अस्वस्थ होतो. त्याची घुसमट होताना दिसते. सर्वच मानवजातींनी माणूस म्हणून गुण्यागोविंदाने जगावे, ही त्यांची इच्छाच त्यांच्या अस्वस्थेचे कारण असल्याचे गायकवाड नमूद करतात. ही लेखकाच्या साहित्यनिर्मितीत्री प्रेरणा असल्याचे दिसून येते.

समाजजीवन स्वार्थाने पोखरलेले असताना स्वत:चे दु:ख विसरून दुसऱ्यांना आनंद देणारा लेखकाचा स्वभाव आहे. त्यामुळेच ते जगण्यातले उणेपण शोधून इतरांसाठी जगण्याचा प्रयत्न करतात. ते म्हणतात, 'मी अनेक सुख-दु:खे, अडी-अडचणी व भलीबुरी माणसे अनुभवली आहेत, तरी हे माणसांचे नित्यनवे विश्व, त्यांच्या वृत्ती-प्रवृत्ती मला खुणावत आहेत. त्यांची व अज्ञात विश्वाची ओळख करून घेणे बाकी आहे. या जगताच्या जीवन-व्यवहाराचे व जगत पसाऱ्याचे मी अजूनही म्हणावे तसे व तितके निरीक्षण केलेले नाही. या सर्वांचा व्याप व विस्तार जाणून घेण्यासाठी मन तळमळत असते.' (साहित्य संवाद, पृ. ५४) ही अतृप्तता जीवन आणि



N.S. (B) COLLEGE PHALTAN
Scanned with OKEN Scanner

मिळतात. त्यामधली प्रा. इराप्पा गुरव यांनी एम्. फिल.च्या प्रबंधिकेसाठी घेतलेली मुलाखत डॉ. बाबुराव गायकवाड यांची कविताविषयक भूमिका स्पष्ट करणारी आहे. त्यांची कविता ही जीवनानुभवांतून निर्माण झाल्याचे दिसून येते. प्रा. विजयकुमार कुमठेकरांनी एम्. फिल.च्या प्रबंधिकेसाठी घेतलेली मुलाखत ही लेखकाची 'व्यक्ती आणि लेखक' म्हणून झालेली जडणघडण कथन करणारी आहे. 'आग' या कादंबरीची निर्मिती प्रक्रिया समजण्यास ती उपयुक्त होते.

'आग' निर्मितीचा त्यांचा दृष्टिकोन आणि सामाजिक वास्तव यांचा लेखकाने घातलेला मेळ हे 'आग'च्या निर्मितीत दिसून येतो. एकंदरीत कादंबरीची निर्मिती प्रक्रिया या मुलाखतीतून स्पष्ट होते. डॉ. बाळकृष्ण सरकटे यांची पीएच्. डी. प्रबंधासाठी घेतलेली मुलाखत दीर्घ स्वरूपाची आहे. ३०-३२ प्रश्न लेखकाला विचारले आहेत. या सर्वच प्रश्नांची लेखकाने विस्तारीत अशी उत्तरे दिलेली आहेत. कविता, कथा, कादंबरी, अनुवाद, संशोधन, समीक्षा व नाटक या वाङ्मयाच्या अंगाने केलेली मांडणी ही जीवनानुभवातील आहे. व्यक्ती आणि मराठी साहित्यातील विविध प्रवाह, महाविद्यालयातील आणि चळवळीतील अनुभव यांमधून लेखकाचे अनुभवविश्व कथन केलेले आहे. हा वाङ्मयीन निर्मितीचा आणि जीवनानुभवाचा लेखकाने वाचकांशी आणि प्रेक्षकांशी साधलेला 'वाङ्मयीन संवाद' आहे. तो त्यांचा जीवन अनुभव कथात्मक स्वरूपात आहे. त्यांना प्रश्न विचारणारी एक व्यक्ती असली तरी, ते एका व्यक्तीला आपले अनुभव कथन करीत आहेत; असे त्यांना वाटत नाही. ते समोर हजारो वाचक, प्रेक्षक, श्रोते बसलेले आहेत, अशी कल्पना करून ते जीवनानुभव आणि साहित्यनिर्मिती प्रक्रिया साध्या-सोप्या आणि सरळ भाषेत सांगत आहेत. एका अर्थी ते आजपर्यंत त्यांनी जगलेले, अनुभवलेले जीवन कथन करीत आहेत असेच वाटत राहते. त्यांच्या जीवनातील चांगले-वाईट प्रसंग, बालपणापासून ते एका विद्यापीठात मराठी विभाग प्रमुख म्हणून काम करताना आलेले विविध अनुभव ते मांडत राहतात. त्यामधून त्यांची जीवनाकडे, समाजाकडे आणि साहित्याकडे बघण्याची एक दृष्टी निर्माण झालेली दिसते आणि तीच त्यांची वाङ्मयीन दृष्टी किंवा साहित्यिक



दृष्टी त्यांच्या मुलाखतीमध्ये दिसून येते. त्याच भूमिकेतून त्यांनी दिलेल्या मुलाखती ह्या 'साहित्य संवाद' साधणाऱ्या आहेत याची खात्री पटते.

लेखकाने एक साहित्यिक म्हणून साहित्याच्या अनुषंगाने आपले जीवनानुभव मुलाखतींमधून व्यक्त करणारा साहित्याच्या विश्वातील 'साहित्य संवाद' हा एकमेव ग्रंथ असावा असे वाटते. त्यांच्या मुलाखतींमधून जुजबी माहिती मिळत नाही, तर मुलाखत घेणाऱ्या अभ्यासकाला त्याला आवश्यक असणाऱ्या माहितीपेक्षा कितीतरी पटीने जादा माहिती उपलब्ध होते. विचारलेल्या प्रश्नांचे होय किंवा नाही अशा स्वरूपात किंवा सांगता येणार नाही अशी उत्तरे देणारी अनेक माणसे आहेत. आपले ज्ञान झाकून ठेवणारे आणि स्वतःला मोठे विद्वान समजणारेही अनेक लोक आहेत. या सर्वांपेक्षा वेगळा असणारा साहित्यिक, जो साहित्याच्या प्रांतात रममाण झाला, जीवनानुभव साहित्यातून मांडले, यापेक्षाही वेगळेपण म्हणजे मुलाखतींच्या माध्यमातून त्यांनी 'साहित्य संवाद' साधला आहे. हे डॉ. बाबुराव गायकवाड यांचे वेगळेपण असल्याचे नमूद करावेसे वाटते. (५ थिंक टँक मधून साभार)

❖ ❖ ❖



N.S.(B) COLLEGE PHALTAN

Scanned with OKEN Scanner

धुम्रकक्ष उघडलेले आहेत. त्याप्रमाणे पिकदाण्या ठेवाव्यात असेही लेखकाने सूचित केले आहे. मात्र या प्रयत्नाने काहीच साध्य होत नाही. त्यासाठी आचारही सुसंस्कृत असण्याची गरज आहे, तरच थुंकण्याची संस्कृती लोप पावेल असे लेखकाला वाटते. ही लेखकाची सुसंस्काराविषयीची चिंतनशीलता असलेली दिसून येते. लेखक ललित लेखनातून प्रबोधन करत असताना दिसून येतो. माणसांना शहाणे, सुसंस्कारित करणे, त्यांचे परिवर्तन करणे हा हेतू त्यांच्या लेखनाचा असलेला सतत जाणवत राहतो.

**सावधतेविषयक चिंतनशीलता**

लेखकाने सावधानतेविषयीची चिंतनशीलता 'सावध आणि बेसावध' या लेखातील अनेक अनुभवांतून व्यक्त केली आहे. माणूस कितीही सावध राहिला तरी त्यांच्यावर नको ते प्रसंग येत असतात. त्यासाठी माणसांना 'सावध' आणि 'बेसावध' यामधला क्षण पकडता आला पाहिजे, तरच माणसाच्या जीवनातील अडचणी कमी होतील. हे वारकाकडे दाढी करण्याचा प्रसंग, संस्थेच्या दवाखान्यातील डॉक्टर, गेटसमोर गाडी उभी केली म्हणून भांडणाचा निर्माण झालेला प्रसंग, फळे व भाजी घेतानाचा प्रसंग अशा प्रसंगांतून सावधतेविषयक जागृतता लेखकाने दाखवून दिली आहे, तर 'चक्रधारी' या लेखामध्ये विनम्र असणारा कारचालक आदराने वागायचा, मात्र काही दिवसांनी प्रवास करीत असताना गाडी १४० च्या गतीने चालवायचा, सावकाश चालव बाबा म्हटले की, सवय झालीय सर म्हणायचा. तो कारचालक लॉजच्या खोलीमध्ये न झोपता कारमध्ये झोपतो. सकाळी पेट्रोलचा हिशोब बघितल्यावर चार पाच लिटर रात्रीतून पेट्रोल कमी झालेले लेखकाला दिसते. या प्रसंगातून सावधतेविषयक चिंतनशीलता लेखकाने व्यक्त केलेली दिसून येते.

**सौंदर्याचा वेध घेणारी चिंतनशीलता**

डॉ. गायकवाड हे सौंदर्याचा शोध आचार विचारांत घेताना दिसतात. माणसाच्या वर्तनातील सौंदर्याविषयीची चिंतनशीलता त्यांनी व्यक्त केलेली आहे. डॉ. अ. रा. यार्दी म्हणतात, 'डॉ. गायकवाडांचे 'हलकंफुलकं' व 'पुन्हा एकदा हलकंफुलकं' हे दोन्ही लेखसंग्रह वाचत असताना काही गोष्टी



प्रकर्षाने जाणवल्या. ललित लेखन हे बऱ्याच वेळा गंभीर चिंतनाकडे वळणारे व विचारांच्या वादळात सापडूनही सौंदर्यासक्तीचे भान ठेवणारे असते. ('समन्वयवादी' पृ.२९२) याचा प्रत्यय 'दात : एक समस्या', 'सौंदर्य' आणि 'सुगंध' या लेखांमधून येतो. सौंदर्य हे व्यक्तीच्या दृष्टीने असते. त्यानुसार त्यांना जग दिसत असते. लेखक हॉटेलात चहा पिण्यासाठी गेलेले असताना त्यांना हॉटेलात दिसलेले सुंदर जोडपे. ते जोडपे हॉटेलच्या पायऱ्या उतरत जाताना त्यामधील 'ती' आंधळी असल्याचे तिने त्याच्या खांद्यावर हात ठेवून चालण्यातून समजते. लेखकाला वाटते, ती नवऱ्याच्या डोळ्याने बघते म्हणून ती डोळस आहे; हा त्या तरुणीचा सौंदर्य विचार आहे. हेच जगण्यातले सौंदर्य असल्याचे लेखकाला जाणवते. लेखक माणसांच्या आचार-विचारांतील सुसंगतीत सौंदर्याचा शोध घेतो. त्यांना त्या जोडप्याची सुसंगती सुंदर दिसते. ही एक कवीकल्पना वाटावी, असा अनुभव लेखकाची सौंदर्यदृष्टी स्पष्ट करणारा आहे.

**मित्रत्वाची चिंता व्यक्त करणारे लेखन**

लेखक माणसांच्या जीवनातील अनेक गोष्टींचे अगदी बारकाईने निरीक्षण करतो. त्या गोष्टीविषयी गंभीर चिंतन व्यक्त करतो. ते वाचकांना विचार प्रवृत्त करते. त्यांच्या लेखाचा शेवटही परिणामकारक आहे, तर लेखांची शीर्षके लक्षवेधक ठरतात. मैत्री हा लेख 'श्रीकृष्ण-सुदाम्याच्या' मैत्रीची आठवण करून देऊन ही आदर्श मैत्री लोप पावल्याने 'सोयीसाठी मैत्री व मैत्री एक सोय' हे चित्र विविध अनुभवातून स्पष्ट केले आहे. प्रीती व विश्वासावर मैत्रीचे नाते दृढ होते; परंतु इंद्रियांची जागरूकता हरवली गेल्याने माणसाचे आता प्राणीही अनुकरण करत नसल्याची चिंता लेखकाने व्यक्त केली आहे. लेखक म्हणतो, 'आज मित्रांच्या घरीही अपॉईंटमेंट घेऊन भेट घेण्याची वेळ आली आहे. अशा मित्राच्या घरी जाणेच मी बंद केले आहे. एक मित्र तर माझ्याबरोबर राहून व गोड बोलून माझ्याशी फटकून राहणाऱ्या मित्राकडे माझे गुपीत सांगून आपला स्वार्थ साधत होता.' ('हलकंफुलकं' पृ. ५३) म्हणून अशा शेकडो मित्रांपेक्षा जीवास जीव देणारा एकच मित्र असावा, ही त्यांची अपेक्षा खऱ्या मित्रत्वाचा शोध घेणारी आहे.



N.S.(B) COLLEGE PHALTAN

Scanned with OKEN Scanner

अंगाने वेगळे आहे. त्यांनी म्हणी व वाक्प्रचारांचा केलेला वापर हा लेखांची उंची वाढविणारा आहे. त्यामुळे लेखनाला भारदस्तपणा आलेला आहे. शाब्दिक कोट्या आणि प्रसंगनिष्ठ विनोद हे त्यांच्या लेखनाचे एक विशेष आहे. परिणामकारक शेवट आणि लक्षवेधक शीर्षके, कंसामध्ये सढळ माहिती देणे, प्रांजळपणा, आत्माविष्कार, व्यवहारीतील दाखले, आटोपशीरपणा, विरोधी शब्द, एका कान्यामुळे बदलणारे शब्दाचे अर्थ (यावर सविस्तर लिहिता येते), गाणी, कविता, गझल चित्रपटातील संदर्भ देणे, नवीन शब्दांची मांडणी, व्यवहारात वापरात नसलेले शब्द आणि म्हणींचा वापर, संवादात्मकता असे अनेक विशेष त्यांच्या ललित लेखनाचे नोंदविता येतात.

**संदर्भ ग्रंथ**


१. गायकवाड, बाबुराव - 'हलकंफुलकं', मंजुल प्रकाशन, पुणे २०११.

२. गायकवाड, बाबुराव - 'पुन्हा एकदा हलकंफुलकं', मंजुल प्रकाशन, पुणे २०१२.

३. यार्दी, अमृत व गायकवाड, विनोद, (संपा.) 'समन्वयवादी', मंजुल प्रकाशन, पुणे २०१४.

४. दणाणे, सतेज - 'डॉ. बाबुराव गायकवाड यांचे ललित लेखन', अक्षय प्रकाशन, रत्नागिरी, २०१४. ('माझी मराठी' मधून साभार)


N.S. (B) COLLEGE PHALTAN

Scanned with OKEN Scanner

COLLEGE * N.S.(B) PHALTAN

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूर शिक्षण केंद्र

सत्र पहिले : अभ्यासपत्रिका क्र. ३

# आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास

(स्वातंत्र्यपूर्व काळ)

सत्र दुसरे : अभ्यासपत्रिका क्र. ७

# आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास

(स्वातंत्र्योत्तर काळ २००० पर्यंत)

(शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून)

Principal
Namdevrao Suryawanshi(Bedke) College
Phaltan,Dist.Satara.

एम. ए. भाग १ : मराठी

N.S. (B) COLLEGE PHALTAN

**आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास**
एम.ए.भाग १: मराठी
अभ्यासपत्रिका क्रमांक ३ व ७
२०१८ पासून होणाऱ्या परीक्षांसाठी

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०१८
एम. ए. भाग-१ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार

**प्रती :** १,०००

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

ISBN- 978-81-939381-6-4

★ दूर शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४. (भारत)

★ दूर शिक्षण विभाग-विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या विकसन अनुदानातून या साहित्याची निर्मिती केली उ

S.N. (B) COLLEGE PHALTAN

# दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिती ■

**प्रा. (डॉ.) डी. बी. शिंदे**
मा. कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) ए. एम. गुरव**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) भारती पाटील**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. डी. राऊत**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्या
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. एम. ए. काकडे**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. ए. अनुसे** (सदस्य सचिव)
संचालक, दूर शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ समन्वय समिती : मराठी ■

अध्यक्ष - **डॉ. राजन गवस**
मराठी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. डी. ए. देसाई**
  विवेकानंद कॉलेज,
  कोल्हापूर
- **प्रा. डॉ. डी. के. वळवी**
  श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय,
  कोल्हापूर

दूर शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

आधुनिक मराठी वाङ्मयाचा इ
एम.ए.भाग १: 
अभ्यासपत्रिका क्रमांक ३

**अभ्यास घटकांचे लेखक**

| लेखक | घटक क्रमांक आणि शीर्षक |
|---|---|
| **सत्र पहिले : अभ्यासपत्रिका क्रमांक ३ : आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास** (स्वातंत्र्यपूर्व का | |
| **डॉ. सतेज दणाणे**<br>नामदेवराव सुर्यवंशी महाविद्यालय, फलटण | १. **वाङ्मयेतिहासाची संकल्पना** |
| **डॉ. प्रियांका कुंभार**<br>शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालय, मिरज | २. **भाषांतरीत वाङ्मय** |
| **प्रा. सुभाष पाटील**<br>कस्तुरबाई वालचंद कॉलेज, सांगली | ३. **पत्रकारिता** |
| **डॉ. सुरेश बाळकृष्ण शिंदे**<br>बाबासाहेब चितळे महाविद्यालय, भिलवडी | ४. **कथात्म साहित्य – कथा, कादंबऱ्या नाटक, कविता** |
| **सत्र दुसरे : अभ्यासपत्रिका क्रमांक ७ :**<br>**आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास (स्वातंत्र्योत्तर काळ २००० पर्यंत)** | |
| **डॉ. वनश्री फाळके**<br>पी.एल. श्रॉफ कला व वाणिज्य महाविद्यालय, चिंचणी | १. **१९५० ते २००० या काळातील साहित्याची सांस्कृतिक, राजकीय आ सामाजिक पार्श्वभूमी** |
| **डॉ. प्रकाश दुकळे**<br>देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक कॉलेज, चिखली | २. **नवसाहित्य आणि महानगरीय साहित** |
| **प्रा. डॉ. शिवाजीराव पाटील**<br>कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, कोवाड | ३. **दलित, आदिवासी, ग्रामीण साहित्यप्र** |
| **प्रा. डॉ. उज्ज्वला पाटील**<br>शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे महाविद्यालय, कराड | ४. **स्त्रीवादी आणि इतर साहित्यप्रवाह** |

■ संपादक ■

**डॉ. सुरेश बाळकृष्ण शिंदे**
बाबासाहेब चितळे महाविद्यालय, भिलवडी,
ता. पलूस, जि. सांगली

N.S.(B) COLLEGE PHALTAN

N.S.(B) COLLEGE PHALTAN

# संपादकीय

'आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास' ही अभ्यासपत्रिका एम. ए. भाग-१ च्या सत्र-१ व २ साठी आहे. या अभ्यासपत्रिकेमध्ये सत्र एक साठी आधुनिक मराठी वाङ्मय स्वातंत्र्यपूर्व यामध्ये १. वाङ्मयेतिहासाची संकल्पना, २. भाषांतरीत वाङ्मय, ३. पत्रकारिता, ४. कथात्म सा कथा, कादंबऱ्या, नाटक, कविता; तसेच सत्र दोन साठी स्वातंत्र्योत्तर काळ १. १९५०-२ सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय पार्श्वभूमी, स्वातंत्र्योत्तर काळ, सामाजिक राजकीय परि नवविचार प्रवाह, वाङ्मयीन चळवळी, २. नवसाहित्य आणि महानगरीय साहित्य, ३. द आदिवासी, ग्रामीण साहित्य प्रवाह, ४. स्त्रीवादी आणि इतर साहित्यप्रवाह या कलाकृती अभ्यासक्रमा नियुक्त केलेल्या आहेत. प्रस्तुत स्वयंअध्ययन साहित्यामध्ये अभ्यासक्रमासाठी नियुक्त कलाकृ घटकनिहाय लेखन केलेले आहे. प्रत्येक घटकाचे लेखन अभ्यासपूर्ण रीतीने व आकलनसुलभ केलेले आहे. घटकाच्या प्रारंभी उद्दिष्ट्ये नमूद केलेली असून उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी प्र घटकलेखनातील विषय विवेचन व मूल्यमापन आपणास दिशादर्शक आहे. अभ्यासक्रमासाठी नि केलेल्या पुस्तकांचा आशय व्यापक असून त्यांचा सूत्रबद्ध आढावा घेण्याचा प्रयत्न घटकलेखन केलेला आहे.

या घटकांच्या अध्ययनाबरोबरच आपण अभ्यासक्रमासाठी नियुक्त कलाकृती व अनुष संदर्भग्रंथ वाचावेत. त्यामुळे आपल्या भाषिक व वाङ्मयीन कक्षा व्यापक होतील. मराठी विष पदव्युत्तर पदवी संपादन करताना आपण भाषिक कौशल्यांबरोबरच मराठी वाङ्मयातील वि प्रवाहांचे व साहित्यकृतींचे सूक्ष्म अध्ययन करावे व आपली एक विवेचक समीक्षादृष्टी तयार क या उद्देशाने प्रस्तुत अभ्यासपत्रिकेचा अभ्यास आपण करावा, अशी आमची अपेक्षा आहे.

■ संपादक ■

**डॉ. सुरेश बाळकृष्ण शिंदे**

बाबासाहेब चितळे महाविद्यालय, भिलवडी,

ता. पलूस, जि. सांगली

N.S.(B) COLLEGE PHALTAN

## अभ्यासमंडळ : मराठी

अध्यक्ष : **डॉ. दत्तात्रय मल्लू पाटील**
डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

- **प्रा. डॉ. राजन गवस**
  मराठी विभागप्रमुख,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. रणधीर शिंदे**
  मराठी विभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. शिवलिंग मेनकुदळे**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा

- **डॉ. शहाजी जगन्नाथ पाटील**
  पद्मभूषण वसंतरावदादा पाटील कॉलेज, तासगाव,
  जि. सांगली

- **डॉ. सुभाष गणपती जाधव**
  दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज,
  इचलकरंजी, जि. कोल्हापूर

- **डॉ. प्रभाकर पवार**
  मुधोजी कॉलेज, फलटण, जि. सातारा

- **प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण**
  श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर

- **डॉ. अरुण कृष्णा शिंदे**
  नाईट कॉलेज ऑफ आर्ट्स ॲण्ड कॉमर्स, कोल

- **डॉ. उदय रामचंद्र जाधव**
  शहाजीराजे महाविद्यालय, खटाव, जि. सातारा

- **प्रा. डॉ. दासू वैद्य**
  मराठी विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मरा
  विद्यापीठ, औरंगाबाद

- **डॉ. नंदकुमार विष्णू मोरे**
  मराठी विभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. गोपाळ ओमाण्णा गावडे**
  महावीर महाविद्यालय, कोल्हापूर

- **श्री. के. एस. अटकरे**
  कैलास पब्लिकेशन, औरंगपूरा, औरंगाबाद

N.S.(B) COLLEGE PHALTAN



# अनुक्रमणिका

सत्र पहिले : अभ्यासपत्रिका क्रमांक ३
आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास (स्वातंत्र्यपूर्व काळ)

घटक १ वाङ्मयेतिहासाची संकल्पना १

घटक २ भाषांतरित वाङ्मय २१

घटक ३ पत्रकारिता ५८

घटक ४ कथात्म साहित्य ८५

सत्र पहिले : अभ्यासपत्रिका क्रमांक ३
आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास (स्वातंत्र्योत्तर काळ २००० पर्यंत)

घटक १ १९५०–२००० सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय पार्श्वभूमी स्वातंत्र्योत्तर काळ, सामाजिक राजकीय परिवर्तन, नवविचार प्रवाह, वाङ्मयीन चळवळी ११९

घटक २ नवसाहित्य आणि महानगरीय साहित्य १४३

घटक ३ दलित आदिवासी ग्रामीण साहित्य प्रवाह १७४

घटक ४ स्त्रीवादी आणि इतर साहित्यप्रवाह २२४

N.S. (B) COLLEGE PHALTAN

## विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे?

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे?

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे?

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१७-१८ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

N.S.(B) COLLEGE PHALTAN

## सत्र १ : घटक १

# वाङ्मयेतिहासाची संकल्पना

**(साहित्याच्या निर्मितीचे सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय संदर्भ)**

## १.१ उद्दिष्टे

विद्यार्थी मित्रांनो, 'वाङ्मयेतिहासाची संकल्पना' या घटकाचे अध्ययन केल्यानंतर आपल्याला

- वाङ्मयेतिहास लेखकांचा इतिहास लेखनामागील दृष्टीकोन समजेल.
- वाङ्मयेतिहास लेखनाला साहाय्यभूत ठरणाऱ्या घटितांची ओळख होईल.
- वाङ्मयेतिहास लेखनाच्या पूर्व परंपरांचा परिचय होईल.
- वाङ्मयेतिहास लेखनाची आवश्यकता समजून घेता येईल.
- वाङ्मयेतिहास लेखनाच्या प्रचलीत पद्धती समजतील.
- वाङ्मयेतिहास लेखनाची उद्दिष्टे लक्षात येतील.

## १.२ प्रास्ताविक

मानवाच्या संदर्भात विशिष्ट काल आणि अवकाशात घडणारी मानवी व नैसर्गिक घ म्हणजेच इतिहास. वाङ्मयाच्या इतिहासात समाज, संस्कृती, धर्मकल्पना, तत्त्वज्ञान, आर्थि राजकीय, नैसर्गिक पर्यावरण, वर्णवर्ग, वाङ्मयीन व कला परंपरा इ. संदर्भ येतात. वाङ्मयेतिह लेखकाची जीवनदृष्टी, भूमिका, तत्त्वज्ञान या गोष्टी महत्त्वाच्या असतात. मराठी वाङ्मयेतिह लेखनात आवश्यक घटिते आणि वाङ्मयेतिहासाची पूर्वपरंपरा, समग्रलक्ष्यी वाङ्मयेतिहासा पुनर्मांडणीसाठी उपयुक्त ठरतात.

## १.३ विषय विवेचन

ललित साहित्याचा समावेश वाङ्मय या संज्ञेत केला जातो. ललित साहित्य ही कोणत्य स्वरूपाची शुद्ध भौतिक घटना असत नाही. ती अतिशय गुंतागुंतीची गोष्ट असते. ती वास्तवाच व्यवहाराच्या स्वरूपात आढळत नाही. प्रतिभासिक, व्यक्तिनिष्ठ आणि व्याजवास्तव असे ि स्वरूप असून तीमध्ये मनोतीत व प्रतिमापूरित अशा घटकांचा अंतर्भाव असतो. ती प्रतिमात्म प्रतिकात्मक घटना असल्याने प्रकट-अप्रकट, ज्ञात-अज्ञात याचा समावेश असतो. वाङ्मया इतिहासातून संस्कृती संघर्ष व संस्कृती समन्वयाचे प्रतिबिंब पडत असते. निर्मिती काला

N.S.(B) COLLEGE PHALTAN

सामाजिक, राजकीय, धार्मिक स्थितीशी समाजाच्या वाङ्‌मयीन, सांस्कृतिक परंपरांशी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष संबंध असतो.

### १.३.१ वाङ्‌मयेतिहासाची संकल्पना

#### १.३.१.१ इतिहास :

मानव आणि मानवेत्तर सजीवसृष्टी या सर्वांना इतिहास असतो. पण मानवेत्तर सृष्टीचा इतिह हा जैविक स्वरूपाचा आहे. त्याचा आविष्कार हा जगण्याचा एक भाग आहे आणि तो कित्ये शतकापासूनचा तसाच राहिला आहे. पशुपक्षी हजारो वर्षांपासून जशी जगत आहेत तशीच ज राहिली आहेत. मात्र मानव हा सतत प्रगती करीत आला आहे. त्याने विचाराने स्वयं निर्णय परिवर्तन करून आपली स्वतःची जीवनशैली तयार केली आहे. 'सृष्टीचा एक नैसर्गिक घटक ब राहण्यापेक्षा सृष्टीलाच स्वतःसाठी वाकवत, प्रसंगी काबूत आणून जीवन जगणे माणसाने पसंद के यातून माणसाचा इतिहास घडत गेला. याच्या आधारे इतिहास म्हणजे माणसाच्या विं मानवसमूहांच्या आविष्कारांमध्ये होत गेलेल्या स्थित्यंतरांचा आलेख असे एक सूत्र इतिहासाबा सांगता येते. (वाङ्‌मयेतिहासाची संकल्पना, पृ. २२)

मानवी समूह एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे आपले ज्ञान, अनुभव, विचार, भावना, आ धर्म यांचे संचित देतो त्यातून परंपरा निर्माण होतात. परंपराच्या संघटनातून संस्कृतीचा जन्म होतो. माणसाकडे असणाऱ्या स्मृतीमुळेच शक्य असते. आठवण करणे, मनन चिंतन करणे या माणसा असणाऱ्या शक्तीमुळे वर्तमानकालीन घटनेचा भूतकालीन घटनेशी सहसंबंध जोडणे, भूतकाल घटनेचा शोध घ्रेणे हे आविष्कार आणि स्मृती या दोन शक्ती माणसाकडे आहेत म्हणून मानवा इतिहास आहे.

इतिहास कधीही स्थिर नसतो. माणसाच्या गरजानुसार नवे घडताना जे मागे पडते तो इतिह असतो. त्यामधील त्रुटी, दोष, फोलपणा प्रत्येक काळातील इतिहास संकल्पना दाखवि भौतिकशास्त्राची पद्धती घटनांचे निरीक्षण करणे आणि त्यातून आगमनात्मक किंवा विगमनात्म पद्धतीने नियम शोधून काढणे ही पद्धती इतिहास या सामाजिक शास्त्रात वापरली गेली. या 'इतिहास म्हणजे भूतकालीन घटनांचा संशोध' ही संकल्पना पुढे आली. इति+ह+आस म्हणजे अ घडले ही व्याख्या सदोष, अपुरी असली तरी या संकल्पनेमुळेच इतिहासाची नीतिशास्त्रा कचाट्यातून सुटका झाली आहे. तरीसुद्धा 'इतिहास म्हणजे भूतकालीन घटनाचा संशोध ही संकल्प आणि इतिहास या शब्दाची फोड 'असे घडले' हे ज्या ज्ञानाच्या आधारावर इतिहासकार ठरवितो त्याची वर्तमानकालीन वास्तवाने निर्माण झालेली दृष्टी. भूतकालीन घटनांचा समकालीन वास्तवा दृष्टीने हेतूपूर्ण अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न करते याच अर्थाने क्रोचे यांनी इतिहास हा समकाल असतो असे म्हटले आहे.

N.S.(B) COLLEGE PHALTAN

इतिहासाच्या संकल्पनेत भूतकालीन घटनांची नोंद, भूतकालीन घटनांची निवड, भूतकाल घटनांची मांडणी, भूतकालीन घटनांच्या परस्पर संबंधाची साखळी, भूतकालीन घटनांचा इत्य भूतकालीन घटनांची कारणमीमांसा, भूतकालीन घटनांचा वर्तमानाशी असणारा अन्वयार्थ असे त मागे पडले आहेत.

क्रौचे व रान्बे या इतिहास तत्त्वचिंतकाच्या इतिहासाविषयीच्या अभिप्रायातून इतिहास आ भूतकालीन घटना या वेगवेगळ्या ठरतात. भूतकालातील एखादी घटना इतिहासाच्या संद महत्त्वाची ठरवण्याची दृष्टी इतिहासकाराच्या वर्तमान अनुभवावर आधारलेली असते. थोडक्‍ इतिहासाच्या संकल्पनेत भूतकालीन घटना आणि समकालीन वास्तवातून निर्माण झालेली दृष्टी घटक आधारभूत असतात.

**१.३.१.२ वाङ्मयेतिहास**

इलाटियन तत्त्ववेता व्हिको याने इ.स. अठराव्या शतकाच्या पूर्वार्धात अद्‌भुतांच्या, दैवीलीले किंवा अवतार कल्पनेच्या पातळीवर वावरणाऱ्या इतिहास कल्पनेला उपक्रमाच्या पातळी आणण्याचा पहिला प्रयत्न केला. समाजाने निर्माण केलेली शासनसंस्था, भाषा, सामाजिक चालीरी धर्म, कायदा हे सर्व मिळून इतिहास होतो. 'इतिहास म्हणजे मानवाने निर्माण केलेल्या स सामाजिक संस्थांचा इतिहास असे व्हिकोचे म्हणणे आहे. इतिहास आणि समाज यांचे नाते स्प करणारा व्हिको हा पहिला तत्त्ववेत्ता. त्यांच्या प्रतिपादनामुळे इतिहासाचे सामाजिक जीवना असलेले नाते स्पष्ट होते. साहित्याच्या इतिहासावर त्यांच्या विचाराचा प्रभाव पडला. साहित्यात त्याचा प्रवक्ता फ्रेंच तत्त्वज्ञ तेन हा ठरला. त्याने इंग्रजी साहित्याचा इतिहास १८६४ मध्ये लिहि त्यामध्ये Race, Milieu आणि Moment यांनी कोणताही इतिहास नियत झालेला असतो हे स्प केले आहे.

तेन, कझामिआ, कूर्थोप, क्रेन इ. च्या वाङ्मयेतिहासाच्या संकल्पनाव्यूहाची केवळ आय करून घेऊन आपल्याला वाङ्मयेतिहासाच्या रचनेला उपकारक ठरेल असा संकल्पनाव्यूह निम करावा लागेल.. वाङ्मयेतिहास लेखनामागे जागरूकता असावी. मराठी वाङ्मयाचा व्यापक इतिह लिहिला जावा या दृष्टीने वाङ्मयेतिहासाच्या संकल्पनेची चर्चा मराठीत झालेली दिसते. ''११ व १२ व्या शतकात ज्ञानेश्वरांपासून ते रामदासांपर्यंत हिंदू राज्य आणि समाजव्यस्थेचे 'मॉडेल' लोकां सतत ठेवण्याच्या उद्देशाने एक परंपरा निर्माण झालेली दिसते. या परंपरेत ज्ञानेश्वरी, गीतार्ण गीतार्थबोध, ग्रंथराज-भागवत, दासबोध हे एकत्र आणता येतील. या परंपरेबरोबरच दु एकेश्वरवादी, विठ्ठलदैवताला केंद्रस्थानी ठेवून मोठ्या चौकटीला पूरक ठरेल अशाच प्रकारची परं पाहणे (वाङ्मयेतिहासाची संकल्पना, पृ. ८८) ही प्रा. सीताराम रायकर यांनी हिंदू या समाजव्यवस् मॉडेल म्हणून रचना करणाऱ्या ग्रंथाची यादी दिली आहे. भारतीयाच्या इतिहास विषयक संकल् पाश्चात्यापेक्षा वेगळ्या आहेत. शास्त्रग्रंथ, पुराणग्रंथ, स्थळ माहात्म्य, जातीपुराणे अशा ग्रंथामध्ये

N.S.(B) COLLEGE PHALTAN

मानववंशशास्त्रज्ञ व भारतविद्याशास्त्रज्ञ लुइ ड्युमॉ यांनी म्हटले आहे. न्या. महादेव गोविंद रानडे य संतवाङ्मयाची मीमांसा ('द राइज ऑफ द मराठा पॉवर') या ग्रंथामध्ये संतमंडळाच्या कार्या मराठी राज्याच्या उभारणीला हातभार लावल्याचे विवेचन केले आहे. राजवाडे यांनी रामदास केलेले मूल्यमापनही याच स्वरूपाचे आहे. कै. परशुरामतात्या गोडबोले यांच्या नवनीत संकल्पनामध्ये आणि वि. ल. भावे यांच्या 'महाराष्ट्र सारस्वत' या ग्रंथामध्ये दासोपंत, एकनाथ यां संदर्भातले मतप्रदर्शन आले आहे. पांगारकरांनी लिहिलेल्या वाङ्मयेतिहासावर आर्यपू (Aryolatora) जीवनदर्शनाचा पगडा आहे. अ. ना. देशपांडे यांनी लिहिलेल्या प्राचीन मर वाङ्मयाच्या इतिहासावर लेखकाला हिंदू आध्यात्मिकता आणि संन्यस्तवृत्ती यांच्याबद्दल वाटणा आंधळ्या अभिमानाचे दर्शन घडते.

१९२० नंतरच्या कालखंडात सरवटे, मानेपाटील, चिं. वि. जोशी, वि. पां. नेने यांनी संपा केलेला साहित्येतिहास हे आढावा घेणारे वर्णनात्मक ग्रंथ आहेत. महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे त करण्यात आलेले खंड आणि शं. बा. जोशी यांचे मऱ्हाटी संस्कृती, डॉ. रा. चि. ढेरे यां संतसाहित्य, लोकसाहित्य, श्री. विठ्ठल : एक महासमन्वय, लज्जागौरी, चक्रपाणी इ. ग्रंथ, द. गोडसे यांची पोत, लोकधारी, शक्तिसौष्ठव इ. ग्रंथ सामाजिक, सांस्कृतिक इतिहासाच्या बाबत महत्त्वाचे आहेत.

मराठी वाङ्मयेतिहासविषयक तत्वचर्चा सुरू करण्याचे श्रेय महाराष्ट्र साहित्य परिषदेकडे ज १९४६-४७ मध्ये वाङ्मयेतिहास योजनेविषयी विचार सुरू झाला. वाङ्मयेतिहासाच्या संकल्पनेच नव्याने ऊहापोह करण्यासाठी प्रा. गो. म. कुलकर्णी, डॉ. व दि. कुलकर्णी आणि द. दि. पुडे, य महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या अमृतमहोत्सवाचे निमित्त साधून पहिले चर्चासत्र दि. ६ व ७ नोव्हे १९८१ या दोन दिवशी 'वाङ्मयेतिहासाची संकल्पना' या विषयावर घेतले होते. त्यात व्यक्त झाले सैद्धान्तिक विचारांचा पाठपुरावा करण्यासाठी दुसरे चर्चासत्र दि. १ मे ते ३ मे १९८२ या तीन दिव आधुनिक मराठी वाङ्मयाच्या इतिहासाची मांडणी या विषयावर घेतले. या दोन्ही चर्चासत्रात विचारमंथनाचे संकल्पन व्हावे म्हणून अनेकांनी सूचविल्यामुळे वाङ्मयेतिहासाची संकल्पना हा ग्रंथ दि. पुडे यांनी तयार केला.

■ **वाङ्मयेतिहासाच्या पारंपरिक विचारधारा**

आपल्याकडे वाङ्मयेतिहासाच्या संदर्भात रूढ संकल्पव्यूह आहेत.

१. वाङ्मयेतिहास हा कालखंडानुसार लिहिला जावा.

यामध्ये कालखंड निश्चिती, कालखंडप्रारंभ आणि शेवट ठरविणे त्यासाठी काही घ सोयीनुसार निश्चित करून घेणे.

२. लेखकानुसार इतिहास लिहिण्याची पद्धती आहे.

N.S.(B) COLLEGE
PHALTAN

३. विचारधारा, तत्त्वज्ञान, संप्रदाय यानुसार इतिहास लिहिण्याची पद्धती आहे.

यामध्ये विचार, तत्त्व यानुसार मांडणी केली जाते. अर्वाचीन व मध्ययुगीन कालखंडा वाङ्मयेतिहास पथ, संप्रदाय, तत्त्वज्ञान यानुसार मांडणी केलेला आहे.

याशिवाय हस्तलिखिते, शिलालेख, ताम्रपट, पोथीपुराण, स्थान महात्म्य यांचा विचार करत अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत.

## ■ वाङ्मयेतिहास लेखनाची उद्दिष्ट्ये

वाङ्मयेतिहासाचा लेखक व वाचक बहुश्रुत असावा. तो जिज्ञासू, चिंतनशील, चिकित्सकवृत्ती असावा. तसेच अनाग्रही, प्रांजळ आणि कल्पक व कलावंतवृत्ती त्याच्याकडे असावी. त पुनर्रचना-पुनर्निर्मितिप्रवण असणे विशेष महत्त्वाचे असते.

साहित्येतिहासात साहित्यांतर्गत घटक परस्परांना प्रेरणा देणारे पूरक असतात. इतिहास पुनर्निर्मिती, भावी नवनिर्मितीही असते. इतिहासलेखक घटितांची पुनःपुन्हा तपासणी करतो, मांड करतो संयोजन करतो. त्यामधील दृष्टिकोण आणि चैतन्यतत्त्वाचा आविष्कार यामुळे नवा अनु घेतो. गो. म. कुलकर्णी लिहितात, 'साहित्येतिहासामुळे संवेदनशील वाचक, चिंतनशील समीक्ष आणि सर्जनशील कलावंत यांच्या सौंदर्यभावनेचे भरणपोषण आणि संतर्पण प्रेरकपणे होत राह किंबहुना हेच इतिहासलेखनाचे अंतिम उद्दिष्ट म्हणता येईल. (वाङ्मयेतिहासाची संकल्पना पृ-३ साहित्येतिहासात कोणत्या घटकांना प्राधान्य द्यावे. साहित्यनिर्मितीला कोणते घटक जबाबदार असत असे अनेक प्रश्न आहेत पण साहित्येतिहास आनंद देतो तो ज्ञानाचा आणि कलेचा. त्यामुळे ज्ञाना आणि कलानंद याची युती साधणारा साहित्येतिहास निर्माण झाला पाहिजे.

## ■ व्याख्या

१. वसंत आबाजी डहाके : एक संस्कृती असलेल्या, एकभाषा असलेल्या भूप्रदेशातील लोकांन साहित्याचा इतिहास म्हणजे मराठी वाङ्मयाचा इतिहास. (मराठी साहित्य इतिहास अ संस्कृती पृ. २४१)

२. वाङ्मयेतिहास म्हणजे केवळ वाङ्मयांतर्गत घटकांच्या परस्पर संबंधाचा अभ्या वाङ्मयेतिहासाची संकल्पना म्हणजे उघडच इतिहास आणि टीका यांचे एकत्रीकरण आहे अ क्रेन याची संकल्पना आहे- (वाङ्मयेतिहासाची संकल्पना पृ. ७२)

३. सामान्यतः वाङ्मयेतिहास म्हटले की, त्यात सर्वच प्रकारच्या वाङ्मयाचे (ललित अ अललित) एकत्रीकरण करण्याची मराठी साहित्येतिहासकारांची प्रथा आहे. (वाङ्मयेतिहासा संकल्पना)

४. प्रा. गंगाधर पाटील : साहित्यकृती व वाचक यांच्यामधील परस्पर संबंधाचा इतिहास म्हण साहित्येतिहास होय. (समीक्षामीमांसा पृ. १७१)

N.S.(B) COLLEGE PHALTAN

### १.३.१.३ साहित्याच्या निर्मितीचे संदर्भ

वाङ्मय हे सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय स्थित्यंतरातून निर्माण होते. मराठी वाङ्मया संकल्पना समजून घेताना सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय संदर्भ लक्षात घ्यावे लागत १८१८ साली पेशवाईचा शेवट होऊन ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीची सुरुवात झाली. त्यां राजवटीच्या प्रभावाने मानवी जीवनाचा सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय दृष्टिकोन बदलला. इंग्र ज्ञान घेण्याची गरज भासू लागली. लोकहितवादीनी ज्ञान संपादनासाठी इंग्रजी विद्येचा आग्रह धरर चिपळूणकरांना पूर्वीचे भ्रम गळून पडल्याची जाणीव झाली. महात्मा फुले शूद्राची भटशाहीतून सुट झाल्याचे नमूद करतात.

समाजातील अनिष्ट प्रथेविरोधी जांभेकर, भाऊ महाजन, लोकहितवादी यांनी लेखन के गोविंद बाबाजी जोशी यांनी बालविवाहाला विरोध केला. आंतरजातीय विवाहाचा पुरस्कार केर विष्णुशास्त्री पंडित हेही विधवा पुनर्विवाहाचे पुरस्कर्ते आहेत. लोकहितवादी, न्या. तेलंग, न्या. रा यांनी मुंबईत १८६५ साली विधवा विवाहोत्तेजक मंडळ स्थापन केले. विधवा पुनर्विवाहाचा पुरस्क करणाऱ्या भूमिकेतून गंगाधरशास्त्री फडके यांनी पुस्तक लिहिले. 'इंद्रप्रकाश'मधून विधवा विवाह मांडणी केली. बाळशास्त्री जांभेकरांनी पुनर्विवाहासंबंधी लेखन केले. विधवांच्या पुनर्विवाहा विचाराचे चळवळीत रूपांतर झाले. १९५६ मध्ये पुनर्विवाहाचा कायदा झाला. १८५७ मध्ये ब पद्मनजी यांनी यमुना पर्यटन मध्ये विधवांच्या स्थितीचे वर्णन केले आहे. म. फुलेंनी सामाजि कार्यातून लेखन करून योगदान दिले. मोरोबा कान्होबा, विजयकर, ताराबाई शिंदे, पंडिता रमा यांचे स्त्रियांच्या स्थितीविषयीचे ग्रंथ प्रकाशित झाले आहेत.

१९२० नंतर राजकारणात महाराष्ट्राची पीछेहाट झाली. तशी बाळशास्त्री जांभेकर-दादे पांडुरंग लोकहितवादी यांचे विचार जागृतीचे एक पर्व संपले. रानडे, गोखले आणि टिळक नेत्यांच्या निधनानंतर महाराष्ट्राच्या काँग्रेस पक्षात फेरबदल झाले. टिळकांच्या काही अनुयायं गांधींचे नेतृत्व स्वीकारले. त्याचवेळी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व डॉ. बाबासाहेब आंबेडकर नव्या नेतृत्वाची सुरुवात झाली होती.

**सामाजिक :**

साहित्याची निर्मिती ही व्यक्तीच्या माध्यमातून होते. व्यक्ती हा समाजाचा घटक अस अर्थातच सामाजिक घटना या साहित्य निर्मितीचे संदर्भ ठरत असतात. समाजात घडणाऱ्या घट समाजातील वेगवेगळे विचारप्रवाह, चळवळी, उलथापालथ, वैचारिक मंथन त्यातून निर्माण हो किंवा सुटणारे प्रश्न हे संदर्भ म्हणून विचारात घ्यावे लागतात.

N.S. (B) COLLEGE PHALTAN

स्वातंत्र्यपूर्व काळात टिळकांचा राष्ट्रवाद, गांधीवाद, मार्क्सवाद, रानडे आगरकरा सुधारणावाद, या विचारप्रणाली, रसेल, फाईड यांची विवाहविषयक, कामवासनाविषयक विचारसरा पहिल्या महायुद्धामध्ये समाज जीवनात झालेला बदल, नव्या आणि जुन्या पिढीतील संघ व्यक्तिस्वातंत्र्याची जाणीव, महर्षी वि. रा. शिंदे, र. धो. कर्वे, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे व आणि चळवळ, सत्यशोधक चळवळ, ब्राह्मणेतर चळवळ या घटना साहित्य निर्मितीचे संदर्भ ठरतात

१९१३ साली दीनमित्रकार मुकुंदराव गणपत पाटील यांनी कुलकर्णी लीलामृत हे काव्य लिहि हे गुलामगिरीचेच पुढचे रूप असून ब्राह्मणेत्तराची चळवळ पुन्हा नव्याने सक्रीय होत असल्या जाणीव करून देणारे आहे. १९२४ साली मुकुंदराव पाटलांनी 'शेटजी प्रताप' हा काव्य ग्रंथ लिहि त्यामध्ये शेतकऱ्यांचे शोषण मारवाडी, गुजर, सावकार कसे करतात याचे चित्रण केले आहे.

आंतरजातीय विवाह, विवाह न करता पतीपत्नी म्हणून राहणे, अविवाहीत असताना मातृत्वा हक्क, याबरोबर विवाहसंस्था, स्त्री पुरुषाचे वैवाहक जीवन, स्त्रियांच्या समस्या, स्त्रियांचे हक्क, स्वातंत्र्य या विषयावर अनेक समाजसुधारकांनी प्रबोधन, चळवळी केल्या. हेच विषय लेखक साहित्याच्या विविध प्रकारातून हाताळले. पुरूषोत्तम यशवंत देशपांडे यांची बंधनाच्या पलीव (१९२७) ही अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा प्रश्न मांडणारी कादंबरी. वेश्येबरोबर एखाद्या पुरूषाने राहणे समाजाला मान्य करतो. पण तिच्याशी विवाह केला की समाजाचा विरोध होतो हे दाखविणारी अ केतकरांची 'ब्राह्मणकन्या' (१९३०) ही कादंबरी. स्त्री पुरूषानी पती-पत्नी म्हणून राहणे तेही लग्न करता हे चांगले कसे आहे ते मांडण्याचा प्रयत्न करते. 'गोंडवनातील प्रियवंदा' (१९२६) कादंबरीत अपत्य जन्माला घालणे किंवा न घालणे हे सर्वस्वी स्त्रीच्या इच्छेवर असावे. हे स्वात तिला आहे ही सांगणारी ही कादंबरी आहे. वा. म. जोशी यांच्या 'रागिणी' (१९१५), आत्महा (१९१६), नलिनी (१९१९), सुशीलेचा देव (१९३०) इंदू काळे व सरला भोळे (१९३५) कादंबऱ्या.

भा. वि. वरेरकर, श्री. व्यं. केतकर, ना. ह. आपटे, वि. स. खांडेकर, ग. त्र्यं. माडखोलव पु. य. देशपांडे, गीता साने, प्रेमा कंटक, कुमुदिनी प्रभावळकर, मालती दांडेकर, शांता नाशिकव विभावरी शिरूरकर यांनी केलेले लेखन स्त्री केंद्री आणि स्त्रियांचे प्रश्न मांडणारे अ समाजसुधारकाच्या चळवळी आणि प्रबोधन यातील विचारधारेतच सामान्यता या लेखनाचे सं मिळतात.

महात्मा फुले, गोपाळबुवा वलंगकर, शिवराम जानबा कांबळे, शाहू महाराज, महर्षी वि. शिंदे, किसन फागू बंदसोडे, गणेश आकाजी गवई इत्यादींनी दलितांच्या मुक्तीसाठी लेखन व व केले. महर्षी शिंदे यांनी सतरा वर्षे अस्पृश्यतानिवारणाचे कार्य केले. कलकत्ता येथे त्यांच्या पुढाका

N.S.(B) COLLEGE PHALTAN *

अस्पृश्यता निवारणाचा ठराव संमत झाला. अस्पृश्यतेच्या प्रश्नासंबंधी संशोधन करणारे भारतातं पहिले संशोधक म्हणून शिंदेचा उल्लेख वसंत आबाजी डहाके यांनी मराठी साहित्य इतिहास अ संस्कृती या ग्रंथात केला आहे. 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न (१९३३) शिंदे यांच्या ग्रंथा अस्पृश्यतेच्या उच्चाटनाच्या दृष्टीने विशेष महत्त्व असल्याचे दिसून येते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या मूकनायक (१९२०), बहिष्कृत भारत (१९२७), ज (१९३०) यामधील लेखनाने दलितामध्ये आत्मभान आले, विद्रोहाची जाणीव निर्माण झाली. मह येथील धर्मसंगर (१९२७) व धर्मांतर (१९५६) या घटना आत्मभान देणाऱ्या आहेत. आंबेडकर धर्मांतराविषयीची भूमिका मुक्ती सोन पथे (१९३६) या निबंधात मांडली आहे. समता, स्वातंत्र्य भान देणारे लेखन आणि क्रांतिकारी चळवळीतून अनेक ग्रंथाची निर्मिती झालेली दिसून येते.

**सांस्कृतिक :**

१९०० सालापर्यंत बखरी, विवेकसिंधू, ज्ञानेश्वरी, तुकारामाचे अभंग, एकनाथी भागव मुक्तेश्वराचे महाभारत, महिपती, वामन, रघुनाथ पंडित, श्रीधर इत्यादी देशी भाषेतील ग्रंथ उपल होते. आधुनिक लेखक कवी-निबंधकार संशोधकांच्या काही कलाकृती १९२० पर्यंत प्रकाि झाल्या. एम. ए. मराठीच्या परीक्षेसाठी भांडारकर, आपटे आणि पटवर्धन यांची फायलॉलॉजिक लेक्चर्स, वि. का. राजवाडेकृत मराठी छंद, राजवाडे यांची ज्ञानेश्वरीची प्रस्तावना, गुणकृत कंपरेटि फायलॉलॉजी, ग्रिअर्सनकृत 'लिंग्वस्टिक सर्व्हे ऑफ इंडिया, दामल्याचे 'शास्त्रीय मराठी व्याकरण पोतदारकृत 'मराठी गद्याचा इंग्रजी अवतार', चिं. वि. वैद्य यांचे निबंध व भाषणे, राजारामशा भागवतकृत 'प्राकृत भाषेची विचिकित्सा, भाऊसाहेबाची बखर, दत्तोपंत आपटेकृत 'इतिहासमंजि रामचंद्रपंत अमात्यकृत 'आज्ञापत्र' कीर्तने यांचे थोरले माधवराव पेशवे हे नाटक अशी परीक्षे नेमलेल्या पुस्तकाची यादी १९२७ च्या श्री सरस्वती मंदिर या मासिकात असल्याचे वसंत आबा डहाके यांनी नमूद केले आहे. या अभ्यासक्रमात इतिहास, भाषाशास्त्र, व्याकरण, समीक्षा, प्राच आणि अर्वाचीन काव्य, अर्वाचीन भाषांतरित आणि स्वतंत्र नाटके होती. चिपळूणकर, आगरकर, ि वि. वैद्य आणि राजवाडे यांच्या समीक्षा दृष्टीतून वाङ्मयकृतीचा अभ्यास होत होता. ज्ञानदेवापा मोरोपंतापर्यंतचे कवी जनमाणसात आणि विद्यापीठीय अभ्यासक्रमात पोहचले होते. यां अभ्यासाला वाङ्मय म्हणून महत्त्व प्राप्त होणे ही सांस्कृतिक घडण साहित्य निर्मितीशी संबंधित अ आहे.

संस्कृती म्हणजे समाजाची जीवनरीती, सामाजिक वारसा, विचार, भावना, श्रद्धा, इतर लोका जुळवून घेण्याचा तंत्र समुदाय, सामाजिक संघटना, धर्म, आर्थिक व्यवहार सामाजिक वारसा, परंप जगण्याच्या संदर्भातील आदर्श मूल्ये याचा समावेश संस्कृतीत होत असतो. टिळक, गांधी, मह

N.S.(B) COLLEGE PHALTAN

शिंदे, डॉ. आंबेडकर, यांचे विचार, आणि कार्य सत्यशोधकीय विचारधारा व इतर चळवळ समाजात घडणाऱ्या घडामोडी या साहित्यनिर्मितीचे सांस्कृतिक संदर्भ आहेत. डॉ. बाबासा आंबेडकरांच्या विचाराच्या प्रभावाने अस्पृश्याद्धार, खरा ब्राह्मण उःशाप, वंदेभारतम ही नाटके निम झालेली आहेत.

**राजकीय :**

साहित्याच्या निर्मितीला सामाजिक, सांस्कृतिक संदर्भ होते. तसेच राजकीय संदर्भही आहेत. व्या शतकात राष्ट्रवाद, गांधीवाद, मार्क्सवाद आणि सुधारणावाद रूजला होता. समग्र परिवर्तनाचे ३ देणारी १९२० नंतरची चळवळ व गांधींची विचारधारा आणि १९२२ नंतरची साम्यवादी विचारस होती. मार्क्सवादाचे आकर्षण नवीन पिढीला वाटत होते. काँग्रेस आणि कम्युनिष्ठांच्या चळवळी मध्यमवर्गीय जीवन अस्थिर झाले होते. १९१७ च्या रशियन राज्यक्रांतीमुळे समाजवादाचा परि झाला होता. गांधींच्या असहकाराच्या चळवळीने प्रभावित झालेले पण अपेक्षा भंग झाल्य अनेकजन साम्यवादी गटात सामील झाले. साम्राज्यवाद, भांडवलशाही, जमीनदारी याविषयी टी करताना जवाहरलाल नेहरू, सुभाषचंद्र बोस ही नेते मंडळी चंद्रशेखर आझाद, भगतसिंग, अशफ उल्ला हे क्रांतिकारक साम्यवादी विचार मांडत. जागतिक मंदीमुळे मार्क्सवाद, समाजवाद विचाराकडे लक्ष वेधले गेले.

१९२० मध्ये एम. एन. रॉय यांच्या पुढाकाराने 'ताश्कंद' येथे कम्युनिष्ट पार्टी ऑफ इंडिया स्थापना झाली. १९२५ मध्ये कानपूर येथे कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडियाची स्थापना झाली. १९ मध्ये वर्कर्स ॲण्ड पीझन्ट्स पार्टी या पक्षाची स्थापना झाली. कम्युनिष्टांचा वाढता प्रभाव लक्ष आल्याने कामगार चळवळ दडपून टाकणे, साम्यवाद्यांना राष्ट्रीय चळवळीपासून विलग करण्य धोरण ब्रिटिश शासनाने ठरविले. काँग्रेसमधील साम्यवादी तत्त्वज्ञानाकडे आकर्षित झालेल्या तरुण १९३४ मध्ये जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस सोशालिस्ट पार्टी स्थापन केली.

१९२१ मध्ये श्रीपाद अमृत डांगे यांचे 'गांधी व्हर्सस लेनिन' हे पुस्तक, विनायक सरवटे य सामाजिक वाद हे पुस्तक प्रकाशित झाले होते. रा. म. जांभेकर यांची 'कम्युनिस्ट जाहिरना (१९३१), मोल मजूरी व भांडवल (१९३८), स. र. सुंठणकर यांचे मार्क्सवाद-नवयुगाचे तत्त्वज्ञान पुस्तके. वा. म. जोशी यांचे सुशीलेचा देव (१९३०), श्री. व्य. केतकर यांचे ब्राह्मणकन्या (१९३० भा. वि. वरेरकर यांचे धावता धोटा (१९३३) या कादंबऱ्यामध्ये मार्क्सवाद-साम्यवादविषयक च आहे. ग. त्र्यं. माडखोलकरांची 'मुक्तात्मा' ही कादंबरी मार्क्सवाद साम्यवादी कादंबरी म्ह ओळखली जाते. माडखोलकरांच्या कांता (१९३९) या कादंबरीत १९३० च्या गांधीवादाची अ मार्क्सवादाची चिकित्सा केलेली आहे. १९३० च्या कायदेभंगाच्या पार्श्वभूमीवर रेखाटलेला कौटुं

N.S.(B) COLLEGE PHALTAN

संघर्ष या कादंबरीत पहावयास मिळतो. ग. प्र. प्रधान यांच्या 'साता उत्तराची कहाणी' (१८८१) कादंबरीत गांधीवाद, आंबेडकरवाद, रॉयवाद, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, साम्यवाद, समाजवाद, अ विचारप्रवाहाचे दर्शन घडते. बांदिवडेकर स्वातंत्र्यपूर्व काळातील विचारप्रभावासंदर्भात लिहित 'मार्क्सवादाने अथवा समाजवादी विचारसरणीने मराठी साहित्याला प्रभावित केले. हे खरे असले हा प्रभाव व्यापक आणि खोल नाही. वा. म. जोशी, गं. त्र्य. माडखोलकर, वरेरकर, खांडेकर, पु. देशपांडे, वि. वा. हडप, गीता साने, प. त्रि. सहस्त्रबुद्धे इ. कादंबरीकारावर साम्यवादी विचार आंतरीक प्रभाव आहे. त्याच्यावरच्या साम्यवादी प्रभाव विचार विलासितापर्यंतच मर्यादित राहि (बांदिवडेकर, १९९८, पृ. २७०). तर वसंत आबाजी डहाके म्हणतात, ''गांधीवादाचा आ मार्क्सवादाचा (आणि १९५० पर्यंत आंबेडकरवादाचाही) मराठी साहित्यावरील प्रत्यक्ष प्रभाव क्षी असला तरी या वादाच्या अनुषंगाने साहित्यातील समाजचित्रणाच्या संदर्भात नवी जाणीव आकार लागली होती यात शंका नाही. (वसंत आबाजी डहाके, २००५, पृ. २०१).

साने गुरूजींच्या काव्यावर गांधींची विचारधारा आणि नेहरूंचा समाजवादी विचार यांचा प्र दिसून येतो. 'माझे रामायण' (१९२७) या दत्तो आप्पाजी तुळजापूरकर यांच्या कादंबरीत गांधीं शांततामय सत्याग्रहाच्या घोषणेचा जनमाणसावर पडलेल्या प्रभावाचे वर्णन येते.

साहित्याची निर्मिती ही सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय संदर्भाशी आहे. हे संदर्भ मा जीवनव्यवहाराशी संबंधित आहेत आणि माणूस हा समाज, संस्कृती आणि राजकारण यांच्य जोडलेला असून साहित्यनिर्मिती करणारा महत्त्वाचा घटक आहे. तो साहित्यनिर्मितीसाठी आवश् घटितांशी संबंधित असतो.

### १.३.१.४ वाङ्मयेतिहासाचे स्वरूप

वाङ्मय ही एक कला आहे. तिचा जन्म समाजात होतो. व्यक्ती ही वाङ्मयनिर्मितीची श असते. म्हणजे तिचे पोषण रसिकवर्गाकडून होते. रसिकवर्ग ही समाजाचाच घटक असतो. त्या अ कलेचा इतिहास हा समाजाच्या इतिहासाचा भाग असतो. तरीही सामाजिक शास्त्राच्या इतिहासा स्वरूपापेक्षा, भौतिकशास्त्राच्या इतिहासाच्या स्वरूपापेक्षा वाङ्मयाच्या इतिहासाचे स्वरूप भि असते. ते कलेतील स्वायतत्तेमुळे. सामाजिक शास्त्राच्या रचनेत अनपेक्षितता मानव, समाज अ वर्तनसंकेत यांच्या संदर्भात आलेली असते. गणन, वर्गीकरण, अवलोकन आणि अनुमान सामाजिक इतिहासाची पद्धती वाङ्मयाच्या संदर्भात लागू पडत नाही.

वाङ्मयेतिहासाचे स्वरूप हे आंतरिक व्यावहारिक गरजावर अवलंबून असते. स्वकालीन ज्ञ सामाजिक-राजकीय-आर्थिक-सांस्कृतिक परिस्थिती स्वकालीन उपलब्ध ज्ञान इतकीच मर्या असते. वाङ्मयाबाबतच्या गरजाच वाङ्मयाकडे पाहण्याची दृष्टी नियंत्रित करत असतात.

N.S.(B) COLLEGE PHALTAN

विचारव्यूह बदलतात, ज्ञानात भर पडते. पूर्वीची तथ्येही या प्रक्रियेमुळे व्यस्त होतात. आपली ज बदलतात. यामुळे नव्याने वाङ्मयेतिहास लिहिला जातो. हा इतिहास ही अंतिम ठरत नाही. नव सत्य समोर येत असतात.


वाङ्मयेतिहासकाराने स्वतःच्या पूर्वनिश्चित दृष्टिकोनाधारे वाङ्मयेतिहासाची रचना क संयुक्तिक ठरेल. त्याच्या दृष्टिकोनाचे केंद्र वाङ्मयाचे वाङ्मयपण हेच असायला हवे. त्‍ वाङ्मयेत्तर दृष्टिकोनही स्वीकारायला हवा. पण वाङ्मयीन दृष्टिकोणाला धक्का न पोहोच वाङ्मयाच्या स्थितीगतीचे आलेखन व्हायला हवे. सामाजिक दृष्टिकोन स्वीकारल्‍ वाङ्मयेतिहासाचे रूप समाजेतिहासाचे होऊ नये ही खबरदारी वाङ्मयेतिहासकाराची आहे. व्यक्ती समाजातील अनेक परंपरा, क्रिया–आंतरक्रिया, संस्कार यांचा परिणाम सतत होत राहतो. वाङ्मया समाजजीवन आविष्कृत होते. त्यामुळे वाङ्मयेतिहासकार शुद्ध वाङ्मयीन दृष्टीचा असत ना वाङ्मयाकडूनही आपल्या काही अपेक्षा असतात. त्या केंद्रस्थानी ठेवून काही तत्त्वे, निकष अ संकल्पनाच्या आधारे एक वाङ्मयेतिहासकाराचा दृष्टिकोन बनवून वाङ्मयेतिहास लिहिला पा‍ अशी अपेक्षा डॉ. दत्तात्रेय पुडे यांनी व्यक्त केली आहे.

मराठी वाङ्मयाच्या भूप्रदेशाचा विचार मराठी वाङ्मयाच्या केला पाहिजे असा डॉ. मा. देशमुख यांनी म. सा. पत्रिकेच्या जुलै-सप्टें. १९५४ च्या अंकात विचार मांडला अ महाराष्ट्राबाहेरही अनेक ठिकाणी मराठी वाङ्मय निर्मिती होत आहे. ती वाङ्मयाच्या मुख्य धारेपा दुर्लक्षित राहते. वाङ्मयेतिहास लिहित असताना महाराष्ट्रातील वाङ्मयाचा इतिहास मुख्यतः पश्‍ि महाराष्ट्रातील पुण्यामुंबईकडील वाङ्मयाला केंद्रस्थानी ठेवून लिहिला जातो. ही स्थिती बद‍ वाङ्मयेतिहासकाराने महाराष्ट्रातील वाङ्मयाचा नव्हे तर मराठी वाङ्मयाचा इतिहास लिहावा. के‍ मुख्य धारेवर लक्ष केंद्रीत करता वाङ्मयातील सर्व धारांचे समावेश करण्यात यावा.

■ **साहित्यातील एखाद्या दुसऱ्या पैलूला प्राधान्य**

व्यापक अशा वाङ्मयाच्या पसाऱ्यातून एखाद्या दुसऱ्या पैलूला प्राधान्य देऊन कोणत्य साहित्याचा इतिहास लिहिता येतो. पण तो संपूर्ण साहित्याचा इतिहास ठरत नाही.

उदा. मराठी साहित्यातील निसर्ग चित्रणाचे स्वरूप, वास्तववादाचा विचार. काहीवेळा ललित किंवा वैचारिक घटनांना सर्जनशील साहित्याच्या इतिहासात स्थान दिलेले असते. सर्जनश साहित्याच्या निर्मितीला प्रेरक ठरणाऱ्या घटना इतकाच त्यांचा अनुबंध असतो. त्यांना स्व अस्तित्व असत नाही. उदा. लोकशाहीची विस्तारत जाणारी कल्पना आणि आजचे दलित साहि साहित्य निर्मितीला वैचारिक घटना आवश्यक असते. पण तिचे साहित्यरूपात परिवर्तन व्हावे लाग विचारेतिहासाचा वाङ्मयेतिहासाला उपयोग करून घेताना तारतम्यता बाळगावी लागते.




# 21 वीं शती का हिंदी साहित्य : नव विमर्श

N.S.(B) COLLEGE PHALTAN

संपादक
डॉ. एस. वाय. होनगेकर, डॉ. आरिफ़ महात
सह संपादक : विश्वनाथ सुतार




Principal
Namdevrao Suryawanshi(Bedke) College
Phaltan,Dist.Satara.

Scanned with OKEN Scanner

# 21 वीं शती का हिंदी साहित्य : नव विमर्श

संपादक
डॉ. एस. वाय. होनगेकर
डॉ. आरिफ़ महात
सह संपादक
विश्वनाथ सुतार

**ए. बी. एस. पब्लिकेशन**
**वाराणसी-221 007**

N.S.(B) COLLEGE PHALTAN
Principal
Namdevrao Suryawanshi(Bedke) College
Phaltan,Dist.Satara.
Scanned with OKEN Scanner

प्रकाशक
ए.बी.एस. पब्लिकेशन
आशापुर, सारनाथ
वाराणसी-221 007 (उ० प्र०)
मो०: 09450540654, 09415447276

ISBN : 978-93-86077-64-6

© संपादकाधीन

प्रथम संस्करण : 2018

मूल्य : 950.00 (नौ सौ पचास रुपये मात्र)

शब्द-संयोजन : विष्णु ग्राफिक्स

मुद्रक : पूजा प्रिण्टर्स
बसंत विहार, नौबस्ता

---

**IKKISAVI SHATI KA HINDI SAHITYA : NAV VIMARSH**

*By Ed. Dr. S. Y. Hongekar, Dr. Arif Mahat*

*Co. Ed.Dr. Vishvanath Sutar*

**Price : Rs. Nine Hundred Fifty Only**

N.S.(B) COLLEGE PHALTAN

Scanned with OKEN Scanner

N.S.(B) COLLEGE PHALTAN

8. वृद्ध विमर्श 226–230
*डॉ0 सुशीला*

9. केलिडोस्कोप : एक यथार्थ 231–234
*सारिका राजाराम कांबळे*

10. भूमंडलीकरण में वृद्धों का जीवन विमर्श 235–240
*प्रा. संपतराव सदाशिव जाधव*

11. 21 वीं सदी के हिंदी साहित्य में नव विमर्गप्र
विविध आयाम" 241–249
*प्रा. संजय नारायण पाटील*

12. हिंदी कथा साहित्य में वृद्ध विमर्श 250–253
*प्रा. एम. आर. मुंडकर*

13. वृद्ध विमर्श एवं उषा प्रियंवदा की कहानी 'वापसी' 254–259
*प्रा. शैलजा पांडुरंग टिळे*

14. 21 वी सदी के हिंदी साहित्य मे नव विमर्श :
विविध आयाम–वृद्ध विमर्श 260–263
*सुनिता रा. हुन्नरगी*

15. 21 वी सदी के हिंदी साहीत्य में वृद्ध विमर्श 264–270
*तेजस्विनी जनार्दन शितोळे*

16. 'दौड़' उपन्यास में चित्रित वृद्ध विमर्श 271–274
*प्रा. श्री. बिचुकले एस. एस.*

17. 21 वीं सदी के हिंदी कहानी साहित्य में
वृद्ध विमर्श 275–278
*डॉ. अशोक मरळे*

18. 'गिलिगडु'–एक सार्थक पहल 279–283
*प्रा. अजयकुमार कृष्णा कांबळे*

19. 21 वीं सदी के हिंदी साहित्य में–वृद्ध विमर्श 284–286
*प्रो. श्रीमती पी. व्ही. गाडवी*

Scanned with OKEN Scanner

# 16

# दौड़ उपन्यास में चित्रित वृद्ध विमर्श

विमर्श का अर्थ है – विचार विनिमय। इस अर्थ के अनुसार ' वृद्ध विमर्श' का अभिप्राय है – वृद्ध के संबंध में विचार विनिमय। आज वृद्धों की स्थिति, गति को नए कोणों से देखा जा रहा है। एक ओर उन्हें 'सिनीअर सिटीजन' कहा जा रहा है तो दूसरी ओर वे समस्याग्रस्त बने हैं। वृद्धों की समस्या का विषय आधुनिक काल की देन है। जैसे–जैसे समाज शिक्षित होता गया वैसे–वैसे वृद्धाश्रमों की संख्या बढती गयी। आज वृद्धों के सामने निर्वासन, अकेलापन, परावलंबत्व, भूख, निर्धनता आदि समस्याएँ हैं; जीवन की चार प्रमुख स्थितियाँ है बचपन, युवावस्था, प्रौढावस्था, वृद्धावस्था इन में से अंतिम अवस्था में ही उसे सामाजिक, पारिवारिक, आर्थिक, मानसिक आधार की आवश्यकता है परंतु इसी अवस्था में वह बेबस हो रहा है। माता पाँच बेटों को संभालती है परंतु जब वही बूढी हो जाती है तो पाँचों बेटों को वह बोझ लगने लगती है। यह जीवन की कितनी बडी विडंबना है। इस स्थिति में मैत्रेयी पुष्पा के कथन प्रासंगिक लगते है – " उसने कभी ऐसा नहीं सोचा होगा कि पाँचो ऐसे निकलेंगे। हमारी उम्मीदे ही हमे कही का नहीं छोडती। ये मोहजन्य पीड़ाएँ वृद्धावस्था को और जर्जर करके रख देती है। "[1] जब तक कमाऊ है तब तक माता–पिता को कई नामों से पुकारा जाता है पर जैसे ही उम्र ढलती है उनके नाम की पहचान मात्र 'बूढा' 'बूढिया' रह जाती है। सरकार की ओर से वृद्धों को उद्धार के लिए कई योजनाएँ चलायी जा रही है। 1 अक्तूबर, 1991 से ' वृद्ध दिवस ' की योजना को चलाया जाना इसी का परिचायक है। परंतु ये योजनाएँ वृद्धों की स्थितियों में कोई खास परिवर्तन नहीं ला पायी है। हाल ही में मुंबई के एक फ्लैट में बेटे के विदेश से लौटने पर बिस्तर पर पायी गयी माँ के हड्डियों के ढाँचे की लाश हमारे अमानवता का नहीं तो विकृतता कां प्रमाण है। आज सफल इन्सान एक अच्छा इन्सान कहलाए यह विचार जरूरी नहीं रहा है। आज वह निहायत आत्मकेंद्री, सत्तापिपासू, महत्वकांक्षी, निर्मम हो गया है। मनुष्य के इस विकृतता ने उत्तर आधुनिकता काल को आदिम काल से जोड दिया है। अंतर केवल यही है कि आज मानव की बर्बरता समाचार पत्रों में छप रही है। शायद लीलाधर

Scanned with OKEN Scanner

N.S. (B) COLLEGE PHALTAN

जगूडी ने इसी को लक्ष्य करके लिखा है – " एक वर्ष के लिए जैसे एक और वर्ष कुछ नहीं होता, एक सदी के लिए एक और सदी कोई बड़ी बात नहीं। सौ साल बदलने के लिए एक सदी इन्तजार की भी तो चाहिए। अभी तक हमने समय की क्रूरता देखी, अब समय भी हमारी क्रूरता देखे।"[2]

उपन्यास आज सर्वाधिक लोकप्रिय एवं सशक्त विधा के रूप में अपनी पहचान बना चुका है। मानव जीवन के सूक्ष्म एवं समग्र चित्रण के कारण ही उसे ' मानव जीवन का दर्पण ' कहा गया है। युग परिवर्तन के साथ ही उपन्यास के कथ्य और शिल्प में परिवर्तन होता गया है। केवल कथ्य पर विचार करे तो उपन्यास विधा समुद्धता का सहज अनुभव होता है। स्वातंत्र्योत्तर काल में आँचलिक, सामाजिक, मनोवैज्ञानिक, यथार्थवादी, समस्यात्मक, व्यंग्यात्मक, आधुनिक बोध, उत्तर आधुनिकता सभी विषयों पर उपन्यास लिखे गए। 20 वी सदी के अंत तक आते–आते दलित विमर्श और नारी विमर्श भी इसमें जुड़ गए। 21 वीं सदी पुरूष विमर्श, किन्नर विमर्श, आदिवासी विमर्श, विस्थापित विमर्श नए विषय को लेकर आयी तो किसान विमर्श एवं वृद्ध विमर्श को इस सदी ने नए नजरिए से देखना आरंभ किया। वस्तुतः 20 वी सदी में ही इन विषयों पर चिंतन होना प्रारंभ हो गया था। परंतु उसका संचित रूप अब विमर्श के रूप में उपन्यासों में झाँकने लगा है।

21 वीं सदी के हिंदी उपन्यासों में वृद्ध विमर्श एक आयाम के रूप में प्रस्तुत हुआ है। ममता कालिया द्वारा सदी के आरंभ में लिखा गया ' दौड़ ' उपन्यास पूर्णतः वृद्ध विमर्श को समर्पित है। भूमंडलीकरण, आजीविकावाद, बाजारवाद, उपभोक्तावाद के परिप्रेक्ष्य में लिखा गया यह उपन्यास अंतिम चरण में वृद्ध माता–पिता के दुख, क्षोभ, चिंता, घृणा, तणाव, भय को मार्मिकता से प्रकट करते हुए पाठकों की संवेदना को झकझोर देता है। रेखा और राकेश इस उपन्यास के मुख्य पात्र है। जो मध्यमवर्गीय परिवार का प्रतिनिधित्व करते हैं। रेखा अध्यापिका है तो राकेश पत्रकार है। जो इलाहाबाद में रहते हैं। पवन और सघन बेटों के लिए दोनों सारी सुख–सुविधाएँ जुटाते हैं। उन्हें मँहगी और ऊँची शिक्षा देते हैं। पवन एम. वी. ए. करने के बाद एक के बाद एक एक मल्टीनेशनल कंपनी बदलता हुआ ऐसी दुनिया में चला जाता है जहाँ बूढ़े माता–पिता को कोई जगह नहीं है। पवन तो यह मानता है ' जहाँ हर महिने वेतन मिले, वही जगह अपनी होती है। ' स्वयं लेखिका के शब्दों में " आर्थिक उदारीकरण ने भारतीय बाजार को शक्तिशाली बनाया है। बहुराष्ट्रीय कंपनीयों ने रोजगार के नए अवसर प्रदान किए। युवा वर्ग ने पूरी लगन के साथ इस सिमसिम द्वार को खोला और इसमें प्रविष्ट हो गया। जिन युवा–प्रतिभाओं ने यह कमान संभाली उन्होंने अपने कार्यक्षेत्र में तो खूब कामयाबी पायी पर मानवीय संबंधों के समीकरण उनसे कहीं ज्यादा खिंच गए, तो कहीं ढीले पड़ गए। ' दौड़ ' इन प्रभाव और तणावों की

Scanned with OKEN Scanner

COLLEGE PHALTAN N.S.(B)

पहचान कराता है।"[3] पवन अपनी पसंद के अनुसार स्टैला से विवाह करता है। जो प्रबुद्ध, कमाऊ, कैरियरिस्ट युवती है। वह कम्प्यूटर विजर्ड है। उसके पास बिलगेट्स के हस्ताक्षर से चिठ्ठी आती है। राकेश और रेखा मजबूर होकर इस रिश्ते को हामी भरते हैं। विवाह के कुछ दिनों के बाद ही दोनों अपने–अपने कार्य के सिल–सिले में दूर अलग–अलग शहरों में रहते हैं। दोनों का दाम्पत्य जीवन इंटरनेट, ई–मेल, सर्फिंग के द्वारे चलता है। कुछ दिन बीतते ही सघन भी अपने करियर के लिए दोनों को अकेला छोड़ ताईवान को चला जाता है।

राकेश और रेखा दोनो एक–दूसरे का सहारा बनकर इस भ्रम में रहते हैं कि बेटे कभी–कभार वापस आकर उनका सहारा बनेंगें। वही दो दिन की जिंदगी वे जी भरकर जिऐंगे। पीड़ा, ग्लानि, भय, निराशा, अकेलेपन को दूर करने के लिए व्यस्त रहने का प्रयास करते हैं जैसे घूमने जाना, गप्पे लड़ाना, रामचरित मानस का पाठ सुनना आदि। परंतु सोनी साहब की मृत्यु और सघन का ताईवान के स्थानिक राजनीति में हिस्सा लेना इन दो घटनाओं से दोनों पुरी तरह हिल जाते है। पिता जब सघन को वापस बुलाते हैं तो वह पैसों का हिसाब माँगता है – "आपने इतने बरसों में क्या किया ?दोनों बच्चों का खर्च आपके सिर से उठ गया। घूमने आप जाते नहीं, पिच्चर आप देखते नहीं, दारू आप पीते नहीं, फिर आपके पैसे का क्या हुआ ?"[4] इस प्रकार पिता को ही कठघरे में खड़ा करके सवाल पूछता है। एक बूढ़ा निर्धन बाप इसके क्या उत्तर दे सकता है। आखिरकार सघन ताईवान में ही रहने का फैसला लेता है और माता–पिता उसकी चिंता में मन मसोसकर रह जाते हैं। बेटे की चिंता और बिछोह के आतंकित भावना की उत्तेजना में ही उपन्यास का समापन हुआ है।

वास्तव में राकेश और रेखा केवल चेहरे है, वे उन तमाम वृद्ध माता–पिता का प्रतिनिधित्व कर रहें हैं जो इन समस्याओं का सामना कर रहे है। लेखिका के शब्दों में " ये सब कामियाब संतानों के माँ–बाप थे। हर एक के चेहरे पर भय और आशंका के साये थे। बच्चों की सफलता इनके जीवन में सन्नाटा बून रहीं थी।"[5] बच्चों के अभाव में इनका जीवन एकदम असुरक्षित बन गया था। कॉलोनी में हर घर में केवल बूढ़े माता–पिता थे,इसलिए इसे बुड्ढा–बुड्ढी कॉलोनी कहा जा सकता था। सीमित पूंजी के कारण ये बेटों को वापस नहीं बुला सकते तो दूसरी ओर बेटों के अभाव में इनका जीवन दुखी बना था। इस प्रकार ये दोहरे अभिशाप को भोग रहें थे। सोनी साहब का बेटा सिद्धार्थ पिता के अग्निदाह के लिए भी नहीं आता। बेटों की इस संवेदना शून्यता के कारण श्रीवास्तव जी को बेटा न होने का कोई अफसोस नहीं होता, तो सिन्हा साहब ने तो जीते जी गऊदान कर दिया है। क्या नौकरी–कैरीयर की दौड़ में आज रिश्ते, संस्कार, मानवता, संवेदना, मुल्क सब अर्थहीन हो गया है ? क्या माता–पिता के द्वारा उम्रभर की गई परवरीश, त्याग, तकलीफ, कष्ट, प्रेम कोई महत्व नहीं रखती?कैरीयरवाद ने

Scanned with OKEN Scanner

COLLEGE PHALTAN N.S. (B)

सभी को अपने जड़ों से अलग कर दिया है। जिसका वृद्धों के जीवन पर दूरगामी परिणाम हुआ है। वृद्ध माता–पिता के प्रति दायित्वहीनता की स्थिति में परिवार, समाज तथा राष्ट्र का प्रश्न ही नहीं उठता। जब कि शिक्षा तो हमारा साधन है और संपन्न परिवार और समाज हमारा साध्य है ऐसे में युवा पीढ़ी के दौड़ पर प्रश्न चिन्ह खड़ा हो रहा है।


निष्कर्षतः यह कहा जा सकता है कि ' दौड़ ' उपन्यास वृद्ध विमर्श के विविध आयाम प्रस्तुत करता है। उपन्यास में विमर्श के कई पहलूओं को उजागर करते हुए इस समस्या के गंभीर परिणामों के संदर्भ में सतर्क किया है तथा बुद्धिवादी वर्ग को चिंतन के लिए बाध्य किया है। अतः ' दौड़ ' उपन्यास वृद्ध विमर्श का दस्तावेज है।

## संदर्भ

1. बेटी ( कहानी संग्रह – ललमणियाँ ) – मैत्रेयी पुष्पा, पृष्ठ क. 97
2. दौड – ' सब दिन होत न एक समान ' – लीलाधर जगूडी, पृष्ठ क. 104
3. दौड ( उपन्यास ) – ममता कालिया – पृष्ठ क. 05
4. वहीं, पृष्ठ क. 85
5. वहीं, पृष्ठ क. 69

**प्रा. श्री. बिचुकले एस. एस.**
हिंदी विभाग
नामदेवराव सूर्यवंशी ( बेडके )
महाविद्यालय, फलटण, जि. सातारा

Scanned with OKEN Scanner




N.S.(B) COLLEGE PHALTAN

ABS

ए.बी.एस. पब्लिकेशन

आशापुर, सारनाथ, वाराणसी – 221 007

मो० : (+91) 9450540654, 8669132434

E-mail : abspublication@gmail.com

/ AbsPublication

ISBN 978-93-86077-64-6

₹ 950/-

Scanned with OKEN Scanner

'समन्वय' सदस्यां'साठी वितरण

साहित्य
# समन्वय

: सल्लागार मंडळ :
डॉ. गुरुराज आमूर,
डॉ. भा. वा. आठवले, डॉ. सी. आर. येरविनतेलिमठ

: संपादक मंडळ :
डॉ. एस. पी. पाटील, प्रा. सुरेश सोनटक्के,
डॉ. विष्णू वासमकर, प्राचार्य सुबराय देसाई

संपादिका : सौ. सुमन गायकवाड


कार्यकारी संपादक : डॉ. बाबुराव गायकवाड

: अभिप्रायार्थ नियतकालिके व पुस्तके पाठविण्याचा पत्ता :
प्रा. डॉ. बाबुराव गायकवाड
'साई राणीव', प्लॉट क्र. २६-बी, सिद्धारूढ नगर, श्रीनगर, धारवाड ५८०००३.

*हा अंक प्रकाशित होण्यापूर्वी कालातीत झालेल्या मान्यवरांना 'साहित्य समन्वय'ची आदरांजली !*

(या अंकातील लेखांत व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतातच असे नाही.)

मालक, मुद्रक, प्रकाशक सौ. सुमन गायकवाड यांनी हे अनियतकालिक मे. साई समर्थ प्रिंटर्स, पुणे ५१ येथे छापून 'साई राणीव', सिद्धारूढ नगर, धारवाड येथे प्रसिद्ध केले.



## आशावादी कविता : 'निरंतर'

● प्रा. व्यंकटेश वळसंगकर

धारवाड येथील माझे स्नेही प्रा. डॉ. बाबुराव गायकवाड कविनाम 'दत्तांकुर' यांचा 'निरंतर' काव्यसंग्रह (मंजुल प्रकाशन, पुणे) अभिप्रायार्थ माझ्या हाती आला, तेव्हा त्यांची निरंतर अशी साहित्यसेवा दृष्टिपथात आली. कविता/कथा/ललित/आत्मपर/समीक्षा या प्रकारांतील त्यांचे लेखन वाचक/रसिक/ अभ्यासक यांची दाद मिळविण्यात यशस्वी ठरले आहे. या निरंतर लेखन वाटचालीत त्यांची प्रतिभा जितकी उत्स्फूर्त तशाच त्यांच्या साहित्यकृती असतात, हे वेगळे सांगावे लागत नाही. कोणतीही कला ही प्रतिभेची निर्मिती असते. कलावंत/साहित्यिकाची ही कला/साहित्यकृती म्हणून प्रतिमा रूपात आविष्कृत होते. प्रतिभा आणि प्रतिमा यांचा तो एक उत्कृष्ट आविष्कार असतो.

भावना आणि विचार यांचे उत्कट शब्दरूप म्हणजे दत्तांकुरांच्या कविता व अन्य प्रकारच्या साहित्यकृती असे म्हणता येते. थोडी विमनस्कता/निराशा कधी कधी कलावंताच्या मनी स्थिरावते. 'शेवटी... शेवटी...!' त्यांचा काव्यसंग्रह याची साक्ष देतो. काव्यसंग्रहावर संपूर्ण 'उदासी' पसरत असल्याचे / पसरल्याचे दिसले होते. यामुळेच की काय, काव्यलेखनाकडे वळायचे नाही, असे ठरवल्याचे त्यांनी 'निरंतर'विषयी मध्ये (पृ. ५) लिहिले; पण 'कविता' त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती, याची प्रांजळ कबुलीही त्यांनी दिली आहे; म्हूणन ते पुढे लिहिते झाले. जीवनात आपल्याच गतीने जगायचे असते / चालायचे असते आणि ही जीवनगती म्हणजे(च) निरंतरता. त्यांनी निरंतर लिहिण्याचा वसा आनंदे पुढे चालू ठेवला, ही अभिनंदनीय बाब आहे. 'निरंतर' काव्यसंग्रहाद्वारे तेवढीच उत्स्फूर्तता त्यांनी मनी/जीवनी बाळगली. 'अजून यौवनात मी ! न दंग जीवनात ह्या' कवी अनिलांच्या काव्यपंक्तींची येथे प्रकर्षाने आठवण येते. खऱ्या अर्थाने जीवनात दंग राहण्यानंच मार्ग सापडतात असे म्हटले गेले आहे. 'कविता हे एक प्रकारचे बोलणे आहे, लिहिणे आहे.' असे प्रसिद्ध कवी/समीक्षक प्रा. वसंत आबाजी डहाके म्हणतात. (मौज दिवाळी २०११, पृ. ५०) तर 'कविता लेखन हा आपल्या जीवन प्रक्रियेचाच एक भाग आहे,' असं (शोध कवितेचा) कविवर्य मंगेश पाडगांवकर मानतात. (सा. सकाळ, ३० जून २०१२, पृ. ४२) या दोन्ही गोष्टी येथे तंतोतंत खऱ्या वाटतात.

अगदी सुरुवातीच्या 'निरंतर' कवितेत कवी 'आता तरी भेदभाव विसरा, मानवतेचा जरा मार्ग धरा' (पृ. ११) असे सांगत जीवनात निरंतर मानवतावादी/आशावादी राहण्यास बजावतो. 'गेले पावसाळे, आले हिवाळे, भीती उन्हाची नको

(कृपया कव्हर पान ३ पाहावे....

## आकलन – आस्वादक समीक्षा

● डॉ. सतेज दणाणे

समीक्षा ही साहित्यिकांना हितकारक असते. समीक्षा ही टीका असते. टीका केल्याने, दोषदिग्दर्शन केल्याने माणसे, साहित्यिक दुखावले जाण्याचाच मोठा धोका असतो. त्यापेक्षा भलावण केल्यामुळे दुखावण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. उलट प्रोत्साहन मिळते. १९६० नंतर मराठी साहित्यात 'दलित साहित्य' नावाचा स्वतंत्र आणि विस्तृत प्रवाह निर्माण झाला. तो प्रवाह विकसित होण्यास टीकाकारांचे मोठे योगदान मिळाले आहे. दलित साहित्यकृतीची भलावण करणारे, प्रोत्साहन देणारे, मार्गदर्शन करणारे, दलित साहित्य आणि साहित्यकृर्तीचे कौतुक केल्यामुळे विविधांगी साहित्यप्रवाह विकसित झालेला आहे. या प्रकारच्या समीक्षेचा उल्लेख डॉ. शरणकुमार लिंबाळे यांनी 'कौतुकभावाची समीक्षा' असा 'दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र' या समीक्षा ग्रंथात केलेला आहे.

डॉ. बाबुराव गायकवाड यांचा 'आकलन' हा समीक्षा ग्रंथ दलित साहित्याची समीक्षा करणारा ग्रंथ आहे. या ग्रंथात डॉ. गायकवाड यांनी केलेली समीक्षा ही कौतुकभावाची समीक्षा असल्याचे दिसून येते. दलित आत्मकथन, नारायण सुर्वे यांची कविता, वाटा आडवाटा हे लेख आणि गो. नि. दांडेकरांची मुलाखत हे 'आकलन' या समीक्षा ग्रंथात आहे. डॉ. गायकवाड यांनी 'दलितेतर लेखक आणि दलित जीवन', 'दृष्टिक्षेप', 'आकलन', 'साहित्य वेध' व 'अवलोकन' आणि 'गुण गाईन...' या समीक्षणात्मक ग्रंथांचे लेखन केलेले आहे. त्यांनी व्यवहारातही कुणाचे दोषदिग्दर्शन केलेले नाही. 'भलावण' करण्याची त्यांची वृत्ती समीक्षा व्यवहारातही दिसते. 'गुणगान' केल्याने सर्वांचे भले होते. नव्या लेखकांना सहाय्य व्हावे, या हेतूने समीक्षा व्यवहार हाताळल्याचे त्यांनी त्यांच्या ग्रंथाच्या मनोगतात नमूद केले आहे.

'आकलन' ग्रंथातील 'दलित आत्मकथन : एक दृष्टिक्षेप' या लेखामध्ये समाजव्यवस्थेशी, जातीशी व कुटुंबाशी संघर्ष करण्याच्या पवित्र्यात उभे असलेले आत्मकथनाच्या नायकाचे अस्वस्थ मन दिसते. सर्वच आत्मकथने डॉ. बाबासाहेबांच्या बौद्ध धम्म स्वीकारानंतरची आहेत. आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाची प्रेरणा आत्मकथनाला असल्याचे डॉ. गायकवाड यांनी बलुतं, उपरा, गबाळं, आभरान, गावळी, अक्करमाशी अशा बारा-पंधरा आत्मकथनांच्या आधारे विशद केले आहे. 'नारायण सुर्वे यांची कविता : काही विचार' या लेखामध्ये नारायण सुर्वे यांची कविता नवकाव्यापेक्षा वेगळ्या आशयाची होती. त्यांच्या कवितेत कामगारांच्या वास्तवपूर्ण व्यथा, वेदना अस्सलपणे मांडलेल्या आहेत. 'ऐसा गामी ब्रह्म माझे विद्यापीठ, जाहीरनामा, सनद' या कवितासंग्रहातून

‘कामगारविश्व’ मोठ्या ताकदीने साकार झालेले दिसून येते. या विश्वामध्ये एका जातीची व एका व्यवसायाची माणसे नाहीत तर निरनिराळ्या जातीची, व्यवसायांची माणसे कामगार म्हणून आलेली आहेत. लॉस एंजिल्सचा निग्रो आफ्रिकन, चाचा याकूब, नालबंदवाला, चंद्रा नायकीन, गिरणी गेटवरचा जिवबा असे जीव एकत्र आलेले आहेत. पशुपातळीवर जीवन जगणाऱ्या जीवांची व्यथा, वेदना त्यांच्या कवितेतून व्यक्त होताना दिसते. ‘सुर्व्यांच्या कवितेने साकार केलेले कामगारविश्व मोठे लक्षवेधक आहे, ही कविता वाचत असताना सहजपणे कामगारांच्या सुखदु:खांशी आपण समरस होतो. ही कविता कामगारांच्या ठसठसत्या वेदना मांडणारी आहे.’ डॉ. गायकवाड यांनी नारायण सुर्वेंच्या कवितेतील विश्व हे कामगारांच्या व्यथा-वेदनांचे असल्याचे दाखवून देऊन त्यातील माणसेही पशुपातळीवर जीवन जगतानाचे दर्शन घडविले आहे.

‘वाटा-आडवाटा : दलित कथेतील वेगळी वाट’ या लेखात वामन होवाळ यांच्या ‘वाटा आडवाटा’ कथासंग्रहातील ग्रामीण माणसाच्या जीवनाचे वास्तव चित्रण करणाऱ्या आहेत. बहुतेक कथा दलितांच्या जीवनावरच्या आहेत; परंतु त्यामध्ये आक्रस्ताळेपणा, बंडखोरवृत्ती किंवा विद्रोही जाणीव दिसून येत नाही. ‘‘वाटा आडवाटा’ या कथासंग्रहातील बहुतेक कथा मानवी जीवनतील वृत्ती-प्रवृत्तींवर आधारलेल्या आहेत, असे गायकवाड यांनी नमूद केले आहे. होवाळांच्या कथेत थापा मारणारी, दुसऱ्यावर विश्वास ठेवणारी, हातोहात फसविणारी, लबाड बोलणारी व कुणावरही सूड उगविण्यासाठी अस्वस्थ होणारी अशा अनेकविध प्रकृतीची माणसे त्यांच्या वागण्या-बोलण्यातून होवाळ यांनी चित्रित केली आहेत. होवाळ यांच्या कथेत येणारी माणसे जात, धर्म घेऊ नयेत नाहीत, तर प्रवृत्त्या घेऊन येतात, हे वामन होवाळ यांच्या कथेचे वेगळेपण आहे. ह्या संग्रहाने स्वत:ची वेगळी वाट निर्माण केली आहे, असे डॉ. गायकवाड यांनी नमूद केले आहे.

डॉ. बाबुराव गायकवाड यांनी ‘आकलन’ या ग्रंथामध्ये गो. नि. दांडेकरांची मुलाखत प्रश्न-उत्तर स्वरूपात मांडली नसून ती मुलाखत घेतानाच्या स्थितीचे इत्थंभूत वर्णन केले आहे. मुलाखतकार डॉ. गायकवाड यांनी गो. नि. ना अनेक प्रश्न विचारले आहेत. त्या प्रश्नांपैकी दलित साहित्याविषयी आपणास काय वाटते? या प्रश्नाचे गो. नि. दांडेकरांनी दिलेले उत्तर आणि डॉ. गायकवाड यांनी त्या स्थितीचे केलेले वर्णन अभ्यासनीय आहे.

डॉ. गायकवाड लिहितात, ‘एखाद्या संकटावर आक्रमक पवित्रा घेऊन उभे राहावे, त्याप्रमाणे आप्पासाहेब लेटलेले असतानाही गडबडीत उठून बसले व शांतपणे बोलू लागले.’ या गायकवाड यांनी केलेल्या वर्णनातून गो. नि. दांडेकरांना दलित साहित्याविषयी सजगता असलेली दिसून येत नाही. ते दलित साहित्याकडे सहानुभूतीच्या भावनेतून बघताना जाणवले नाही; पण दलित साहित्याविषयी असलेली कणव त्यांच्या



वर्तनातून प्रथमदर्शनीच दिसत. दलित साहित्य म्हणजे दलितांची एक भूमिका व बाजू मांडणारे साहित्य आहे. शतकानुशतके दलित चेपले गेलेले आहेत. मूकपणाने ते अनेक अन्याय, अत्याचार सहन करत राहिले आहेत. त्यामुळे आता थोडीशी प्रकाशाची तिरीप त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळे पाहायला मिळते आहे व क्रांतीपणा दलितांत आलेला आहे; म्हणून आपल्या भावना व्यक्त होताना थोडासा आक्रोश होतो आहे, असे दांडेकरांना वाटते.

ते पुढे म्हणतात, ‘परंतु गायकवाड, खरे सांगू, अशा प्रकारचा आरडाओरडा न करताही दलित साहित्यात भर टाकता येईल. तुम्हाला किती आणि काय सांगावे? दु:ख हे मोठे सुंदर असते.’ दलितांच्या आणि ‘स्मरणगाथे’तील नायकाच्या समस्या भिन्न वाटल्यातरी एकप्रकारे त्या दु:खदच आहेत. त्या बिचाऱ्याच्या अंगावर फाटके कपडे असतात. तो रानोमाळ भटकत असतो, लोक त्याला छी-थू करीत असतात.’ गो. नि. दांडेकरांनी दलित साहित्यात थोडासा आक्रोश होतो आहे हे मान्य केले आहे. त्यांना दलित साहित्यातूनच येणारा आरडाओरडा हा त्यांचा स्थायिभाव झाला असल्याचे वाटते. त्याशिवाय दलित साहित्यात भर टाकता येईल असेही वाटते. त्यांना हे ‘दु:ख मोठे दिसते, हे पटवून देण्यासाठी ‘स्मरणगाथे’तील नायक व दलित एकाच तागड्यात तोलल्यासारखे वाटते. यावरून दलित जीवन भोगलेल्या व्यक्तीशिवाय त्याच्या दु:खाच्या वेदना इतरांना समजणार नाहीत, असे म्हणता येते. दलितांचे दु:ख हे त्यांच्या जातीमुळे निर्माण झालेले आहे, तर दहा-पंधरा कोस चालत जाणे किंवा मुलांना सावकारांकडे नोकरीस पाठविणे, हे दु:ख परिस्थितीतून निर्माण झालेले आहे, असे असले तरी गो. नि. दांडेकरांना ती सारखीच वाटतात. दलित साहित्य व दलित जीवनाविषयक त्यांच्या जाणिवेत फारसा आपलेपणा जाणवत नाही.

‘आकलन’ या समीक्षा ग्रंथामध्ये डॉ. गायकवाड यांनी केलेली समीक्षा प्रामुख्याने वंचित, शोषित व पीडित दलित समाजाच्या जीवनाच्या साहित्याची आहे. दलित साहित्यासंबंधीची चर्चा आधिक्याने डॉ. गायकवाड यांनी गो. नी. दांडेकरांची घेतलेली मुलाखतही त्यातच मोडते. इतर समीक्षणात्मक लेखांमधून त्यांनी भलावण केलेली असली, तरी काही प्रमाणात दोषदिग्दर्शनही केलेले आहे. थोडक्यात, टीका ही दोन प्रकारची असते. एक म्हणजे दोषदिग्दर्शन आणि दुसरी म्हणजे भलावण. डॉ. बाबुराव गायकवाड यांनी मोठ्या प्रमाणात कौतुकाभावाची समीक्षा केलेली असली, तरी अप्रत्यक्षपणे त्यांनी दोषांचे काही ठिकाणी सूचन केलेले आहे. समीक्षकाकडे हे दोन्ही गुण असायला हवेत! ते डॉ. गायकवाड यांच्यात आहेत.

‘आकलन’ या समीक्षा ग्रंथाचा विचार करता एक आस्वादक समीक्षेचा उत्कृष्ट समीक्षा ग्रंथ वाचल्याचे आपणास निश्चितच समाधान मिळते.

■ ■ ■

'समन्वय' सदस्यां'साठी वितरण

साहित्य

# समन्वय

: सल्लागार मंडळ :
डॉ. गुरुराज आमूर,
डॉ. भा. वा. आठवले, डॉ. सी. आर. येरविनतेलिमठ

: संपादक मंडळ :
डॉ. एस. पी. पाटील, प्रा. सुरेश सोनटक्के,
डॉ. विष्णू वासमकर, प्राचार्य सुबराय देसाई

संपादिका : सौ. सुमन गायकवाड

कार्यकारी संपादक : डॉ. बाबुराव गायकवाड

: अभिप्रायार्थ नियतकालिके व पुस्तके पाठविण्याचा पत्ता :
प्रा. डॉ. बाबुराव गायकवाड
'साई राणीव', प्लॉट क्र. २६-बी, सिद्धारूढ नगर, श्रीनगर, धारवाड ५८०००३.

*हा अंक प्रकाशित होण्यापूर्वी कालातीत झालेल्या मान्यवरांना 'साहित्य समन्वय'ची आदरांजली !*

(या अंकातील लेखांत व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतातच असे नाही.)

मालक, मुद्रक, प्रकाशक सौ. सुमन गायकवाड यांनी हे अनियतकालिक मे. साई समर्थ प्रिंटर्स, पुणे ५१ येथे छापून 'साई राणीव', सिद्धारूढ नगर, धारवाड येथे प्रसिद्ध केले.

मौलिक साहित्याभ्यासाला वाहिलेले अनियतकालिक

साहित्य

# समन्वय



## उन्हाळा विशेषांक

(वर्ष २९ वे)

संपादिका : सौ. सुमन गायकवाड

# डॉ. बाबुराव गायकवाड यांच्या साहित्यातील भाषासौंदर्य

● डॉ. सतेज दणाणे

व्यक्तीची जडण-घडण ज्या काळात, ज्या परिसरात झालेली असते त्या काळातील, परिसरातील राजकारण, समाजकारण, धर्मकारण आणि भाषा यांचा प्रभाव त्या व्यक्तीच्या साहित्यकृतीवर होत असतो. साहित्यकृती आकाराला येण्यात भाषेचा महत्त्वाचा वाटा असतो. एवढेच नव्हे तर राजकारण, समाजकारण, धर्मकारण, संस्कृतीकरण, मूल्यव्यवस्था भाषेच्या साहाय्यानेच वाटचाल करीत असते. पुढच्या पिढीकडे संक्रमित होत असते. व्यक्तीची ओळख ही भाषेतून आणि भाषेमुळेच होत असते. साहित्यकृतीचे सौंदर्य हे भाषेवरच अवलंबून असते. लेखकाचे निवेदन, त्याची बोलीभाषा ही साहित्यकृतीला दर्जा देत असते. लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाची आणि त्याच्या जडणघडणीतील प्रादेशिकतेची ओळख ही भाषेमुळेच शक्य होते. माणसाला डोळे जसे अत्यंत आवश्यक असतात, तसेच भाषाही व्यवहारासाठी अत्यंत गरजेची असते. भाषेमुळे व्यवहार सुरळीत होतात. तसेच भाषा ही जीवनात चैतन्य निर्माण करते. साहित्यामधील भाषा ही त्या साहित्यकृतीला जिवंत करते. त्यामधील माणसे, निसर्ग, परिसर सजीव करते. मानवी व्यवहारात भाषा जितकी महत्त्वाची आहे, तितकीच साहित्यातही महत्त्वाची आहे. कारण भाषेमुळे मानवी व्यवहार सुकर, सुव्यवस्थित, सुरळीत चालतात. तसेच भाषेमुळे साहित्याला सौंदर्य प्राप्त होते. साहित्याचा दर्जा हा काही प्रमाणात भाषेवरच अवलंबून असतो. डॉ. बाबुराव गायकवाड यांनी विविधांगी साहित्य निर्मिती केलेली आहे. त्यांच्या साहित्याला जिवंतपणा देणाऱ्या आणि वाचकांना आल्हाददायक वाटणाऱ्या भाषेचा विचार या शोधनिबंधाचा विषय आहे.

डॉ. बाबुराव गायकवाड यांनी कविता, कथा, कादंबरी, नाटक, ललित लेखन, चरित्र, अनुवाद, समीक्षा असे सर्वच वाङ्मय प्रकार हाताळलेले आहेत. त्यांची जडणघडण ही मराठवाडा परिसरातच झालेली आहे. देवगड (कोकण) येथे पाच वर्षे आणि कन्नड-मराठी प्रदेशातील सीमाभागात - धारवाड येथे तीस वर्षांहून अधिक काळ त्यांनी वास्तव्य केले आहे. त्यांनी केलेल्या साहित्यनिर्मितीला विविध परिसरातील भाषेची झालर असलेली दिसते. ती संमिश्र भाषा फक्त झालर म्हणून राहत नाही, तर ती त्यांच्या साहित्यकृतीचे आशयसौंदर्य वाढविताना दिसते.

सामान्य माणूस, त्यांची सुख-दु:खे, दारिद्र्य, व्यथा, वेदना, अन्याय, अत्याचार, स्पृश्य, अस्पृश्यता, अभावग्रस्तता ही त्यांच्या साहित्यातून आविष्कृत होते. पिढ्यानूपिढ्यांची शोषक आणि शोषण व्यवस्था आणि सर्वसामान्य माणसाचे जीवन हाच सामाजिक आशय गायकवाड यांच्या साहित्याचा आहे. समाज जीवनातील अनेक

वृत्ती-प्रवृत्तीची माणसे, त्यांचे जीवनव्यवहार शब्दबद्ध करताना प्रतिमा, प्रतिके आणि ग्रामीण बोलीभाषेचा वापर डॉ. गायकवाड यांनी केलेला आहे. त्यामुळे आशयसौंदर्य प्राप्त होण्यास बळकटी मिळालेली दिसते.

त्यांची ग्रामीण बोलीही वाचकांचे लक्ष वेधून घेताना दिसते. उदा. मोल आहे, डौल आहे, ओल आहे, दुष्ट सापांनो, मक्तेदारांनो, कृष्ण शरीर, बलात्कार, भोगले, रंडकीच्या बेबी, कावळे, बावळे, वाकड्या, काकड्या, थोकड्या, जगायचं, मरायचं हे शब्द ग्रामीणता स्पष्ट करतात. काही ठिकाणी अश्लील शब्द येतात. यमकात्मक स्वरूपाचेही अनेक शब्द आलेले आहेत. यामुळे ग्रामीण वास्तवाचे दर्शन होते. साहित्यकृतीच्या आशय सौंदर्यात भर पडते. परिवर्तनाची आशा व्यक्त करणाऱ्या कवितेत कवी म्हणतो -

*'लटका कळवळा दीनदुबळ्यांचा*
*कपटनाट्यांना कोण फसणार आहे ?*
*बांधा गाठोडे, हलवा मुक्काम*
*आता आमचे राज्य येणार आहे*
*इथवर छळल्याचा जाब*
*येणारे शतक पुसणार आहे.'* (हुंदका, पृ. ४७)

लटका, कळवळा, कपटलाट्यांना, बांधा गोठोडे, हलवा मुक्काम हे शब्द ग्रामीण वास्तव मांडणारे आहेत. शोषितांची व्यथा व्यक्त करणारे आहेत. परिवर्तनाची आशा अभिव्यक्त करणारे आहेत. विषमतामय व्यवस्थेवर प्रहार करणारे आहेत. यामधून दैन्यग्रस्ताच्या कष्टमय जीवनाचे चित्र उभे राहिलेले आहे

'प्रीती' कवितेतील गझलसदृश्य रचना एक वेगळीच शब्दकळा असल्याचे दिसते. यामधील उपमा, प्रतिमा या प्रेमाचे भाव व्यक्त करणाऱ्या आहेत. तशाच त्या सुशिक्षितांच्या, मध्यमवर्गीयांच्या व्यवहारातील आहेत. त्या दृष्टीने पुढील कविता पाहण्यासारखी आहे.

*'बैठकीतली सतार माझी*
*आज दुज्याकरी झंकारत होती*
*नादब्रह्मात मग्न असामी,*
*बोटाच्या चापल्याने*
*मधुर मंद ती बोलत होती,*
*जीवापाड जपलेला नाद स्वर कसा*
*ताल मनाचा होऊनी बसला होता*
*छंद माझा मला कसा*
*घाव होऊनी डसला होता.'* (स्वप्नील, पृ. ५३)



या कवितेतील नादब्रह्मात मग्न असणे, मधुर मंद बोलणे, जीवपाड जपणे, घाव होऊनी डसणे हे वाक्प्रचार आणि त्याचा भावाशय हा उच्चभ्रू संस्कृतीशी नाते जोडणारा आहे. नादस्वर, झंकारत, नादब्रह्म, मधु मंद, ताल, छंद यांमधून एक वेगळी संस्कृती अभिव्यक्त होते. डॉ. गायकवाड यांनी अभावग्रस्त जीवनातील भाषाशैली आणि मध्यमवर्गीयांची भाषाशैली साहित्यात आणलेली आहे. दुःखितांची वेदना आणि सुखासिन जीवन जगणारी भावना त्यांच्या भाषाशैलीतून व्यक्त होताना दिसते आणि हेच त्यांच्या साहित्याचे भाषासौंदर्य ठरले आहे.

मराठवाड्यातील भाषेची ओळखं करून देणाऱ्या कथा म्हणून डॉ. गायकवाडांच्या कथा महत्त्वाच्या आहेत. बुरुज, बाज, नोकरी, शेळी, बोंब, चऱ्हाट आणि मास्तर या कथा दलितांच्या अन्यायग्रस्त जगण्याच्या आहेत. सवर्ण हे दलितांवर परंपरेने अन्याय करीत आहेत. दलितांची आर्थिक दुर्बलता ही परंपरेतून आलेली आहे. ती त्यांच्या जगण्याला कारणीभूत आहे. पिढ्यानुपिढ्यांची लाचारी, दुर्बलता, अपमानित जगणे त्यांच्या कथेतील संवादातून अभिव्यक्त होते.

*''काशिबा, तो पाय अगोदर टाकून ये, म्हणजे जेवताना वास येणार नाही.''*

*''मी जेवतो आहे, तुम्हीच का टाकून येत नाहीत ?'' कारभाऱ्याच्या पायाची आग मस्तकात गेली.*

*''मी तुझा नोकर की तू माझा नोकर आहेस?'' ते गरजले.*

*''मी नोकर असलो, तरी असली कामे करण्यासाठी नाही. शेतातले काम करण्यासाठी आहे.'' काशिबा बोलला.* (बुरुज, पृ. १८)

ही संवादाची भाषा ग्रामीण आणि दलित जीवनातील आहे. कारभारी, नोकर हे शोषक आणि शोषितांचे संदर्भ पुरविणारे शब्द आहेत. तळपायाची आग मस्तकात जाणे हा वाक्प्रचार तर 'मांगट्या' ही जातीवाचक शिवी आलेली आहे. डॉ. गायकवाडांची प्रसंगचित्रणाची भाषा ही अनेक संयोगाने मिश्रित असलेली दिसून येते.

डॉ. गायकवाडांच्या कथेतील निवेदनात आलेली भाषा ही त्या त्या प्रादेशिकतेच्या विशेषासह जाणवते.

*'तांबडं फुटायला थोडासा अवकाश होता. कोठूनतरी कोंबडा आरवल्याचा आवाज ऐकू येत होता. बघता बघता नवीन आणलेला बैल नांगर ओढण्यास कच खाऊ लागला. तेव्हा दादांनी दोन चार चाबकाचे फटके लगावले. नाजूक नारीसारखे बैलाचे झाले. त्याच्या पाठीवरचे चामडेच उडून निघाले.'* (बुरुज, पृ. ३४)

या निवेदनात ग्रामीण परिसर, तेथील शेतीनिष्ठ संस्कृती दिसून येते. तांबडं फुटणे, कोंबडा आरवणे, कच खाणे, नाजूक नारीसारखे हे वाक्प्रचार आणि उपमा या वास्तव प्रसंगाची मांडणी करण्यासाठी साहाय्यक ठरत नाहीत, तर कथेची उंची वाढविण्यासाठी महत्त्वाचे योगदान देतात.

*'केकताडाची झुडपे दूरवर पसरली होती. तजेलदारपणाने उन्हात चमकत होती. विहिरीतील अमृतपाणी खाऊन ती चांगली ताजीतवानी झाली होती. डोळ्यांत भरणारी शेळकी पन्नास-साठ पाने मी चराचरा कापली व पाणी पिण्यासाठी जवळच्या ओढ्यावर गेलो. पाणी पिऊन परत येतो, तर पिवळी केकताडाची पाने चिरत उभी होती. तिच्या पिवळ्या धमक हातात हिरवे पान खुलून दिसत होते. सूर्याच्या कोवळ्या उन्हाचा पिवळेपणा तिच्या चेहऱ्यावर जाणवला.'* ही डॉ. गायकवाड यांची वर्णनशैली निसर्गचित्रण आणि व्यक्तिचित्रण करताना ओघवती झालेली दिसते. त्यांनी निसर्ग प्रतिमांचा वापर मोठ्या चातुर्याने आणि नेमकेपणाने केलेला आहे. ते स्त्री-सौंदर्याचे वर्णन मोजक्या शब्दांत करतात. त्यावेळी निसर्ग वर्णनात रंगून गेलेले जाणवतात.

'सावकाश चालायची, रोलरने माती चेपावी तशी, ती नवऱ्याच्या तर तो बायकोच्या वियोगाने दुःखी, बारीक झालेले डोळे, धाब गळ्याची चिरगिटे लोंबत होती, हिरव्यागार पन्हाळ्या, तिचा चेहरा शेळीच्या तोंडासारखा वाटत होता, ते रंगाने तांबूस गोरे असून अंगावर दाट काळ्या केसांचे जंगल माजले होते, किरकोळ शरीराची रेखा आता आकर्षक दिसत होती. आकाशात ढगांची गर्दी होत होती.' अशा प्रतिमा, उपमा आणि वाक्प्रचार यामुळे कथानकात जिवंतपणा आलेला दिसतो. बोलीभाषेतील शब्द आणि प्रतिमा अधिक श्रीमंत करतात. त्यांच्या कथेची शीर्षके आणि कथेतील प्रतिमा या वास्तव जीवनातील आहेत. त्या जातीच्या संबोधाने येतात. शोषक, शोषित व्यवस्था उभ्या करतात. त्यामधून प्रादेशिकतेची ओळख होते. कौलारू, बुरुज, निंब-पिंपळ, गुंडाळे, सुंब, बाज, झोपडी, फडा, शेळी, लिंबोळ्या, पुस्तक, दात, बेडूक, आगटी, आड, चऱ्हाट, आयाळपक्षी, वंजारी, बोंब, टक्कर हे मराठवाड्यातील बोलीभाषेतील शब्द त्यांच्या कथेत आलेले दिसतात. त्यामधून त्यांच्या कथेचा वेगळा बाज दिसून येतो. उदा. तुळतुळीत (पृ. ६१); इंगळ, दिस्तुयास; आगजाळबाई (पृ. ६४); वकटा (पृ. ६५); फाळ (पृ. ६६); जरमली, धडुतं (पृ. ६७); माज चढलाय, नाच्या, भडभुंज्या, भाडखाऊ, रंडकी (पृ. २९); तिरसटराव (पृ. ३२); वंजारडा, सळतोय (पृ. ३३); शिणची (पृ. २८); कवळ्यात (पृ. ३०); ताटाची, खुबाडे (पृ. ३२); कागाळी, मोरकी (पृ. ३३); आगलीवर (पृ. ३४); ऑफिसला (पृ. ४६); पकडो सालोंको, बदमाश, यहाँ आकर अपने मालपर नजर रखता है (पृ. ४८); फोटोग्राफी (पृ. ४९); मालट्रक (पृ. ५२); वणवण फिरणे (पृ. १४); पांग फेडणे (पृ. १६); कावऱ्या बावऱ्या नजरेने पाहणे, भडभडून येणे (पृ. १७); गाडी बरूबर नळ्याची बी जत्रा (पृ. १६); ओशाळलेपण पाहणे, गोरीमोरी होणे (पृ. ३८); फलाण्याचं (पृ. ३७); पाणईजवळ (पृ. ३८); काहीबाही (पृ. ३९); केवडुसं (पृ. २४); खिळग्याच्या, बिंदगी, चिपाडाचा बुकणा, वझनंच, शेरड्या (पृ. २६); सुंब, ढाबळग्याची, चिरंगुट (पृ. ७); कोपऱ्या, सुंद (पृ. ८) हे त्या परिसरातील प्रादेशिकताजन्य शब्द, अपशब्द



आणि शिव्या 'बाज' या कथासंग्रहात आलेल्या आहेत. मराठवाड्यातील परिसराची ग्रामीण बोलीभाषा, दलितांची बोलीभाषा आणि इंग्रजी, हिंदी, उर्दू शब्दांमुळे कथेला एक वेगळाच आशय प्राप्त झालेला आहे. वाक्प्रचार व म्हणी हे तर डॉ. गायकवाड यांच्या कथांचे वेगळेपण असलेले दिसून येते. त्या परिसरातील भाषेचा संस्कार म्हणून आलेले विविध शब्द हे भाषासौंदर्यात भर घालणारे आहेत. तसेच त्यामुळे वास्तव चित्रण होण्यासही साहाय्य मिळालेले आहे.

'झळ' आणि 'आग' या संघर्ष चित्रित करणाऱ्या कादंबऱ्यांचे भाषिक सौंदर्य हे ग्रामीण-दलित जीवनातील बोलींनी नटलेले आहे. लेखकाचे प्रमाण भाषेतील निवेदन अगदी सरळ, साधे आणि आशयानुकूल आहे. आशयाची उंची वाढविणारे अनेक आशयघन शब्द त्यांच्या लेखनात येताना आढळतात. 'झळ' कादंबरीत भोरगं (पृ. ५), लिंबूर-हुरडा (पृ. २१), डांबा (पृ. २२), धांद-चिंधी (पृ. २३), पेकाट, भोत (पृ. २५), खुरड्या (पृ. ३१), चिरडी-मोठी (पृ. ३६), शेजारीपाजारी (पृ. ३७), सडपातळ, उदरजाव, लाईन (पृ. ३८), पाटस, ठेपा, कॉलेज (पृ. ३९), एकट्यादुकट्याला (पृ. ४०), खटाखट (पृ. ४१), तरणाबांड (पृ. ४७), गुलुगुलु (पृ. ४८), स्लीपर (पृ. १०), स्टेशन (पृ. २०), मिलीटरी (पृ. २९), सिटवर (पृ. ३०), कालवण (पृ. ५३), रिपोर्ट, सार्जंट, मार्च, प्लाटून, कॅप्टन, घबरावो मत, सेंटर, वाचमन (पृ. ५५), ऑफिसर, अनजान (पृ. ५६), बी. ए., सुटपँट (पृ. ५८), मिस, डिग्री (पृ. ५९), सुपरिंटेंडेड, मुशाफिर (पृ. ६२), ताकीद (पृ. ६३), चाय बाबुजी (पृ. ६७), मालट्रक, पसार (पृ. ६९), मॅट्रिक (पृ. ७०), बाटली (पृ. ७१) हे शब्द.

'आग' या कादंबरीत एस्. एस्. सी. (पृ. १), म्हारूडा (पृ. ४), फाडफाड (पृ. ५), मलेरिया डॉक्टर (पृ. ६), नाकाडोळ्यांत (पृ. ७), लालचुटूक (पृ. ८), रांडमुंड, सुखदुक, हुरदं, शिळ्यापाक्यावर, ग्वाड, खुळ्यावाणी (पृ. ९), त्वांड बिंड, चट्टामट्टा (पृ. १०), झोपटभर, शिंदळकी (पृ. १२), रंडकेपणा (पृ. १३), चवडका (पृ. २७), सपकन, बुकलणे (पृ. २९), पिंढरी (पृ. ३०), फेरफटका (पृ. ३७), वकट्या, कालवाकालव (पृ. ४२), सय (पृ. ४३), गोरामोरा (पृ. ४४), कॅरिअर (पृ. २९), बेटो, हॉटेल, डबलरोटी (पृ. ३२), टेशनात (पृ. ४५), डेली, पेपर (पृ. ४९), सबूर (पृ. ७९), पेमेंट (पृ. ९६), खेड्यापाड्यात (पृ. ४५), धतुरा (पृ. ४७), झापड (पृ. ५१), फिस्कारून, पंदाड्या (पृ. ५३), तंगीभंगी (पृ. ६०), वरखडून, सांदायचं (पृ. ६२), दंग (पृ. ६३), इगतीइगतीनं (पृ. ६४), भुत्यावड (पृ. ६८), डोंबलं, बाईलभाड्या (पृ. ७५), बेना (पृ. ७८), सवं, ढाळज (पृ. ७९), सबा-फिबा (पृ. ८०), भलेबुरे, लंडे, लटके (पृ. ९८), कटाळ्या (पृ. १००), काळाढूस (पृ. १०७), प्लेट, ऑर्डर (पृ. १०८), याळ (पृ. १११), जाशील फिसील (पृ. ११६), हलाल (पृ. १२२), प्रिन्सिपॉल (पृ. १२३), साला, ऑफिसात (पृ. १२४), पोलीस (पृ.

१२७), नवकरार (१२८), राशन (पृ. १३३), वेवस्ता (पृ. १४९), कलेक्टर (पृ. १५३) असे अनेक शब्द आलेले आहेत. हे खास मराठवाड्यातील ग्रामीण बोलीभाषेतील आहेत. त्यामधून दलित जीवनाचे वास्तव चित्रण झालेले दिसते. या कादंबरीत शहरी व्यवहारातील शब्द, हिंदी, उर्दू, इंग्रजी भाषेतील शब्द आलेले आहेत. त्याचे कारण मराठवाड्यात हिंदू-मुस्लिम राहतात. आपल्या देशात इंग्रजांचे वास्तव्य बरेच वर्षे होते. त्या अनुषंगाने कादंबरीच्या निवेदनातील भाषेमध्ये विविधता निर्माण झालेली आहे. डॉ. गायकवाड यांच्या कादंबऱ्यांचे भाषेतील अशा विविधतेमुळे सौंदर्य खुललेले दिसून येते. त्यांच्या कादंबऱ्यांतील संवाद हे बोलीभाषेत आलेले आहेत. ते मराठवाड्यातील भाषेची ओळख करून देणारे आहेत. त्यामुळे त्या भागाचे वास्तवदर्शन होते. कादंबरीच्या आशयाला समृद्धता देणाऱ्या घटकांमध्ये संवादाला महत्त्वाचे स्थान आहे. सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक स्थितीचे दर्शन हे संवादामधून घडते. त्या परिसराची, त्या समाज गटाची संस्कृती ही संवादातूनच अभिव्यक्त होत असते. त्यादृष्टीने 'आग' या कादंबरीतील संवाद पाहण्यासारखे आहेत.

*"संभूने झोपटात शिरत विचारले, "कवा आलाईस रं, येतुस म्हणून कारडं न्हाय, सांगावा नाय, गेलास तो वरीस दोनवरीस तिकडंच गाईब, आज सकाळचं आलास तर रानामधी येऊ न्हवतास का?"*

*"आलो होतो, आपली चूकामूक झाली !" म्हणून मधूने बापाच्या पायाला स्पर्श केला.*

*त्याचबरोबर संभू गलबलून बोलला. "असं करू न्हयं रं बाबा, असं कसं तुझं दगडासारकं काळीज. तुह्या बिगर मला कोण ? मग माज्या जीवला का घोर न्हाय म्हणतुयास ? शिकशणासाठी असा किती दिस लांब राहणारायेस ? आता कसली बी नवकरी बघून आसरा करायचा बग. मी अजून कुठवर लोकांच्या दावणीला पडू ?"*

हा संवाद दारिद्र्याचे आणि मानवी स्वभावाचे दर्शन घडवितो. यामधील भाषा ही ग्रामीण दलित जीवन व्यक्त करते. एवढेच नाही तर त्यांचे जगणेच वाचकांसमोर हुबेहूब उभे करते. या संवादाला लाभलेले भाषिक सौंदर्य हे वास्तवजीवन अधोरेखित करण्यासाठी बळकटी देते.

डॉ. गायकवाड यांची भाषा ही डौलदार आहे. ती आशयानुरूप बदलताना दिसते. त्यांच्या कादंबऱ्यांत अनेक प्रतिमा, प्रतिके, वाक्प्रचार आणि म्हणी आलेल्या आहेत. शिव्या आणि अश्लील शब्दही आलेले आहेत. त्यामधून ग्रामीण जीवनाचे दर्शन घडते.

रात्रीला पिठासारखं चांदणं पडलेलं असायचं (झळ, पृ. ४), तिघेजण भुताप्रमाणे पेटलेल्या आगटीकडे गेले (आग, पृ. ५७), वाघाप्रमाणे तिचे नरडे फोडावे वाटले (आग, पृ. १२३), पोटात कालवाकालव होणे (झळ, पृ. ६३), तोंडापुरती



विचारपूस करणे (झळ, पृ. ३१), गोरामोरा होणे (आग, पृ. ४४), बाईलभाड्या होणे (आग, पृ. ७५), तोंडाचे पाणी पळणे (पृ. १२७), नेभळट (पृ. २१), महार विद्यापीठ, लई बोकाळले, बिना शेपटाचे रेडे (पृ. १३२), भडवे, गांडू (पृ. १०५), साला (पृ. १२४), बेना, भोसडीच्या, रंगेलपणा (पृ. ७८) - आग. इंद्रियाची लोलुपता (पृ. ५१), उरावर (पृ. ६९), भरघोस उरोज, लवचिक कंबर, चोंबाळले (पृ. ११), जवानीची मशाल (पृ. २२)- झळ. हे विविध शब्द परिस्थितीजन्य मानसिकता व्यक्त करणारे आहेत. बोलीभाषेत रूढ झालेले हे शब्द त्या त्या वेळची भावना व्यक्त करणारे आहेत. सुधीर रसाळ म्हणतात, 'भाषा हे आपल्या निवेदनाचे (communication) प्रधान माध्यम आहे. आपल्या जीवनात भाषेला हे जे स्थान प्राप्त झाले आहे, त्याचे कारण भाषा हेच आपल्या विचार प्रक्रियेचे माध्यम आहे. विचार प्रक्रिया किंवा मनातील विचार म्हणजे आपल्या प्रकट मनात चाललेल्या सर्वप्रकारच्या घडामोडी, मनातल्या भावना, कल्पना, वासना आणि यासंबंधीचे आपले निष्कर्ष इत्यादी सर्व प्रकारच्या घडामोडी म्हणजे आपली विचारप्रक्रिया, विचार प्रक्रियेचे माध्यम भाषा असते.' (कविता आणि प्रतिमा, पृ. १४६) त्यामुळे राग, संताप, चीडही शिव्या आणि अश्लील शब्दांतून व्यक्त होते, सौंदर्य हे अलंकारिक शब्दांतून व्यक्त होते. असे असले तरी भाषिक सौंदर्य हे श्लील-अश्लील असत नाही. वास्तवाचे दर्शन अस्सल आणि यथोचित घडविणारी भाषा ही सौंदर्यपूर्ण असते आणि तीच भाषा समृद्ध असते.

डॉ. गायकवाड यांच्या नाटकांमध्ये ग्रामीण बोली भाषेतील अनेक शब्द, म्हणी, वाक्प्रचार आलेले आहेत. त्यामुळे त्यामधील आशयाला सामर्थ्य प्राप्त झालेले आहे. तो प्रसंग जिवंतपणे डोळ्यांसमोर उभा राहण्यास, तो वाचकांच्या मनाला थेट भिडण्यास भाषिक सामर्थ्य महत्त्वाचे ठरले आहे. काही शिव्या आणि अश्लील शब्दही नाटकात आलेले आहेत. त्यामधून पात्रांच्या भावभावना व्यक्त झालेल्या आहेत. 'टिळा आणि इतर नाटिका' या एकांकिका संग्रहातील भाषा ही मराठवाड्यातील दलितांची बोलीभाषा आहे. भाषेमुळे नाटकाला जिवंतपणा आला आहे. उदा. गल्लीपासून दिल्लीपतूर (पृ. ५), शिकक्षाण, इसवास, कातड्याची रापीसारखी, ओलाणीवर, ग्वाड, मपल्याने, परमाण, पोतड्यावर, लेकाच्याला बोलणं वाढवण्याची फार हौस (पृ. ५), प्रेमापोटी मिळालेला मारसुद्धा पर्जन्यधारेप्रमाणे वाटतो (पृ. ८), मी अडाणी बापाची लेक आहे म्हटलं (पृ.११), तुम्हाला ऐकायस्नी तर बोलतूया की (पृ. ४), ही ग्रामीण दलित माणसांच्या भावभावना व्यक्त करणारी भाषा वाचकांच्या मनाला स्पर्श करते. छोटी छोटी वाक्ये, बोलीभाषेतील म्हणी, वाक्प्रचार हे वाचकांचे लक्ष वेधून घेतात. त्याचबरोबर ते मराठवाड्यातील शब्दसामर्थ्याची ओळख करून देतात.

डॉ. गायकवाड यांनी ललित लेखन हे मराठी प्रमाण भाषेत केले आहे. त्यामधील शब्दकळा ही सुशिक्षित आणि मध्यमवर्गीयांच्या जीवनातील आहे. त्यांनी विविध अनुभव

मोठ्या नाट्यात्मकरितीने मांडले आहेत. साधे साधे अनुभवही दिशादर्शक वाटतात. हलक्या फुलक्या विषयांतूनही मनाला आनंदित करणारे आणि प्रबोधन करणारे त्यांचे ललित लेखन हे समाज जीवनातील आणि व्यवहारातील म्हणी आणि वाक्प्रचारांनी नटलेले आहे आणि तोच त्यांच्या ललित लेखनाचा विशेष असलेला दिसतो. काखेत कळसा गावाला वळसा, ढवळ्या शेजारी पवळ्या बांधला वाण नाही गुण लागला, नकटीच्या लग्नाला सतराशे विघ्ने, दुधाची तहान ताकावर भागविणे, माणसापेक्षा मेंढरे बरी, काळ आला होता पण वेळ आली नव्हती, या मनावी जीवनातील अनेक संदर्भ, व्यवहार ज्ञान, मानवी स्वभाव दाखवणाऱ्या म्हणी आहेत. अशा म्हणींचा, वाक्प्रचारांचा खजिना डॉ. बाबुराव गायकवाडांच्या ललित लेखनात दिसून येतो. त्यांचे ललित लेखन म्हणजे व्यवहार ज्ञान, मानवी स्वभाव उलगडून दाखविणारा खजिना असतो. यामुळे त्यांच्या साहित्याला लालित्य प्राप्त झालेले दिसते. म्हणी, वाक्प्रचार, प्रतिमा, प्रतिके याबरोबर अलंकारिक वाक्ये सुभाषितवजा वाक्ये ही त्यांच्या ललितलेखनात लालित्य आणताना दिसून येतात. उदा. मानवी मूल्यांवर प्रेम करण्यापेक्षा आपले सळसळते रक्त स्त्रीच्या उभरत्या अवयांवर लवकर फिदा होताना दिसते. (पुन्हा एकदा हलकं फुलकं, पृ. ५९), ज्याच्यासाठी माणसे भांडतात त्या वस्तू निरंतर, नित्य असतात; पण भांडणारी माणसे मात्र कालांतराने या जगातून नाहीशी होतात (हलकं फुलकं, पृ. १०), बायको पडणे म्हणजे घर पडणे होय. बायको उभी तर घरदार उभे (पृ. १७), नाक हे माणसाचे भूषण आहे (सरमिसळ, पृ. २२) अशी वाक्ये ही त्यांच्या ललित लेखनाचे लालित्य फुलवितात. एवढेच नव्हे तर ही त्यांची भाषाशैली मराठी साहित्याच्या वैभवाला उभारी देणारी आहे. या भाषेमुळे मराठी साहित्यविश्व समृद्ध होण्याला हातभारही लागेल असे वाटते.

डॉ. बाबुराव गायकवाड यांनी कथा, कविता, कादंबरी, नाटक, समीक्षा आणि ललित लेखन अशा वाङ्मय प्रकारांमध्ये मोठ्या प्रमाणात साहित्य निर्मिती केली आहे. त्यांची शैक्षणिक जडणघडण ही मराठवाड्याच्या परिसरात झालेली आहे. त्यांचे बालपण त्याच परिसरात गेलेले असल्याने त्यांच्यावर त्या परिसरातील संस्कार झालले आहेत. याचे दर्शन त्यांच्या साहित्यातून होते. त्यांच्या जडणघडणीत त्या परिसरातील भाषेचा प्रभाव आहे, याचे दर्शन त्यांच्या साहित्यामधून होते. ते ३० वर्षांपेक्षा जास्त काळ कन्नड आणि मराठीच्या सीमाभागात वास्तव्य करून आहेत. त्यांनी कन्नड आणि मराठी भाषेत समन्वय साधण्याचे कार्य सातत्याने केले आहे. कन्नड-मराठी आणि हिंदी-मराठी असे अनुवादही त्यांनी केले आहेत. त्यांच्या सर्वच साहित्यात विविध भाषेचे संस्कार दिसतात. त्यांनी भाषेची केलेली विविधांगी जोपासना आणि वृद्धी ही वाखाणण्यासारखी आहे. साहित्यामधील भाषेची विविधता, विविध शब्दांचा केलेला वापर, परिस्थितीजन्य शब्द, जातीनिष्ठ शब्द यामुळे डॉ. गायकवाड यांच्या साहित्याला



एक भाषिक सौंदर्य प्राप्त झालेले आहे. त्यांच्या साहित्यामुळे मराठी साहित्यात नवीन शब्दांची, भाषेची भर पडू शकेल, असे भाषावैभव साहित्याच्या माध्यमातून प्रवाहित झालेले आहे. भाषेच्या अभ्यासकांना विविध परिसरातील भाषेचे आकलन करून घेण्यासाठी गायकवाड यांचे साहित्य दिशादर्शक ठरणारे आहे. त्यांच्या साहित्याच्या भाषिक वैभवात भर घालणारे ठरेल असे वाटते. त्यांनी केलेली भाषेची सेवा आणि मराठी साहित्यात भाषिक दृष्टीने घातलेली भर ही दखल घेण्यासारखी आहे. त्याचा विचार होणे आवश्यक आहे असे वाटते.

**संदर्भ**


१) रसाळ सुधीर, कविता आणि प्रतिमा, मौज प्रकाशन, मुंबई.

२) दणाणे सतेज, डॉ. बाबुराव गायकवाड यांचे ललित लेखन, अक्षय प्रकाशन, रत्नागिरी, २०१४.

३) गायकवाड बाबुराव, हुंदका, समन्वय प्रकाशन, धारवाड, १९८८.

४) गायकवाड बाबुराव, स्वप्नील, समन्वय प्रकाशन, धारवाड, २००८.

५) गायकवाड बाबुराव, बुरुज, ज्योती प्रकाशन, कोल्हापूर, २००६.

६) गायकवाड बाबुराव, झळ, शिरीष एजन्सी, मुंबई, १९८०.

७) तत्रैव, आग, मंजुल प्रकाशन, पुणे, १९९६.

८) तत्रैव, टिळा आणि इतर नाटिका, समन्वय प्रकाशन, धारवाड, १९९४.


९) तत्रैव, हलकं फुलकं, मंजुल प्रकाशन, पुणे, २०१२.

१०) तत्रैव, पुन्हा एकदा हलकं फुलकं, मंजुल प्रकाशन, पुणे, २०१२.

११) तत्रैव, सरमिसळ, मंजुल प्रकाशन, पुणे, २०१३.


*('माझी मराठी' मधून साभार)*

■ ■ ■



★ **गुण गाईन... !**
- **बाबुराव गायकवाड**
- समीक्षात्मक लेखसंग्रह.
- **मंजुल प्रकाशन, पुणे ५१.**
- पृष्ठे : ८८, मूल्य : रु. १००/-